ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन १९३७
जानेवारी-मार्च २०१६ / खंड ३९ अंक ४



## शेती आधारित उद्योग विशेषांक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी-मार्च २०१६ / खंड ३९ अंक ४

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१५-१८)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद: शेतमाल प्रक्रिया उद्योगातील संधी.. ३३३
चारुदत्त गोखले, जळगाव
मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आधारस्तंभ ढासळला ......३३५
सुहास आव्हाड, संगमनेर
स्वातंत्र्योत्तर भारतातील विदेशी गुंतवणूक ............३३७
सादिक सय्यद, कर्जत
अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगाची स्थिती.......३५३
रूपा शहा, कोल्हापूर
शेती आधारित उद्योग-सद्यस्थिती व भवितव्य ........३५९
विनायक देशपांडे, नागपूर
महाराष्ट्र भूषण डॉ.माधवराव चितळे ................३६४
दिपा होळकर, नाशिक
नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष वाईन उद्योगाच्या समस्या ...३६७
प्रमिला पाटील, कोल्हापूर
गुऱ्हाळघरे-शेतीमाल आधारित उद्योग ................३७३
शिवाजी ढगे, पुणे
महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांच्या समस्या..............३८१
कुमुदिनी जोगी, अचलपूर
शेती आधारित उद्योग व ग्रामीण विकास..............३९१
निकिता भोरे, सांगली
फळे व भाजीपाला सहकारी संस्था ..................३९६
लाजवंती टेंभुर्णे, मोर्शी
भारतातील शेतीमाल प्रक्रिया उद्योग...................४०२
सुरेश ढमढेरे, पूणे
महाराष्ट्रातील शेती आधारित उद्योग: सद्यस्थिती........४०७
जितेंद्र तलवारे, देवपूर
भारतातील कृषी प्रक्रिया उद्योगातील संधी............४१४
रामलिंग नाळे, सरूड
शेती आधारित उद्योग: ग्रामीण विकासातील भूमिका ..४१९
सूत्रसंचालकाचा अहवाल-३९ वे अधिवेशन
रामहरी दातीर, हरिहर तिवारी, विठ्ठल घिनमिने.........४२३
रूपा शहा, जयश्री उपाध्ये, विद्या पाटील..............४२५
कार्यवाहांचा अहवाल- आर.बी.भांडवलकर...........४२७
संपादकांचा अहवाल- अविनाश निकम................४३४

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१५-१६**

**अध्यक्ष**

सुहास धोंडिबा आव्हाड (संगमनेर)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)

**सदस्य**

राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिलीप पाटील (नंदुरबार)
आर. के. दातीर (नाशिक)
रामभाऊ खाडे (बारामती)

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१४-१५ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना**- सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय**- सातपुडा ऑफसेट, जळगाव.

# संपादकीय संवाद...

## शेतमाल प्रक्रिया उद्योगातील संधी.....

भारतीय शेती आता खऱ्या अर्थानं आधुनिकतेकडे वळते आहे. परंपरागत पिकांबरोबरच शेतकरी आता कमी पाण्यात नवनवीन उत्पादनं घेतो आहे. त्या पिकाच्या गरजेनुसार हवं तितकं पाणी देणं, हवं तसं वातावरण निर्माण करणं ग्रीन हाऊस तंत्रज्ञानानं शक्य झालय्. म्हणूनच शेतकरी जागतिक मानांकनानुसार पिकांचं उत्पादन घेतोय. परिसरातल्या प्रक्रिया उद्योगाला गरजेनुसार कच्चा माल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्यानं पेलली आहे. द्राक्ष, आंबा, डाळींब, संत्रा, केळी, टोमॅटो, बटाटा, कांदा, मुळा, गाजर, मेथी, कोथिंबीर, शेवगा असा सगळ्या प्रकारचा फळं-भाजीपाला उत्तम तऱ्हेनं पॅक होतीय. फ्रेश मालाला ग्राहकापर्यंत पोहचवताना टिकवण्याच्या व्यवस्था निर्माण झाल्याहेत. मोठमोठ्या फ्रीजर्समध्ये सहा महिन्यांपूर्वी साठवलेला भाजीपाला ताजाच राहतोय. अगदी गुलाबाच्या फुलांना काही तास कूलींग प्लॅन्टमध्ये ठेवल्यानंतर ती फुलं महिनाभर टवटवीत राखण्याची किमया साध्य झाली आहे. निर्यात उत्पादनासाठी याचा खूपच फायदा झाला आहे. उर्वरित माल शीतगृहात साठवला जातोय. उत्तम दर्जाच्या शेतमालावर अनेक प्रकारच्या प्रक्रिया केल्या जाताहेत. हा प्रक्रियायुक्त मालही मॉलमधील ग्राहक प्रिमियम रेटनं खरेदी करतोय. इंटरनेटवर जगभरातील शेतमाल किमतीची पाहणी शेतकरी करतोय. नवीन प्रयोग करण्याची त्याची क्षमता वाढतेय. नवीन पिकासाठी नवं तंत्रज्ञान अवगत करण्याची त्याची इच्छा वाढलेली आहे. मिळवलेल्या नफ्याला पुन्हा भांडवलात टाकून सुधारणा करण्याचं तंत्र तो जोपासतोय. सर्वात महत्त्वाचं म्हणजे देश-विदेशातील बाजार तो समजून घेतोय. जगातील पिकाचं उत्तमोत्तम वाण तो स्वत:च खरेदी करतोय. अत्याधुनिक शेती असलेल्या विदेशातील शेतीचे प्रयोग तो तिथं प्रत्यक्ष जाऊन पहातोय. हे सगळं स्वप्नवत वाटणारं किंवा अमेरिका, स्पेन, इटलीसारख्या प्रगत देशातच हे शक्य आहे असं वाटणारं चित्र आता भारतातही मोठ्या प्रमाणात दिसू लागलं आहे. ''शेतकऱ्याच्या मालाचा भाव करू नका, कारण ते श्रीमंत होण्यासाठी नव्हे तर जगण्यासाठी संघर्ष करत असतात.'', ''शहरातील ग्राहकांनी शेतकऱ्यांच्या काबाडकष्टाचा विचार करावा. मल्टिप्लेक्समध्ये सिनेमाचं दोनशे रुपयांचं तिकिट घेणाऱ्या शहरी ग्राहकाला वीस रुपये प्रतिकिलो मिळणारा कांदा महाग का वाटतोय?'' अशा आशयाच्या पोस्ट व्हॉट्स्-ॲपवर फिरत असतात. या पध्दतीनं मिळणाऱ्या सहानुभूतीवर शेतकरी टिकाव धरू शकणार नाहीत. इस्त्राईलनं देशातील कमी पाण्यातही भरघोस पिकं घेऊन प्रक्रिया उद्योगांची भरभराट होऊ शकते हे दाखवून दिलंय्. जर्मनी, स्पेन, इटली, दक्षिण आफ्रिका, अर्जेंटिना, चिली यांसारख्या देशांनी शेती उत्पादकतेत, निर्यातीत, शेती आधारित उद्योगात मोठी झेप घेतली आहे. यामागचं कारण म्हणजे तेथील शेतकऱ्यांनी स्वत:ची आर्थिक ताकद वाढविली आहे. दुष्काळाचा सामना करण्याचं सामर्थ्य वाढवलं आहे. गारपीट, वादळ, अवकाळी पाऊस या समस्या त्या देशांतही आहेतच. मात्र तेथील शेतकरी मोठ्या ताकदीनं या समस्यांचा सामना करतोय, समस्यांवर मात देखील करतोय.

भारतातील शेतमाल प्रक्रिया उद्योगांचे ग्राहक शंभरावर देशात आहेत. आपल्याकडे मॉल्समध्ये शेतमाल प्रक्रिया उद्योगांच्या वस्तू उपलब्ध आहेत त्या वस्तू अमेरिकेतील काही मॉल्समध्ये देखील उपलब्ध आहेत. माझा कतार येथील मित्र म्हणतो, ''भारतात आल्यावर काहीच सोबत घेऊन जाण्याची आवश्यकता वाटत नाही. इथं ज्या वस्तू मिळतात त्या सर्व वस्तू तिथंही मॉलमध्ये उपलब्ध आहेत. तिथं फक्त रुपयाऐवजी

रियालनं पेमेंट द्यावे लागते इतकाच काय तो फरक आहे.'' आपल्याकडे पॅकींग फूडचं महत्त्व वाढत आहे. मॉल्समध्ये कापून, निवडून तयार केलेल्या पालेभाज्यांच्या विक्रीत खूपच वाढ झालेली दिसते. केवळ नोकरी करणाऱ्या स्त्रीया निवडून तयार केलेले पालेभाज्यांचे पॅकींग्ज् खरेदी करत असतील असे कोणाला वाटत असेल तर तो गैरसमज आहे. नोकरी न करणाऱ्या गृहिणीही या प्रकारच्या खरेदीत मागे नाहीत, न निवडलेल्या भाजीपाल्यापेक्षा दहा-पंधरा रुपये जास्त देऊन तो माल खरेदी करण्याची त्यांची क्षमता आहे. त्यामुळे त्यांच्या श्रमात बचत होते. वेळेत बचत होते. हा वेळ ते आपल्या आवडत्या टीव्ही सिरियलसाठी देताहेत. यात काहीच वावगं नाही. कारण असं झाल्याशिवाय शेतीवर अवलंबून असणारे लहान-लहान प्रक्रिया उद्योग तग धरू शकणार नाहीत.

ऊस उत्पादन करणाऱ्या देशात भारताचा रशिया, ब्राझील, क्यूबानंतर चौथा क्रमांक लागतो. तर देशांतर्गत ऊस उत्पादनात महाराष्ट्राचं स्थान सर्वोच्च आहे. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे १९४९ मध्ये सुरू करण्यात आला. सहकारमहर्षि डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर परिसराचे स्वरूप पालटून टाकले. किर्लोस्करांनी औंधच्या माळावर आपला कारखाना काढला. नंदूरबार जिल्ह्यात साखर कारखाना, सूत गिरणी यांसारखे भव्य प्रकल्प सहकाराच्या माध्यमातून यशस्वी करत सहकारमहर्षि अण्णासाहेब पी. के. पाटील यांनी शहादा परिसराचा कायापालट केला. सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरात साखर कारखानदारीनंच समृध्दी आणली. नाशिक परिसरात वाईन उद्योगामुळे शेतकऱ्यांची स्थिती पालटतेय सरकार मेक इन इंडिया अंतर्गत तब्बल १४ हजार कोटी रुपये शेती प्रक्रिया उद्योगांसाठी खर्च करणार आहे. देशामध्ये ४२ मेगा फूड पार्कस् उभारले जाणार आहेत त्यापैकी ५ फूड पार्कस्ची उभारणी पूर्ण झालीय. यातून तीन लाख लोकांना रोजगार उपलब्ध होऊन सुमारे १२ लाखावर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. गुजरात राज्यातील खेडा या गावात सुरू झालेल्या अमूल प्रकल्पानं विशालकाय रूप धारण केलं आहे. अमूलनं दूध क्रांती घडवून आणलीय. अमूलनं आईसक्रीम बाजारपेठेत आणलं त्यावेळी इतर बहुराष्ट्रीय कंपन्या या क्षेत्रात होत्या. 'रियल मिल्क, रियल आईसक्रीम' सांगत अमूलनं बाजारपेठ काबीज केली. १९३६ च्या सुमारास कृष्णेकाठी भिलवडी या लहान गावात सुरू केलेल्या दुधाच्या धंद्याचं रुपांतर चितळे उद्योगसमुहात झालं आहे. सुरवातीचा १५० लिटर्स दुधाचा धंदा आता रोज चार लाख लिटर्स दूध संकलनावर पोहोचलाय. जागतिकीकरणाच्या काळात प्रक्रिया उद्योगाच्या संधी खूपच वाढल्याहेत. कॅडबरी बनविणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीनं जगात मोठं मार्केट मिळवलं आहे. लहान मुलं चॉकलेट नव्हे तर कॅडबरीच मागतात. शेंगदाण्यापासून चॉकलेट बनविणाऱ्या मार्कस् नावाच्या बहुराष्ट्रीय कंपनीची वार्षिक उलाढाल १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. आग्र्याचा पेठा, चितळ्यांची बाकरवडी, अमूलचं आईसक्रीम, हल्दीरामची मिठाई, बंगाली मिठाई, महाराष्ट्रीयन पापड या सर्वांनी जागतिक बाजारपेठेत आपलं स्थान मिळवलं आहे, ते स्थान मिळवणं नव्याने पदार्पण केलेल्या उद्योगांनाही शक्य आहे. गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती अन् परिश्रमाची.

अर्थसंवादच्या या विशेषांकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो.

अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आधारस्तंभ ढासळला

**चारुदत्त गोखले, जळगाव,**
कार्याध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य आणि आधारस्तंभ असलेले आदरणीय पद्मश्री डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांचे दि.२५ फेब्रुवारी २०१६ रोजी मुंबईत जसलोक रुग्णालयात निधन झालं. त्यांच्या निधनानं शेतकऱ्यांचा खरा कैवारी गेला. एक महान उद्योगपती, विचारवंत, समाजसुधारक आणि गांधीवादी गेला. त्यांच्या निधनाचे वृत्त सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचले. अत्यंत आपुलकीनं कायम पडद्यामागं राहून मराठी अर्थशास्त्र परिषदेला त्यांनी कायमच भक्कम आधार दिला होता हे किती जणांना माहीत आहे? अर्थशास्त्रासारख्या रूक्ष परंतु महत्त्वाच्या विषयाचं अनन्यसाधारण मोल जाणून ते आपली संपूर्ण ताकद तिच्यामागे उभी करत. परिषदेसाठी काम करणाऱ्या माणसांना, कार्यकर्त्यांना त्यांनी नेहमीच सर्व प्रकारचे बळ दिले.

परिषदेचे मुखपत्र म्हणजे 'अर्थसंवाद' हे त्रैमासिक आहे. त्याचा एक विशेषांक 'शेती विशेषांक' म्हणून प्रसिद्ध केला होता. त्या अंकासाठी लेख, मजकूर व अन्य मार्गांनी त्यांनी भरपूर मदत तर केलीच शिवाय रु.७१०००/- एवढी आर्थिक मदतही दिली. हे सगळे अर्थातच त्यांनी परिषदेवरील प्रेमापोटी, परिषदेच्या कार्यासाठी, परिषदेवरील लोभासाठी केले. 'अर्थसंवादला' त्यांनी आतापर्यंत रु.१ लाखावर किंमतीच्या जाहिराती दिल्या आहेत.

२००४ साली मराठी अर्थशास्त्र परिषदेचं वार्षिक अधिवेशन जळगावमध्ये भरलं होतं. त्या निमित्त महाराष्ट्रातील विविध भागातून अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक, शिक्षक इथे आले होते. ही सुवर्णसंधी मानून त्यांनी या सर्वांना एक पूर्ण दिवस जैन हिल्सवर पाहुणचार घेण्यासाठी निमंत्रित केलं. त्यांचे प्रेमाने आतिथ्य तर केलेच पण त्यांच्याशी चर्चा केली, गप्पाही मारल्या. या मनमोकळ्या वागण्यानं सर्व मंडळी जाम खूष झाली होती.

''एखादे वर्षी जर परिषदेला महाराष्ट्रातून कोठूनच निमंत्रण आलं नाही

आणि त्यामुळं वार्षिक अधिवेशन रखडलं तर माझे हेच आमंत्रण समजून तुम्ही हक्कानं, आनंदानं थेट जळगावला जैन हिल्सवर या'' या शब्दात त्यांनी परिषदेला निर्धास्त केलं होतं. एवढी प्रचंड आस्था त्यांना परिषदेबद्दल होती.

जैन उद्योगात जळगावमध्ये आज १०,००० पेक्षा जास्त लोकांना थेट रोजगार आहे. त्यापेक्षाही जास्त लोकांना अनुषांगिक, अवलंबित कामांमुळे आर्थिक लाभ होत असतो. जैन उद्योगाच्या विस्तारामुळे जळगाव शहर, जिल्हा आणि खान्देश यांच्या आर्थिक उलाढालीत घसघशीत वाढ झालीय. होते आहे, इतरही मोठे मोठे उद्योग आकर्षित झालेत. हाच खरा उद्याच्या उद्योग विकासाचा पाया आहे.

जळगावचे नावं जैन उद्योगाने जगभर नेलेय. जगभरात आज ३० कारखाने १४६ कार्यालये व डेपो, व सुमारे ७००० वितरक कार्यरत आहेत. उत्पादनांमध्ये कृषी पाईप्स व ठिबक सिंचनात जगात प्रथम क्रमांक, केळी व डाळिंबांच्या टिश्यूकल्चर मध्ये जगात प्रथम, आंबा फळप्रक्रियेतही जगात प्रथम, कांदा व भाजीपाला प्रक्रियेत जगात दुसऱ्या स्थानी असे विक्रम स्थापित केले आहेत. त्यासाठी त्यांचेवर देशभरातून, जगभरातून पुरस्कार, सन्मानांचा तर पाऊसच पडलाय. आंतरराष्ट्रीय १२, राष्ट्रीय १३५, राज्यस्तरीय ४१, संस्था गौरव ७१, मानांकने १६, व्यक्तींद्वारे गौरव २ असे एकूण २७७ पुरस्कार मिळालेत.

जगभरात, उद्योग विश्वात मानाचं विश्वासपात्र स्थान लाभलेल्या एकमेव 'फॉर्च्युन' नियतकालिकानं 'चेंज-द-वर्ल्ड २०१५'म्हणून अत्यंत चुरशीनं निवडलेल्या जगभरातील पहिल्या ५१ कंपन्यांमध्ये जैन इरिगेशनला ७ वे मानाचे स्थान दिलेय. या यादीत भारतातील ही एकमेव कंपनी आहे. ह्या निमित्ताने जैन उद्योग समूहाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला.

आपल्या अथक प्रयत्नाने, कर्तृत्वाने, परिश्रमाने 'जैन उद्योग समूह' आणि जळगाव शहराला जगाच्या नकाशावर स्थान प्राप्त करुन देणाऱ्या सुपुत्राला आपण कायमचे मुकलो आहोत. या भूमिपुत्राला, थोर उद्योग महर्षींना, ज्येष्ठ विचारवंताला, पद्मश्री स्वर्गीय डॉ.भवरलाल हिरालाल जैन ह्यांच्या पवित्र स्मृतीला मराठी अर्थशास्त्र परिषद व परिवाराची ही वंदनीय, भावपूर्ण श्रद्धांजली।

# स्वातंत्र्योत्तर भारतातील विदेशी गुंतवणूक

सुहास धोंडिबा आव्हाड, संगमनेर,
ज्ञानदीप, गोल्डन सिटी,
अकोले बायपास रोड,
जिल्हा अहमदनगर,
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या विद्यमाने बारामती शहरात नोव्हेंबर २०१५ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण....)*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा.जवाहरशेठ वाघोलीकर, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, परिषदेचे कार्यवाह-खजिनदार प्रा. राजेंद्र भांडवलकर, अर्थसंवाद त्रैमासिकाचे संपादक डॉ. अविनाश निकम, स्थानिक कार्याध्यक्ष व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, स्थानिक कार्यवाह प्रा. रामभाऊ खाडे, परिषदेचे सन्माननीय विश्वस्त, सर्व सन्माननीय माजी अध्यक्ष, परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व आजीव सदस्य, या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर वृंद, अधिवेशनासाठी उपस्थित असलेले सर्व मान्यवर व उपस्थित बंधु आणि भगिनींनो...

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३९ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी आपण सर्वांनी माझी निवड करून आपण माझा जो सन्मान केला व मला काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्व प्रथम आपणा सर्वांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वर्षभरातील वाटचालीत कामकाजातील महत्त्वाच्या घटनांमध्ये उल्लेख करावा असा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणजे परिषदेच्या वतीने महाराष्ट्रातील विविध भागातील आर्थिक व सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात अभ्यासगटांच्या माध्यमातून अहवाल

तयार करून तो शासनाला सादर करणे व त्याच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणे तसेच परिषदेची स्वतःची वास्तू निर्माण करणे आणि संकेतस्थळ सुरू करणे या महत्वपूर्ण बाबींचा सातत्याने पाठपुरावा करून येत्या काही दिवसात त्याची फलनिष्पत्ती होण्याच्या दृष्टीने परिषदेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त आणि माजी अध्यक्ष प्रयत्नशील आहेतच त्यासाठी आपणा सर्वांचाही मोलाचा सहभाग अपेक्षित आहे कारण आपणा सर्वांच्याच सहकार्याने परिषद आपली यशस्वी वाटचाल करत आहे.

**प्रास्ताविकः**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत विदेशी भांडवलाची भूमिका विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर महत्त्वपूर्ण असते. विकसित देशात विकासाचे सातत्य टिकविण्यासाठी आणि टिकाऊ विकासासाठी विदेशी भांडवल आवश्यक असते. विकसनशील देशात औद्योगिकीकरणाची गरज असते, त्यामुळे विदेशातील भांडवली वस्तू, आयात आदान सामुग्री, जीवनावश्यक गरजांची तृप्ती करण्यासाठी राष्ट्रीय उत्पादन अपुरे असल्याने अशा वस्तूंची आयात करावी लागते आणि त्यासाठी विदेशी चलन संग्रही असावे लागते. निर्यातविक्र्यातून विदेशी चलनाची उभारणी विकसनशील देशाला अशक्य असल्याने अन्य साधनांनी विदेशी भांडवलाची उभारणी करावी लागते.

विकसनशील देशाला विदेशी भांडवल देशात आणण्याचे तीन स्त्रोत संभवतात, (१) विदेशी कर्जे, (२) विदेशी देणग्या व अनुदाने आणि (३) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (FDI), पैकी विदेशी कर्जे जगभरातील देशांची सरकारे आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था (IMF, IDA, IBRD) कडून मिळतात, सामान्यपणे, विदेशी कर्जे विदेशी चलनात मिळतात आणि त्याची परतफेडही विदेशी चलनातच करावी लागते. अपवादात्मक परिस्थितीत विदेशी कर्जे देशी चलनात परतफेड करण्याची सवलत धनको देश ऋणको देशाला देवू शकतो. स्वातंत्र्योत्तर भारताने पीएल-४८० खाली केलेल्या अन्नधान्य आयातीची देयके भारतीय रुपयांमध्ये फेडली होती. विदेशी भांडवलाचा दुसरा स्त्रोत, विदेशी देणग्या आणि अनुदाने, विदेशी देणग्या आणि अनुदाने स्वीकारणाऱ्या देशांवर कोणतीही देयता निर्माण करीत नाहीत. कारण दाते देश त्याच्या परतफेडीची अपेक्षा ठेवीत नाहीत. एक प्रकारे त्या देणग्या आणि अनुदाने अडल्या-नडल्याची मदत म्हणून व्यक्त झालेली अनुकंपा असते. देणग्या घेणाऱ्या देशासाठी तो बोजा नसला तरी एक प्रकारे अटळ लाचारी मात्र असते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक मात्र वरील दोन्ही स्त्रोतांपेक्षा वेगळी आहे. विदेशी कर्जदाता हा धनकोच्या भूमिकेत असतो. दिलेल्या कर्जाच्या मोबदल्यात व्याजरूपी परतावा मिळण्याची त्याची अपेक्षा असते. देणगीदार संकट मोचकाच्या भूमिकेतून आपदग्रस्तांना मदतीचा हात देणारा असतो. या उलट प्रत्यक्ष गुंतवणूक करणारा विदेशी भांडवलदार अथवा सरकार एक व्यावसायिक भागीदार म्हणून येतात. विदेशी गुंतवणूक प्रामुख्याने विदेशी भांडवलाच्या देशी अर्थव्यवस्थेतील कोणत्या ना कोणत्या सहभागातून येते. या प्रकारातील गुंतवणुकीचा विशेष लाभ असा की, गुंतवणुककर्ता त्याच्या देशातून केवळ भांडवलच आणीत नाही, तर

त्याच्या देशातील प्रगत तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्ये आणि स्वत:चा कार्यानुभवही घेऊन येतो.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

१९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या अलक घोष यांच्या "Indian Economy : It's Nature and Problems" या ग्रंथात असे स्पष्ट केले आहे की, पहिल्या पंचवार्षिक योजनेत भारताचा व्यापार बहुतांशी इंग्लंड या देशाशीच असे. व्यापार तर टिकलाच पाहिजे परंतु त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे ते म्हणजे भारताने आपली निर्यात क्षमता वाढविण्यावर भर दिला पाहिजे. भारताला सध्याची राहणीमान पातळी आहे तेवढीच टिकवून ठेवण्यासाठी आपली निर्यात दुपटीने वाढवावी लागेल.

अर्थशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक गोखले रामचंद्र महादेव (१९८०) यांच्या मते, स्वातंत्र्यपूर्व भारताचे ब्रिटीश साम्राज्याचे आर्थिक नि:स्सारणाच्या माध्यमातून जे आर्थिक शोषण केले ते असे *१८०१ ते १८६३ या काळात भारतात २३४.३५ दशलक्ष पौंड किंमतीचे सोने आले असले तरी ह्या काळात भारताने जे निर्यातधिक्य मिळविले, त्यापेक्षा ते फारच कमी होते. १९६४ नंतर अमेरिकन यादवी युद्धामुळे भारताच्या व्यापारशेषाची अनुकुलता वाढतच राहिली. ब्रिटीश अमलाखालील भारतात रेल्वे विकासासाठी इंग्लड मधून प्रचंड विदेशी चलन आले. खरे तर या सर्व घटनांचे भारताच्या विकासावर अनुकूल परिणाम झाले. परंतु इंग्रजांच्या अव्याहत नि:स्सारणामुळे भारतात भांडवल गुंतवणूक वाढलीच नाही तर वाढली ती फक्त टंचाई आणि महागाई !*

नियोजन काळाचा आरंभ होण्यापूर्वीच भारताला १९४९ मध्ये रुपयाचे अवमूल्यन करावे लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तातडीने भारत-पाक फाळणी करावी लागली. भारताला या फाळणीच्या दुष्परिणामांचे चटके दीर्घकाळ सहन करावे लागले. तात्काळ भेडसावणारी अन्न समस्या निर्माण झाली. गव्हाचे भरघोस पीक घेणारा पंजाबचा काही भाग पाकिस्तानच्या वाट्यास गेला. भारतीय ताग उद्योग पूर्व बंगाल मधील ताग उत्पादनावर अवलंबून होता तो देखील पाकिस्तानच्या वाटणीस (आताचा बांगला देश) गेल्याने भारताला मोठ्या प्रमाणात अन्नधान्य आणि औद्योगिक आदानांची आयात करावी लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटीशांना केलेल्या लष्करी मदतीपोटी आणि औद्योगिक निर्यात मूल्यापोटी इंग्लडकडून भारताचे कोट्यावधीचे पौंड स्टर्लिंग इंग्लड मध्ये गंगाजळी म्हणून पडून होते. हे दुर्मिळ विदेशी चलन तुटीच्या विदेश व्यापारामुळे खर्ची पडू लागले. पौंडी गंगाजळी वेगाने घटू लागली. व्यापारातील तूट आणि स्वातंत्र्योत्तर विकास खर्चाची वाढती गरज म्हणून विदेशी कर्जे आणि प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीची गरज अटळ झाली.

देशमुख प्रभाकर (१९८२) रॅगनर नर्क्स यांच्या मते, अर्थव्यवस्थेमध्ये विदेशी भांडवलाची गुंतवणूक केल्यामुळे उत्पादकतेत वाढ होते ती लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक असल्याने गुंतवणूक स्वीकारणाऱ्या देशात चक्रवाढीच्या दराने विकास शक्य होतो, निर्वाह आयाती घटतात, विकास पूरक आयाती शक्य होतात आणि देशांत आयात पर्यायीकरण तसेच निर्यातवृद्धीला पोषक वातावरण तयार होते.

मिश्रा एस.के., पुरी व्ही.के. (१९८९) विकसनशील देशात विदेशी भांडवल का आवश्यक असते या बाबत पुढील युक्तीवाद मांडलेले आहेत:

१) गुंतवणुकीचा उच्च दर दीर्घकाळ टिकविण्यासाठी,
२) विदेशी भांडवलासोबत नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी,
३) उपलब्ध आणि ज्ञात साधन सामुग्रीचा पुरेपुर वापर शक्य होण्यासाठी,
४) मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांतील गुंतवणुकीत असलेली आरंभिक जोखीम स्वीकारण्यासाठी आणि
५) पायाभूत संरचनात्मक सुविधा (Raising Basic Infrastructure Facilities) उभारणीसाठी.

ईश्वरन मुकेश आणि कोतवाल, अशोक (१९९४) या लेखकांनी आपल्या "Why Poverty Persists in India ? An Analytical Framework for Understand in Indian Economy" ही अवघी १२८ पानी छोटीशी पुस्तिका लिहिली. लेखकांच्या मते, एखादा विकसनशील देश गरीब असूनही आपली गर्भित उत्पादन क्षमता अत्यंत वेगाने वाढवू शकला आणि औद्योगिक उत्पादनांची निर्यात करू शकला तर त्याला प्राथमिक क्षेत्रांत अतिरिक्त ठरलेले मनुष्यबळ उद्योगांकडे वळविता येईल, त्याचे वेतनमान आणि राहणीमानाचा स्तर उंचावेल. व्यापारामुळे कृषी उत्पादकतेलाही चालना मिळेल आणि त्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांच्या राहणीमानातही अनुकूल बदल घडून येतील. भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. कारण येथे पायाभूत सुविधांचा पाया भक्कम आहे. सुदैवाने तंत्रकुशल मनुष्यबळही भरपूर आहे. या पार्श्वभूमीवर विकसित देश आणि भारत यांच्या दरम्यान औद्योगिक उत्पादकतेतील तफावत कमी करणे सहज शक्य होईल. मात्र औद्योगिक प्रगती सोबत व्यापारवृद्धी झाली नाही तर त्याचे लाभ फक्त श्रीमंत वर्गाकडे केंद्रित होतील याचे भान ठेवावे लागेल.

१९६० च्या दशकापर्यंत भारतात विदेशी गुंतवणूक बऱ्यापैकी मुक्त होती, मात्र त्यानंतर तिच्यावर क्रमशः निर्बंध येऊ लागले. १९७३ मध्ये अंमलात आलेला विदेशी विनिमय कायदा (FERA : Foreign Exchange Regulation Act) संमत झाल्यानंतर भारतातील विदेशी गुंतवणुकीची कमाल मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ४० टक्क्यांपर्यंत सिमित करण्यात आली. त्यामुळे विदेशी भांडवलदारांसाठी भारत हा अनाकर्षक देश होतो की काय अशी वेळ आली होती. हीच परिस्थिती १९८० च्या दशकांत टिकून होती. १९५० पर्यंत भारतातील विदेशी गुंतवणुकीचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी गुणोत्तर शून्यच होते.

पंगारिया अरविंद (२००८) यांनी, १९९१ नंतर भारताचे विदेशी गुंतवणूक आणि व्यापार धोरण उत्तरोत्तर कसे उदार होत गेले याचे तपशिलवार विश्लेषण केले आहे. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीसाठी मुक्तद्वार करण्यात आले आहे. आत्तापर्यंत प्राधान्य क्षेत्रातील ३४ उद्योगांमध्ये विदेशी गुंतवणुकीसाठी ५१ टक्क्यांपर्यंत हिरवा कंदिल दाखविला गेला. अशा उद्योगांना आपोआप मान्यता देण्याचे धोरण अनुसरले. नंतरच्या काळात हे धोरण उत्तरोत्तर अधिक उदार होत गेले.

हॅरीसन अॅन (१९९४) यांच्या मांडणीनुसार, मोरक्को आणि व्हेनेझुएला या देशांमध्ये विदेशी गुंतवणुकीतून होणारे तंत्रज्ञान हस्तांतरण कसे स्थिरावले याचा इतिहास रंजक आहे. एखाद्या देशांत विदेशी तंत्रज्ञान अनेक मार्गाने येणे शक्य असते. मात्र ते जेव्हा विदेशी गुंतवणुकीच्या माध्यमातून येते, तेव्हा तिची भूमिका अधिक प्रभावीपणे नवतंत्रज्ञान हस्तांतरणाची असते. एखादी विदेशी कंपनी रोख मोबदला अथवा मानधनाच्या (Cash remuneration or Royalty) मोबदल्यात तंत्रज्ञान हस्तांतरणास नकार देऊ शकेल. परंतु त्या ऐवजी नफ्यात भागीदारी देऊ केल्यास ती हातचे काही राखून ठेवता आनंदाने तंत्रज्ञान हस्तांतरीत करील. हेच मोरक्को आणि व्हेनेझुएला देशांच्या अनुभवावरून स्पष्ट होते. या देशांच्या निर्याती विदेशी भांडवलाच्या सहभागानंतर प्रचंड वाढल्या असा अनुभव आहे.

बर्नार्ड होएककमन, आदित्य मट्टू आणि फिलिप इंग्लिश (२००२) यांनी असे मत मांडले आहे की, मुक्त व्यापारात विदेशी उद्योग संस्थांना देशी वस्तू बाजारात अडथळे मुक्त किंवा अडथळे कमी करून प्रवेश सुलभ केला जातो. वस्तु व्यापारात हे अडथळे जकातीच्या स्वरूपात असतात. वस्तु व्यापाराच्या तुलनेत सेवा व्यापारातील मुक्त ही संकल्पना अधिक गुंतागुंतीची असते.

सेवा व्यापारात किमान चार प्रकारात सेवांचा पुरवठा केला जातो :

१) सीमापार व्यापार : सीमापार प्रत्यक्ष वायू अथवा जलमार्गे झालेला अथवा इलेक्ट्रॉनिक व्यवहारातून व्यापार (प्रकार १)
२) विदेशातील उपभोग : विदेशात व्यापार अथवा शिक्षणासाठी गेलेल्या देशी लोकांचा तेथील उपभोग खर्च हीच विदेशी सेवांची आयात असते. (प्रकार २)
३) व्यापारासाठी उपस्थिती : (Commercial Presence) दूर संचार सेवा, वीज व गॅस पुरवठा यासारख्या सेवांच्या पुरवठ्यासाठी प्रत्यक्ष व्यक्तिगत सेवांचा पुरवठा (प्रकार३)
४) नैसर्गिक व्यक्तींची उपस्थिती : (Presence of a natural person) बांधकाम व्यवसाय अथवा अन्य कोणत्याही व्यावसायिक समुपदेशनसेवा पुरविण्यासाठी एका देशाचा नागरिक दुसऱ्या देशाच्या तात्पुरत्या वारीवर असणे म्हणजेच नैसर्गिक व्यक्तीची उपस्थिती होय.

जगभरातील उद्योग संस्था जेव्हा प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीत उतरतात तेव्हा त्यांचा अपेक्षित परतावा दर अधिक असतो. एखाद्या उद्योजकाने विदेशात उद्योग उभारला, तर त्यात येणाऱ्या अडचणी स्वदेशातील संयंत्र उभारणीपेक्षा अनेकपटींनी अधिक असतात. म्हणूनच विदेशात प्रत्यक्ष गुंतवणूक करणारे देशांतर्गत गुंतवणुकीपेक्षा विदेशी गुंतवणुकीला अधिक महत्त्व देतात ते प्रामुख्याने भरीव परवताव्याच्या अपेक्षेनेच ! सामान्यपणे, भांडवलसधन विकसित राष्ट्रांचे भांडवल त्याची टंचाई असलेल्या विकसनशील देशांकडे स्थलांतरीत होण्याची प्रवृत्ती स्वाभाविक असते. कारण तेथे परतावा दर अधिक मिळण्याची शक्यता असते. मात्र विकसनशील देशात अशा प्रकारे येणारी विदेशी गुंतवणूक त्या देशाचे कर्ज आणि चालू खात्यातील तुटीच्या बरोबर असते. अशी तूट भांडवली खात्यातून भरून काढण्यात

गैर काहीच नाही, प्रत्यक्षात हे विदेशी भांडवल पुढे कसे वापरले जाते यावर अशा देशांची भावी परिस्थिती अवलंबून असते. ही रक्कम जर खाजगी उपक्रमात गुंतवली तर तिचा आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम होतो, मात्र हीच गुंतवणूक सार्वजनिक क्षेत्रात झाली तर तिचे वृद्धीवरील परिणाम अनिश्चित असतात. डॉमनिक साल्वातोर (२००५) यांच्या मते, विदेशी गुंतवणुकीचे दोन मुख्य प्रकार आहेत : (१) रोख्यांमधील (Portfolio Investment) आणि (२) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (Foreign Direct Investment) यातील पहिल्या प्रकारची गुंतवणूक एखाद्या देशाच्या राष्ट्रीय चलनात व्यक्त झालेली असते आणि त्यावर विशिष्ट कालखंडासाठी एक स्थिर परतावा दर देय असतो. रोख्याची विशिष्ट मुदत संपल्यानंतर वेळोवेळी मिळालेल्या परतावा दराखेरीज रोख्याचे दर्शनी मूल्य रोखेधारकाला परत मिळते. त्याची भूमिका धनकोची असते, मालकीची नव्हे. जोपर्यंत अशी गुंतवणूक मतदान हक्क असलेल्या समभागांच्या १० टक्यांपेक्षा कमी असेल तोपर्यंतच ती रोख्यांमधील गुंतवणूक मानली जाते. ही १० टक्यांची मर्यादा ओलांडली जाते, तेव्हा ती अतिरिक्त गुंतवणूक समभाग खरेदी (Equity Purchases) मानली जाते जिचे धारक उद्योगाचे मालक आणि व्यवस्थापकही असतात. ही दुसऱ्या प्रकारातील गुंतवणूक प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक असते.

सोडरस्टन, बी. ओ. आणि रीड जॉफी (१९७०) यांच्यामते, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे एक आगळे वैशिष्ट्य म्हणजे *एका देशांत स्थित असलेल्या उपक्रमांच्या निर्णय प्रक्रियेवर विदेशी गुंतवणुकदारांचे नियंत्रणे असणे.* क्वचित प्रसंगी जरी असे गुंतवणुककर्ते एक व्यक्ती अथवा भागीदारी संस्था असल्या, तरी बहुतेक प्रसंगी त्या बहुराष्ट्रीय कंपन्याच असतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे उत्पादक सामग्रीवरील नियंत्रण एकापेक्षा अधिक देशांत विस्तारलेले असते. अर्थात त्यांचे अस्तित्व प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीतून उगम पावलेले असते. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीअभावी बहुराष्ट्रीय कंपन्यांना अस्तित्वच लाभले नसते. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक तिचा कर्ता विशिष्ट लाभांवर दृष्टी ठेऊनच ती करत असतो. त्याच्याकडे प्रगत तंत्रज्ञान आणि अधिक विकसित व्यवस्थापकीय कौशल्ये या दोन्ही अथवा कोणतीही एक कला अवगत असेल, तर भांडवलासोबत त्याचेही उपयोजन करून गुंतवणूक तौलनिक लाभ मिळवू शकतो.

दत्त रूद्र आणि सुंदरम के. पी. एम. (२०१०), १९९१ च्या नव्या औद्योगिक धोरणाच्या घोषणेनंतर भारतात विदेशी गुंतवणूक येण्याची प्रक्रिया गतिमान झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार १९९१-९२ ते २००६-०७ दरम्यान भारतात एकूण विदेशी गुंतवणूक १३७ अब्ज अमेरिकन डॉलर्सची झाली. त्यापैकी ७२ अब्ज डॉलर (५२.८ टक्के) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या स्वरूपात आणि ६५ अब्ज डॉलर्स (४७.२ टक्के) विदेशी रोख्यांच्या स्वरूपात होती.

विदेशी भांडवल गुंतवणुकीचे विकसनशील देशांसाठी वरील प्रमाणे अनेक कथित फायदे असले तरी त्यातून काही विकृती कशा निर्माण होतात याची यथार्थ चिकित्सा पॉल क्रूगमन यांनी केली आहे. अमेरिका हे राष्ट्र व्यापारातून समृद्ध झाले त्याला प्रामुख्याने तंत्रवैज्ञानिक प्रगती कारणीभूत असली तरी ही

समृद्धी तळागाळापर्यंत पोहचलेली नाही.

संपत्ती वाटपात प्रचंड विषमता निर्माण झाली यावर क्रूगमन यांनी अतिशय जहाल टीका केली. कल्याणकारी राज्य संकल्पनेची अंमलबजावणी नीटपणे न झाल्याने व्यापारातून आलेली समृद्धी वरदान न ठरता शापच सिद्ध झाली.

गोडबोले अच्युत (२००९) यांचे असे मत आहे की, *जागतिकीकरणाचे धोरण मुळीच वाईट नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार, विदेशी गुंतवणूक हवीच आहेत, (जागतिक व्यापार, विकास आणि कल्याणासाठी) मात्र असा व्यापार फेअर (निकोप) समावेश असला पाहिजे, केवळ मुठभर लोकांची त्यावर मिरासदारी असता कामा नये, जागतिक व्यापारांचे विद्यमान स्वरूपही मात्र नेमके असावे तसेच आहे.*

### प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीची विकसनशील देशातील भूमिका :

बहुतेक विकसनशील देशात नैसर्गिक साधन संपत्ती आणि मानवी संसाधन विपुल असते, परंतु भांडवलाची कमतरता असते आणि उत्पादन तंत्र कालबाह्य असते. परिणामी, देशात उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा पुरेपूर वापर शक्य होत नाही. ही परिस्थिती निर्यातक्षम उत्पादनांच्या निर्मितीला अनुकूल नसते. आवश्यक आयातींचे मूल्य मोजण्याइतपत विदेशी चलन मिळविणे कठिण होते, देशाचा व्यापारशेष सातत्याने तुटीचा होत जातो. शेवटी स्वदेशी अर्थव्यवस्था विदेशी कर्जाच्या सापळयात अडकते, म्हणूनच विदेशी भांडवलाचे पाठबळ विकसनशील देशांना मोलाची मदत करू शकते.

१९९१ पासून भारताने मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारले आणि जागतिकीकरणाच्या स्पर्धेत उतरला ही बदलत्या काळाची गरजच होती. त्यामुळे भांडवल टंचाई आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या अभाव या दुहेरी अडचणीवर मात करणे शक्य होते. अलिकडील काळात आपली विदेशी व्यापारातील कामगिरी रुपयांच्या विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मान्यता मिळाली आणि त्यापैकी ३५१ कोटी रुपयांचा (६५.७ टक्के) भांडवल अंत:प्रवाह प्रत्यक्ष देशात आला. तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, १९९१ ते २००० या १० वर्षात ५३४ कोटी वरून ३२८४३ कोटी रुपयांच्या विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मान्यता मिळाली ही वाढ सुमारे ६२ पटींची झाली. विदेशी भांडवलाचा प्रत्यक्ष अंत:प्रवाह ३५१ कोटी रुपयांवरून १५४३४ कोटी रुपये म्हणजेच ४४ पटींपेक्षा अधिक वाढली. विदेशी भांडवलाची आवक सातत्याने वाढती राहिली तर सरासरीने मान्य प्रस्तावांच्या सुमारे ३५.६ टक्के इतपतच प्रत्यक्षात भांडवल अंतप्रवाह भारतात आला आणि वृद्धी दरात वार्षिक चढउतार असले तरी सरासरीने प्रतिवर्षी मान्य प्रस्ताव ९७.१ टक्याने आणि प्रत्यक्ष भांडवल अंत:प्रवाह प्रतिवर्षी ५५.८ टक्यांनी वाढला.

### २. भारतातील विभाग निहाय विदेशी गुंतवणुकीचे अंत:प्रवाह :

खालील तक्ता क्र. २ मध्ये भारताच्या निरनिराळ्या विभागांमध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा किती सापेक्ष वाटा गुंतविला गेला आहे त्याचा तपशिल दिला आहे. यात सर्वाधिक वाटा पश्चिम भारतातील महाराष्ट्रासह चार केंद्रशासित भू-प्रदेशांचा वाटा ३१ टक्के तर सर्वात

कमी गुजरात आणि आंध्रप्रदेश या राज्यांचा वाटा जेमतेम ४ टक्के इतकाच आहे.

विदेशी गुंतवणूक आकृष्ट करण्याची प्रत्येक विभागाची क्षमता कमी अधिक असणे नैसर्गिकच म्हणता येईल. महाराष्ट्रासाठी मात्र सद्यस्थितीत विदेशी गुंतवणुकीसाठीचे वातावरण निश्चितच अनुकूल आहे.

३. भारतात गुंतवणूक करणारे प्रमुख देश :

खालील तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील विदेशी गुंतवणूक करणारे प्रमुख देश आणि त्यांचा भारताच्या प्रत्यक्ष विदेशी काहीशी सुधारली हे अंशतः खुल्या व्यापार धोरणाचे यश मानावे लागेल.

१. अधिकृत मान्यतेचे विदेशी गुंतवणूक प्रस्ताव आणि प्रत्यक्ष विदेशी भांडवल अंत:प्रवाह:

जरी भारतात १९८० च्या दशकात विदेश व्यापार आणि गुंतवणुकीबाबत उदार धोरण अनुसरलेले असले तरी १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणाची घोषणा होईपर्यंत विदेशी गुंतवणुकीच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली नाही. १९९१ च्या उदार धोरणामुळे मात्र या क्षेत्रात नवे वारे वाहू लागले. १९९१ मध्ये ५३४ कोटी-

तक्ता क्र. १

**भारतातील थेट परकिय गुंतवणूक (कोटी रुपयात)**

| वर्ष | गुंतवणूक प्रस्ताव | गतवर्षीच्या तुलनेत वृद्धी दर | प्रत्यक्ष विदेशी भांडवलाचा अंत:प्रवाह | गतवर्षीच्या तुलनेत वृद्धी दर | स्तंभ ४ चे स्तंभ २ शी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १९९१ | ५३४ | ० | ३५१ | ० | ६५.७ |
| १९९२ | ३८८८ | ६२८.१ | ६७६ | ९२.६ | १७.४ |
| १९९३ | ८८५९ | १२७.९ | १७८७ | १६४.३ | २०.२ |
| १९९४ | १४१८७ | ६०.१ | ३२८९ | ८४.१ | २३.२ |
| १९९५ | ३२०७२ | १२६.१ | ६८२० | १०७.४ | २१.३ |
| १९९६ | ३६१४७ | १२.७ | १०३८९ | ५२.३ | २८.३ |
| १९९७ | ५४८९१ | ५१.९ | १६४२५ | ५८.१ | २९.९ |
| १९९८ | ३०८१४ | -४३.९ | १३३४० | -१८.८ | ४३.३ |
| १९९९ | २८३६७ | -७.९ | १६८६८ | २६.४ | ५९.५ |
| २००० | ३२८४३ | १५.८ | १५४३४ | -८.५ | ४७.० |
| एकूण सरासरी | २४२६० | ९७.१ | ८५३८ | ५५.८ | ३५.६ |

स्त्रोत : *Economic Survey of India 2000-01*

गुंतवणुकीतील सापेक्ष वाटा दर्शविला आहे. खालील तक्त्यात, पहिल्या दोन क्रमांकावर जरी मॉरिशस आणि सिंगापूर हे दोन देश दिसत असले, तरी ते देश भारतात गुंतवणूक करण्या इतपत स्वतः विकसित नाहीत. गुंतवणूक करणारे इतर देश या दोन ठिकाणांचा मध्यस्थांसारखा वापर करीत असावेत. इतर प्रमुख औद्योगिक राष्ट्रांपैकी जर्मनी आणि फ्रान्स या राष्ट्रांची भारतातील गुंतवणूक आजही नगण्यच आहे.

४. विदेशी गुंतवणूक झालेली आर्थिक क्षेत्रे : (२०००-०१ ते २०१३-१४)

आतापर्यंत भारतातील विदेशी गुंतवणुकीची जी आकडेवारी उपलब्ध आहे, त्यानुसार सर्वाधिक विदेशी गुंतवणूक १८ टक्के एकमेव सेवा क्षेत्रात झालेली आहे. दुसऱ्या क्रमांकावर वस्तुनिर्माण क्षेत्र ११ टक्के, नंतर अनुक्रमे दूर संचार ७ टक्के, संगणक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर ६ टक्के, औषधी आणि ऑटोमोबाईल उद्योग प्रत्येकी ५ टक्के तर रसायन, विद्युत आणि धातू उद्योग, प्रत्येकी ४ टक्के आणि शेवटी हॉटेल व पर्यटन उद्योगात देखील एकूण विदेशी गुंतवणुकीच्या ३ टक्के भाग खर्ची पडला आहे.

५. महाराष्ट्रातील विदेशी गुंतवणूक :

अलिकडील काळात २०००-०१ ते २०१३-२०१४ या १३ वर्षात विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारे भारतातील प्रथम क्रमाकांचे राज्य म्हणून कामगिरी केली आहे. या १३ वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्राने रु. ८४,९५८ कोटी

तक्ता क्र. २

भारतातील विभाग निहाय प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे अंतप्रवाह

| अ.नं. | राज्य / विभाग | प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीतील सापेक्ष वाटा |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र, दादरा व नगर हवेली, अंदमान आणि दीव | ३१ टक्के |
| २ | दिल्ली, उत्तर प्रदेश आणि हरियाणा | १९ टक्के |
| ३ | तामिळनाडू आणि पाँडेचेरी | ६ टक्के |
| ४ | कर्नाटक | ६ टक्के |
| ५ | गुजरात | ४ टक्के |
| ६ | आंध्र प्रदेश | ४ टक्के |
| ७ | इतर | ३० टक्के |
| | एकूण | १०० टक्के |

स्त्रोत : *Department of Industrial Policy & Promotion, March 2013*

मूल्याचे एकूण ४२२१ विदेशी गुंतवणुकीचे प्रकल्प मिळविले. महाराष्ट्राला औद्योगिकरणाची ऐतिहासिक परंपरा असल्यामुळेच हे शक्य झाले. ज्या उपक्रमांमध्ये महाराष्ट्राला प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात यश मिळाले त्यात माहिती तंत्रज्ञान, वित्तिय सेवा, हॉटेल आणि पर्यटन उद्योग, व्यवसाय व व्यवस्थापन सल्ला आणि परिवहन हे उपक्रम अग्रस्थानी आहेत.

### भारतीय किरकोळ व्यापारातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक :

भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकार जे जे उपाय योजित आहे. त्यात विदेशी गुंतवणुकीसंबंधी नवीन आक्रमक धोरणे राबविण्याचा निर्धार शासनाने जाहीर केल्याचे प्रसार माध्यमांनी आपल्यापर्यंत पोहचविले आहे. १९६५ च्या औद्योगिक धोरणाने आपल्या देशात विदेशी गुंतवणुकीला निवडक क्षेत्रात प्रवेशाची संधी दिली. देशाच्या अर्थव्यवस्थेत विदेशी भांडवल येणे आवश्यक असल्याचे भान सरकारला होतेच पण त्यामुळे देशी उद्योगांची गळचेपी होवू नये. विदेशी गुंतवणुकीचा पैसा चैनीच्या उत्पादनाकडे वळू नये, अणु उर्जा व संरक्षण सामग्रीचे उद्योग संपूर्ण स्वदेशी असावेत असा समाजवादी विचारसणीचा पगडा असलेली ही धोरणे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करू शकली नाहीत. याच सुमारास १९७० च्या दशकात इंडोनेशिया सारख्या देशांनी मात्र खुलेआम गुंतवणुकदारांना आकर्षित करण्याचे धोरण अनुसरले व त्याचे तत्कालीन फायदेही

तक्ता क्र. ३

भारतातील विदेशी गुंतवणूक आणणारे प्रमुख देश

(२०००-०१ ते २०१३-१४)

| अ.नं. | देश | विदेशी भांडवल अंत:प्रवाहातील सापेक्ष वाटा % |
|---|---|---|
| १ | मॉरिशस | ३६ टक्के |
| २ | सिंगापूर | १२ टक्के |
| ३ | युनायटेड किंगडम | १० टक्के |
| ४ | जपान | ८ टक्के |
| ५ | यूएसए | ६ टक्के |
| ६ | नेदरलँड | ५ टक्के |
| ७ | सायप्रस | ३ टक्के |
| ८ | जर्मनी | ३ टक्के |
| ९ | फ्रान्स | २ टक्के |
| १० | स्वित्झर्लंड | १ टक्के |

स्त्रोत: *Datta & Sundaram (2014), 'Indian Economy'S. Chand Publication,p.p.375*

अनुभवले.

नव्या आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून विदेशी गुंतवणुकीबाबतचा जागतिक दृष्टिकोन बराच उदार झाला. साम्यवादी चीनने याच काळात विदेशी गुंतवणुकीबाबत उदार धोरणाचा अवलंब केल्यानंतर समाजवादी भारतासाठी हे धोरण वर्ज्य मानण्याची गरज राहिली नाही. भारतातील तत्कालीन अपरिहार्य परिस्थितीत विदेशी गुंतवणुकदारांना देशी उद्योग खुले करण्याचे धोरण अनुसरले. काही उद्योगात १०० टक्के तर काही उद्योगात ४९ टक्के मालकी विना परवाना देण्याचे धोरण विदेशी गुंतवणुकदारांसाठी जाहीर करण्यात आले. त्यांना मर्यादित नकाराधिकार असतो तसेच एकूण व्यवस्थापनामध्ये निर्विवाद बहुमत नसते.

४९ टक्के विदेशी भागीदारी म्हणजे विदेशी भांडवलदारांनी देशात भांडवल आणावे मात्र निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग राहणार नाही अशाच योजनेत भारतात विदेशी गुंतवणुकीचे स्वागत होत आले आहे. नव्या आर्थिक धोरणाचा अवलंब केल्यापासून संथ गतीने का होईना, जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षित करण्याचे धोरण राबविले जात आहे. पण अस्थिर सरकार, निर्णय क्षमतेचा अभाव, संथ गती शासकीय कारभार, भ्रष्टाचार, सतत बदलणारे कायदे इत्यादी अनेक जाचक परिस्थितीमुळे म्हणावी तशी विदेशी गुंतवणूक भारतात होतांना दिसत नाही.

आजवरच्या अर्थशास्त्रीय संशोधनावरून तसेच जागतिक आकडेवारीवरून एक गणित मांडले गेले आहे. हे गणित स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीशी निगडित आहे. एखाद्या देशात स्थूल देशांगतर्गत उत्पादनाच्या १ टक्का विदेशी गुंतवणूक आली तर त्या देशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादन ०.४ टक्क्यांनी वाढू शकते. या गणितानुसार आपले राष्ट्रीय उत्पादन २ टक्क्यांनी वाढविण्याचे लक्ष्य असेल तर त्यासाठी सुमारे १० हजार कोटी डॉलर्स पर्यंत असलेल्या आपल्या राष्ट्रीय उत्पादनाच्या १ टक्का विदेशी मदत म्हणजेच १०० कोटी डॉलर्स देशात येणे आवश्यक आहे. चालू वित्तीय वर्षात ६ कोटी डॉलर्सची विदेशी गुंतवणुकीची शक्यता मार्च २०१५ अखेर वर्तविण्यात येत आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२०१२-१७) भारतीय उद्योगांना १० हजार कोटी डॉलर्स इतक्या प्रचंड विदेशी गुंतवणुकीची अपेक्षा आहे. मात्र या काळात आजपर्यंत ज्या गतीने भारतात विदेशी गुंतवणूक आली, ते पाहता हे लक्ष्य उरलेल्या दिवसात साध्य होणे कठीण दिसते.

विदेशी गुंतवणूक देशात आली की उद्योग वाढतील असा ठोस पुरावाही आढळत नाही. लॅटिन अमेरिकेत शेती आणि खाण उद्योगात विदेशी गुंतवणूक झाली तेव्हा पूरक उद्योग वाढलेच नाहीत, परंतु देशांतर्गत विपुल नैसर्गिक साधन संपत्तीची लूट मात्र झाली.

आतापर्यंत भारतात आलेली विदेशी गुंतवणूक जास्तीत जास्त सेवा उद्योगात आली आहे. या बाबतीत भारताचा अनुभव चांगला आहे. विमान कंपन्या, हॉटेल्स, संगणक आणि विमा यासारख्या सेवांमधील प्रोत्साहित केलेली विदेशी गुंतवणूक भारतीय सेवांची गुणवत्ता सुधारणेस कारणीभूत ठरली आहे. या सेवांच्या गुणवत्ता सुधारल्यामुळे त्याचा फायदा भारतीय उद्योगांना देखील झाला आहे. संगणक उद्योगातील विदेशी गुंतवणूक भारताच्या लाभाची ठरली हे

गेल्या दोन दशकातील आकडेवारीवरून सिद्ध होते. विमा क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला अधिक वाव दिल्यामुळे भारतीय उद्योगांची गतीमान वृद्धी होण्यास हातभारच लागेल.

जागतिक पातळीवर अर्थतज्ज्ञांत एका मुद्यावर एकमत आहे, उत्पादन आणि मूलभूत सेवांमधील विदेशी गुंतवणूक त्या त्या देशाच्या विकासाला चालना देणारी असते. भारतीय अर्थव्यवस्थेचा अनुभव या विधानाशी सुसंगत असाच आहे. म्हणूनच भारतात येणाऱ्या विदेशी भांडवलाची आवक सुयोग्य वस्तु उत्पादन आणि मूलभूत सेवा उद्योगांकडे प्रवाहित करता आली पाहिजे. *मेक इन इंडिया* सारखी धोरणे सक्षमपणे राबविली गेली पाहिजेत. भारतातील राज्या-राज्या दरम्यान आपल्याकडे अधिकाधिक विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्या बाबत तीव्र स्पर्धा असली पाहिजे.

अर्थात, विदेशी गुंतवणूकदार भांडवलाच्या पिशव्या घेऊन भारताच्या उंबरठ्यावर रांग लावून उभे नाहीत तर त्यांना आकर्षित करावे लागेल. या बाजारात तीव्र जागतिक आणि देशांतर्गत स्पर्धाही आहे. चीन, रशिया, ब्राझील, दक्षिण अफ्रिका या सारखे देश स्पर्धेत आहेतच. या खेरीज देशांतर्गत दिल्ली (नोएडा), महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू इत्यादी प्रगत राज्ये आणि केंद्रशासित भूप्रदेशांदरम्यान देखील विदेशी गुंतवणूक आपल्याकडे ओढण्याबाबत तीव्र स्पर्धा आहे, म्हणून ही समस्या दुहेरी बनते. पहिल्या टप्प्यात ती भारतात कशी आणावी? दुसऱ्या टप्प्यात देशात येणाऱ्या विदेशी गुंतवणुकीचे राज्ये आणि केंद्रशासित भूप्रदेशांमध्ये न्याय्य वाटप कसे घडवून आणावे, ज्यातून गतिमान विकास आणि प्रादेशिक समतोल यांचा सुवर्णमध्य साधला जाईल.

जागतिक बाजारपेठेत पैसा भरपूर आहे आणि भारताची विदेशी गुंतवणुकीची गरज देखील निर्विवाद आहे, मात्र ती उभारण्यात कोणत्या अडचणी आहेत, तिच्या वापराचे कोणते संभाव्य लाभ आणि आव्हाने आहेत, ती आव्हाने पेलण्यासाठी काय करावे लागेल, विदेशी गुंतवणुकीच्या प्रश्नाकडे शुद्ध अर्थकारणाच्या भूमिकेतून पाहतांना आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या डावपेचांना कसे सामोरे जावे, विदेशी गुंतवणूक कोणत्या क्षेत्रात स्वागतार्ह आणि कोणत्या क्षेत्रात अवांछनीय आहे, देशांत आलेल्या आणि येऊ घातलेल्या विदेशी गुंतवणुकीचे देशांतर्गत न्याय्य वाटप कसे आयोजित करता येईल या सारख्या विविध पैलूंवर चर्चा होऊ शकते.

### किरकोळ व्यापार क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक:

भारतात आज किरकोळ व्यापारात विदेशी गुंतवणुकीचे स्वागत करावे किंवा नाही यावर जोरात चर्चा सुरू आहे. सर्वसाधारणपणे सेवा क्षेत्रातील गुंतवणूक भारताला लाभदायक सिद्ध झाल्याचा एक दृष्टीकोन आहे. दुसरा टोकाचा दृष्टीकोन हा आहे की, नाक्या-नाक्यावरील पारंपरिक किराणा दुकाने बंद पडतील आणि दुकानदारी बंद होऊन त्यांचे मालक आणि नोकर देशोधडीला लागतील. आधुनिक मॉल्स हा प्रकार भारतात १९८५ च्या सुमारास अस्तित्वात आला व तो सुरवातीच्या काळात महानगर आणि १० लाख लोकसंख्येच्या शहरातच स्थापन झाला. बहुविध उत्पादनाची मांदियाळी, झगझगीत रोषणाई, विशाल दालनातून आकर्षक वेष्टनात सजावटीने मांडलेल्या काही देशी, काही विदेशी

वस्तू वातानुकूलीत पर्यावरणात सहजपणे निरखत पारखता याव्यात असे स्वप्ननगरी सारखे वातावरण ग्राहकांना आपल्याकडे आकृष्ट करू शकले नसते तरच नवल ! प्रारंभी मोठ्या शहरातच मॉल्स उघडले आणि प्रथमच किरकोळ व्यापारातील संघटित घटक म्हणून ओळखले जाऊ लागले. पारंपरिक किरकोळ व्यापारी असंघटितच होते आणि ते आजही आहेत. संघटित क्षेत्र हळूहळू लहान शहरे आणि निम शहरी भागात पसरत जाईल आणि नाक्यावरच्या किरकोळ व्यापाऱ्यांची अस्तित्वाची लढाई सुरू होईल या भयापोटी या चंचू प्रवेशाला प्रखर विरोध झाला, परंतु आर्थिक सुधारणेसाठी वचनबद्ध असलेल्या पूर्वीच्या आणि नुकतेच निवडून आलेल्या भाजप सरकारांनी कानाडोळा करून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम पुढे रेटण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

किरकोळ क्षेत्रातील विदेशी एक-मुद्रा (Single Brand) आणि बहु-मुद्रा (Multi Brand) किरकोळ व्यापारात विदेशी गुंतवणुकीचे स्वागत अलिकडच्या सत्तांतरानंतरही सुरू राहिले. केंद्र सरकारने नोव्हेंबर २०११ मध्ये केलेल्या एका घोषणेनुसार २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात बहु-मुद्रा किरकोळ व्यापारात ५१ टक्के पर्यंत आणि एक-मुद्रा किरकोळ व्यापारात १०० टक्के विदेशी भागीदारीस मान्यता मिळाली. यातील ४९ टक्के गुंतवणूक सरळ स्वयंशासित मार्गाने करता येते. मात्र यापेक्षा अधिक, ५० टक्के ते १०० टक्के गुंतवणूक शासकीय मान्यतेनंतरच करता येईल अशी तरतूद आहे. ही विदेशी गुंतवणूक किमान १० लाख लोकसंख्येच्या शहरात आणि भांडवल किमान १० कोटी अमेरिकन डॉलर पर्यंत करण्याचे बंधन आहे. या भांडवलापैकी किमान ५० टक्के गुंतवणूक पायाभूत सुविधांमधील असेल. या उपक्रमांनी आपल्या एकूण खरेदीच्या किमान ३० टक्के माल भारतीय लघु उद्योग क्षेत्राकडून खरेदी केला पाहिजे. या कठोर अटींमागचे हेतू सहज लक्षात येतात ते असे की त्यामुळे असंघटित किरकोळ व्यापाऱ्यांपुढील आव्हानांची तीव्रता निदान पहिल्या टप्प्यात महानगरापुरती मर्यादित ठेवता येईल. दरम्यान असंघटित किरकोळ व्यापाऱ्यांना त्यांचे व्यवस्थापन सुधारून कार्यक्षमता वाढीद्वारे संघटित मॉल्सशी स्पर्धाक्षम बनण्याइतपत वेळही मिळेल. या खेरीज पायाभूत सुविधांमधील अनिवार्य गुंतवणुकीमुळे देशांतर्गत रोजगार वाढून पर्यायाने देशांतर्गत अर्थव्यवस्थेला मजबुती मिळेल. तसेच झालेली विदेशी गुंतवणूक देशाबाहेर जाण्याचा धोका ही कमी होईल. भारतातील लघु उद्योग, कृषी आणि संलग्न सेवांच्या उत्पादन व रोजगार वाढीला चालना मिळेल.

किरकोळ व्यापारात विदेशी भांडवलाचा सहभाग स्वीकारणारा भारत हा एकमेव देश नाही. १९८५ मध्ये केवळ दक्षिण आशियातील चीन, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, फिलीपिन्स, थायलंड, मलेशिया आणि भारत या सर्वांमध्ये भारताची संघटित किरकोळ व्यापारातील गुंतवणूक सर्वात कमी असून ती एकूण किरकोळ क्षेत्राच्या जेमतेम २ टक्के होती. चीनमध्ये ती २० टक्के होती. भारताचा ९८ टक्के किरकोळ व्यापार आजही असंघटित क्षेत्रात टिकून आहे. मलेशिया, थायलंड आणि फिलीपिन्स या देशांनी अनुक्रमे ५० टक्के, ४० टक्के, आणि ३५ टक्के पर्यंतचा किरकोळ व्यापार संघटित क्षेत्राकडे वळवला आहे. त्या मानाने भारतात या क्षेत्रातील गुंतवणुकीची

केवळ सुरूवात म्हणता येईल. आगामी काळात संघटित किरकोळ व्यापार लहान मोठ्या शहरात आणि निमशहरी भागात प्रदर्शनी परिणामामुळे विस्तारत जाईल ही शक्यता आपण गृहीत धरली पाहिजे. त्याचा अपेक्षित अनुकूल परिणाम आपल्या पारंपरिक किरकोळ विक्रेत्यांकडून दर्जेदार वस्तू रास्त भावात मिळाव्यात हा आहे. संघटित मॉल्स आगामी काळात तीव्र स्पर्धा निर्माण करून हे घडवून आणतील त्यामुळे आपल्यासाठी एक आपत्ती नव्हे, तर इष्टापत्ती समजून तिचे स्वागत करण्यातच शहाणपण आहे. २००५ मध्ये भारताच्या किरकोळ व्यापाराच्या संघटित क्षेत्रात विदेशी गुंतवणूक जेमतेम ३ टक्के होती ती २०१४ मध्ये १२ टक्क्यापर्यंत म्हणजे चारपटीने वाढली. २०२० पर्यंत ती २१ टक्क्यापर्यंत अथवा २००५ च्या तुलनेत सात पटींनी वाढेल असा अंदाज आहे.

या संदर्भात नागपूर महानगरातील अलिकडील एक अध्ययन, ज्यात १५० किरकोळ असंघटित दुकानदार आणि तितक्याच संख्येतील ग्राहकांचे सर्वेक्षण बरेच बोलके आहे. या अध्ययनावरून असे दिसून आले आहे की, किरकोळ बाजाराचे स्वरूप बदलत असल्याची जाणीव ६७ टक्के ग्राहकांना आहे, तसेच १०० टक्के किरकोळ विक्रेत्यांना मॉल्सच्या उदयामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेच्या तीव्रतेची जाणीवही आहे. त्यांच्यापैकी ९८ टक्के विक्रेत्यांना ग्राहकांच्या मॉल्सकडे वाढलेला कल मान्य आहे. परंतु तरीही सर्व उपभोक्ते सर्वकाळ मॉल्सकडे वळत नाहीत याची जाणीव असलेले हे विक्रेते घाबरलेले नाहीत.

अमरावती शहरातील असे एक अध्ययन ६ मॉल्स आणि त्यांच्या ४०० ग्राहकांच्या नमुन्यावर आधारित आहे. या अध्ययनाचे निष्कर्ष बऱ्याच प्रमाणात नागपूर च्या अनुभवाशी मिळते जुळते आहेत. मॉल्सला नियमित भेटी देणारे ६५ टक्के ग्राहक ३० ते ५० या वयोगटातील आहेत. त्यात ५४ टक्के पुरूष आणि ४६ टक्के स्त्रियांचा समावेश आहे. ७६ टक्के ग्राहक उच्च विद्याविभूषित आहेत. ग्राहकांमध्ये सर्वाधिक व्यावसायिक, दुसऱ्या क्रमांकावर नोकरदार आणि त्यांची एकत्रित टक्केवारी ६६ टक्के होते. गृहिणीचे प्रमाण २८ टक्क्यांच्या जवळपास आहे. उच्च, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटातील ग्राहकांचे प्रमाणे ६२ टक्के आहे. ९४ टक्के ग्राहकांना ब्रँडेड (मुद्रित) वस्तूंची जाणीव आहे आणि ८८ टक्के ग्राहकांना किरकोळ व्यापारातील विदेशी गुंतवणुकीचे स्वागत व्हावे असे वाटते.

**काही आक्षेप :**

किरकोळ व्यापारातील विदेशी गुंतवणुकीविरूद्ध अनेक आक्षेप आहेत. त्यातील बहुतांश पूर्वग्रह अथवा गैरसमजातून निर्माण झाले आहेत. त्यापैकी, एक म्हणजे असंघटीत क्षेत्रात सुमारे २ दशलक्ष लोकांसाठी रोजगार निर्माण होईल पण असंघटीत क्षेत्रातील ४ कोटी लोकांचा रोजगार संकटात येईल ही शंका निराधार आहे. मात्र याचे दृष्य पुरावे आजपर्यंत पुढे आलेले नाहीत. याचे कारण असे की, अति लहान दुकानदार फक्त स्वतःसाठी रोजगार निर्माण करतात आणि काटकसरीसाठी पगारी नोकर ठेवीतच नाहीत. मोठे व्यापारी देखील नोकरांची संख्या किमान ठेवण्याचा प्रयत्न करतात तसेच लहरीनुसार त्यांना केव्हाही कामावरून काढून टाकतात. या उलट मॉल्समधील रोजगार प्रतिष्ठेचा, शाश्वत आणि बऱ्यापैकी वेतन तसेच वेतनेतर सवलती देणारा असतो. एकेका मॉल्सची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष

रोजगार निर्मितीची क्षमता सहज लक्षात येण्या इतपत मोठी असते. आगामी काळात मॉल्स आपला पसारा वाढविणार आहेत. त्या सोबतच पायाभूत सुविधा, विदेशी गुंतवणुकीतून आणि शासनाच्या सार्वजनिक खर्चातून वाढणार आहेत. त्यामुळे एकूण रोजगारात घट होण्याऐवजी वाढच होण्याची शक्यता अधिक आहे.

मॉल्समुळे चंगळवाद वाढीस लागेल हा देखील असाच गैरसमजातून आलेला आक्षेप आहे. उत्तर महाराष्ट्रातील मॉल्सवर एका संशोधिकेचे काम सुरू आहे. तिचे प्राथमिक निरिक्षण असे सांगत की, दर्जेदार माल, वाजवी किंमती आणि मुक्त अवलोकनाची संधी हेच निकष उपभोक्ते महत्त्वाचे मानतात. केवळ प्रतिष्ठेसाठी अथवा पैशाची उधळण करण्यासाठी विदेशी भांडवलाचा सहभाग असलेल्या संघटीत मॉल्सला लोक जवळ करीत नाहीत.

## सारांशः

किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीचे अस्तित्व अटळ आहे. काळाबरोबर येणारा हा बदल विधायक समजून त्याकडे ईस्ट इंडिया कंपनीच्या आर्थिक नि:स्सारणासारखे पाहिले जावू नये. आर्थिक सुधारणेचा एक अविभाज्य घटक म्हणून संघात किरकोळ व्यापाराचा स्वीकार करणेच योग्य होईल.

सद्यस्थितीत भारतासाठी विदेशी गुंतवणूक होण्यास अनुकूल वातावरण आहे. मात्र त्यासाठी राज्य सरकारचे औद्योगिक धोरण उद्योगस्नेही असणे हे तितकेच महत्त्वाचे असते. देशातील, उद्योग स्नेही राज्यांची क्रमवारी अलिकडेच केंद्रसरकाने Department of Industrial Policy and Promotions मार्फत आणि जागतिक बँकेच्या सहाय्याने तयार केली आहे. आपल्या राज्याच्या औद्योगिक धोरणातील त्रुटी या निमित्ताने अधोरेखित झाल्या आहे. या यादीत गुजरात राज्य ७१.१४ टक्के गुणांसह पहिल्या क्रमांकावर आणि महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर आहे. उद्योग स्नेही धोरणाचे निकष यासाठी निश्चित करण्यात आले होते. महाराष्ट्रात मात्र सर्व निकष अनुकूल नाहीत. अलिकडील सत्तांतराने लोकांनी मोठ्या सकारात्मक बदलाची अपेक्षा ठेवली आहे. त्यानुसार आश्वासनांची वृष्टी सुरू आहे. मात्र त्यासाठी निश्चितच वाट पाहण्याची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१.Mishra S.K. & Puri, (1991) Indian Economy, Himalaya Publishing House, Mumbai, pp. 868-69

२.घोष अलक (१९६६) 'Indian Economy : Its Nature and Problems' World Press Pvt. Ltd., Culcutta - 12 pp. 620-21.

३.गोखले, रामचंद्र महादेव (१९८०) 'स्वातंत्र्यपूर्व भारताचा आर्थिक इतिहास' कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. ९९

४.Dewtt, K.K., Varma, J.D. (1965) Refresher Course in IndianEconomy, Premier Publisheing House, Delhi, PP. 332-33

५.देशमुख प्रभाकर (१९८२), 'आर्थिक धोरण आणि नियोजन' विदेशी मदतीवरील प्रकरण, पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. २२८, २९

६.Mishra S.K. & Puri, V.K. (1989) Indian Economy, 7th Edition, Himalaya Publishing House, Mumbai, pp. 836-37

७.ईश्वरन, मुकेश आणि कोतवाल, अशोक (१९९४) "Why Poverty Persistes in India? An Analytical Framework for Understanding In-

dian Economy", Oxfored University Press, p. 93

८.Pangaria. Arvid (2008) 'India : The Emerging Giant - The External Sector' Oxford Unicersatiy Press, 2008, P. 199

९.Harrison, Ann (1994) 'Potential Benefits of FDI for Less Developed Countries' Columbia Journal of world Business, pp. 7-9

१०.Kothari, S.S. (1992) 'Economic Strategies for Growth in Developing Countries, pp. 170-71

११.Benad Hokeman, Aditya Mattoo and Philip English (Editors) (2002) 'Liberalization of Trade in Services in Developing Countries' Development of Trade and the WTO, World bank Atlantic, New Delhi, p. 21

१२.W. Charles Sawyer, Richard L. Sprinle (2004) 'International Economics' Second Edioction, Persona Pratice Hall, PP. 469-75.

१३.डॉमनिक साल्वातोर (२००५) 'Introduction to International Economics' First Edition, Johan Wiley & Sons, pp. 225-26.

१४.Soderstan, B.O. and Reed Geoffery (1970) 'International Economics (Third Edition) Direct Investment and Multi-national Enterprise Macmillann, Hampshire Co. London.

१५.दत्त, रूद्र आणि सुंदरम, के.पी. एम.(२०१०) 'विदेशी सहाय्यता और भारत का आर्थिक विकास' (हिंदी) पृ. ३१३-३०

१६.गोडबोले, अच्युत (२००९) 'अर्थात' अर्थशास्त्राचा इतिहास, सिद्धांत अनचरित्र यांची रंजक सफर, पॉल क्रूगमन, पृ. ३८८-९३.

१७.गोडबोले, अच्युत (२००९) पूवोक्त, पृ. ४२३-२४

१८.विरखडे, डब्ल्यू, एन. (२०१४) 'थेट विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम', Proceedings of UGC sponsored National Conference on Effect of Foregn Direct Investment of Retail Sector in India. NCFDI 2015, 187, 188

१९.घैसास, दीपक (२०१५) 'परदेशी गुंतवणुकीची निकड' अर्थविकासाचे उद्योग स्तंभ, लोकसत्ता, मुंबई आवृत्ती, जानेवारी९ २०१५ पृ. ७

२०.घैसास, दीपक (२०१५) पूर्वोक्त

२१.Gosavi, B.S. (2015) SWOT Analysis : Foreign Direct Investment in Retail Sector, Vidya Bharati Inter-disciplinary Journal (Karanja Lad) pp. 105-07.

२२.राऊत, ए.एस. (२०१५) 'किरकोळ विक्री क्षेत्रावर थेट विदेशी गुंतवणुकीचा परिणाम', स्त्रोत, पूर्वोक्त पृ. १०१

२३.Kale, P.W. (2015) 'Retails Sector in India' Source Ibid. p. 125

२४.राऊत, ए.एस. (२०१५) पूर्वोक्त पृ. १०२

२५.गुल्हाने, एस. के. (२०१५)'थेट परकीय गुंतवणुकीचा कृषी अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम' संदर्भ पूर्वोक्त पृ. १-२

२६.Deshpande, M(2015) 'FDI in Retail Sector : Impact on Small Retailers (With Ref. to Nagpur City)' Ibid.pp 319-21

२७.Katait, S.K. (2015) 'Impact of Retail FDI on Indian Consumer' Ibid.pp 331-37

२८.खांडेकर, व्ही. व्ही. (२०१५) 'भारतातील किरकोळ व्यापार सुधारणांचे फायदे तोटे', पूर्वोक्त पृ. ३३७-३३९.

# अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगाची स्थिती

**सादिक बशीर सय्यद**, कर्जत,
सहयोगी प्राध्यापक,
दादा पाटील महाविद्यालय, जि.अहमदनगर
भ्रमणध्वनी: ९२७००१७८७६
ई-मेल: sadiksayyed66@gmail.com

## प्रास्ताविक:

भारतामध्ये ऊसाचे उत्पादन प्राचीन काळापासून घेतले जाते. चिनी ग्रंथात भारत हा ऊसाचे उगमस्थान असलेला देश असा उल्लेख आढळतो. ऊस उत्पादनाबाबत भारताचा जगात द्वितीय क्रमांक आहे. जगात ब्राझील, ऑस्ट्रेलिया, क्युबा, भारत, मेक्सिको या देशांमध्ये प्रामुख्याने ऊस उत्पादन जास्त प्रमाणात घेतले जाते. भारतात प्रामुख्याने ग्रामीण भागात ऊस कारखानदारीने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. भारत हा साखर उत्पादनात जगातील चौथ्या क्रमांकाचा देश आहे. पहिल्या तीन मोठ्या देशात रशिया, ब्राझील आणि क्युबा हे जगातील सर्वात जास्त साखर उत्पादन करणारे देश आहेत.

भारतात साखर कारखानदारीमुळे अल्कोहोल, वीजनिर्मिती, कागद, ॲसिड, पशुखाद्य, मिठाई, इथेनॉल इत्यादींमुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते. याबरोबरच ग्रामीण रोजगारीची समस्या सोडविण्यासाठी ऊस कारखानदारीचा फार मोठा वाटा आहे. साखर उद्योगामार्फत ३.२५ लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच ऊस लागवड करण्याऱ्या ४५ दशलक्ष शेतकऱ्यांना अप्रत्यक्षपणे रोजगार मिळालेला आहे. देशातील सुमारे ७० % उत्पादन उत्तर भारतामध्ये तयार होते. उत्तर भारतामध्ये उत्पादन जरी जास्त असले तरी ऊस वाढीस हवामान प्रतिकूल असल्याने ऊसाचे व साखरेचे उत्पादन दक्षिण भारतातील राज्यांपेक्षा कमी आहे. दक्षिण भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, ओरिसा व केरळ ही राज्ये ऊस उत्पादनात अग्रेसर आहेत. या राज्यांपैकी महाराष्ट्रात सर्वात जास्त उत्पादन होते. अलिकडील दशकात महाराष्ट्रातील ऊस आणि साखर

कारखानदारीला विविध समस्यांनी ग्रासले आहे.

संताची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७४१०.९१ चौ.कि.मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६ टक्के आहे. साखर उद्योग क्षेत्रात अहमदनगर जिल्हा प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्म्याहून अधिक साखरेचे उत्पादन एकट्या अहमदनगर जिल्ह्यात केले जाते असे असले तरी आजच्या दशकात अहमदनगर जिल्ह्यातील ऊस आणि साखर कारखानदारीला विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रस्तुत शोध निबंधात अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांचा उगम, सद्यस्थिती, समस्या आणि भवितव्य यांचा सविस्तर परामर्श घेतला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांचा इतिहास मांडणे, अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांची सद्य:स्थिती अभ्यासणे, अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांच्या समस्या अभ्यासणे, अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांच्या भवितव्याचा अभ्यास करणे, अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगांच्या समस्येवर धोरणात्मक शिफारशी सूचविणे ही अभ्यासाची उद्दिष्टे आहेत.

### साखर उद्योगाचा इतिहास:

सहकार चळवळीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथमपासून अग्रेसर आहे. सन १९५० मध्ये आशिया खंडातील सहकारी तत्त्वावरील पहिला साखर कारखाना सहकार महर्षी डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर (लोणी) येथे सुरू केला.

अहमदनगर जिल्ह्यात सन २०१२-१३ या कालावधीत एकूण साखर कारखान्यांची संख्या २२ एवढी होती. त्यापैकी सहकारी तत्त्वावर चालणारे १७ कारखाने (७७.२७ %) असून पाच साखर कारखाने खासगी तत्त्वावर(२२.७३%) कार्यरत आहेत. याच कालावधीत सहकारी साखर कारखान्यांपैकी ४ साखर कारखान्यांचे गळित हंगाम बंद होते. तर एका खासगी कारखान्याचा गळित हंगाम बंद आहे. अहमदनगर जिल्ह्यात १९५० ते २०१२-१३ या ६३ वर्षांच्या कालावधीत सहकारी व खासगी तत्त्वावरील कारखान्यांची उभारणी मोठ्या प्रमाणात झाल्याने अहमदनगर जिल्ह्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत झाली आहे.

### साखर उद्योगाची सद्यस्थिती:

अहमदनगर जिल्ह्यात सन १९५० मध्ये सुरू झालेल्या पहिल्या सहकारी साखर कारखान्यानंतर उत्तरोत्तर दुसरा राहुरी सहकारी साखर कारखाना सुरू झाला. यानंतर सन २०१२-१३ पर्यंत १७ सहकारी तत्त्वावर आणि ५ खासगी तत्त्वावर साखर कारखान्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ मध्ये कार्यरत असलेल्या सहकारी व खासगी कारखान्यांमध्ये एकूण ६१६५ नियमित व ६४५३ हंगामी कामगार काम करत आहेत. यातही सर्वात जास्त ९४२ नियमित कामगार एकट्या संगमनेर सहकारी साखर कारखान्यात आहे त्याचे एकूण नियमित कामगारांशी १५.२८ टक्के प्रमाण आहे. संजीवनी सहकारी साखर कारखान्यात नियमित ८४२ कामगार असून त्याचे प्रमाण १३.६६ टक्के

आहे. तर तनपुरे सहकारी साखर कारखान्यात नियमित ५५६ कामगार असून त्याचे प्रमाण ९.०२ टक्के आहे. अहमदनगर जिल्ह्यातील एकूण साखर कारखान्यातील नियमित कामगारांपैकी ३७.९६ टक्के कामगार दिसून आले.

सन २०१२-१३ यावर्षी हंगामी कामगारांचा विचार करता एकूण ६४५३ कामगार काम करत होते. यात ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यात १०६७ कामगार काम करत होते. त्याचे प्रमाण १६.५३ टक्के आहे. मुळा सहकारी साखर कारखान्यात हंगामी ८०५ कामगार काम करत होते. त्याचे प्रमाण १२.४७ टक्के आहे. तर अशोक सहकारी साखर कारखाना लि. अशोकनगर येथे हंगामी तत्त्वावर ७६७ कामगार काम करत होते. त्याचे प्रमाण ११.८८ टक्के आहे. या तीनही कारखान्यात एकूण हंगामी कामगारांपैकी २६३९ कामगार काम करत होते. त्याचे प्रमाण ४०.८९ टक्के होते. अहमदनगर जिल्ह्यात कारखान्यांची गळित क्षमता वेगवेगळी आहे. त्यातच सर्वात जास्त खासगी तत्त्वावरील साईकृपा साखर कारखाना लि. हिरडगाव यांची क्षमता सर्वात जास्त ७५०० मे. टन प्रती दिवस आहे. त्याखालोखाल ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. नेवासा या कारखान्याची गळीत क्षमता ६००० मे.टन प्रतिदिवस इतकी आहे. तर तनपुरे सहकारी साखर कारखाना लि. राहुरी फॅक्टरी याची गळीत क्षमता ४२५० मे.टन प्रतिदिवस आहे.

अहमदनगर जिल्ह्यात सन २०१२-१३ या वर्षात एकूण प्रत्यक्ष गाळप ८७,६९,५०१ मे. टन इतके झाले होते. त्यातही सर्वात जास्त गाळप पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे झाले. या कारखान्यात एकूण प्रत्यक्ष गाळपापैकी ९,३४,३०५ मे.टन इतके गाळप झाले. त्याचे प्रमाण १०.६५ टक्के इतके होते. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. नेवासा येथे ८,९६,४८७ मे.टन इतके प्रत्यक्ष गाळप झाले त्याचे प्रमाण १०.२२ टक्के होते. तसेच संगमनेर सहकारी साखर कारखाना लि. संगमनेर येथे ७,९२,०४७ मे.टन इतके प्रत्यक्ष गाळप झाले त्याचे प्रमाण ९.०३ टक्के होते. एकूण प्रत्यक्ष गाळपात वरील कारखान्यांचे योगदान २६,२२,८३९ मे. टन इतके आहे. त्याचे प्रमाण २९.९१ टक्के आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखान्यातील एकूण साखर उत्पादनांचा विचार करता सन २०१२-१३ मध्ये एकूण साखरेचे उत्पादन ९,५६,४८६ मे. टन इतके होते. यात सर्वात जास्त साखर उत्पादन ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. नेवासा याचे ९८,६२५ मे. टन इतके होते. त्यांचे प्रत्यक्ष गाळप ८,९६,४८७ मे. टन कमी असतानाही साखर उत्पादन प्रथम क्रमांकाचे आहे. त्याचे प्रमाण १०.३१ टक्के होते. त्याखालोखाल संगमनेर सहकारी साखर कारखाना लि. संगमनेर यांचेही प्रत्यक्ष गाळप ७,९२,०४७ मे.टन कमी असतानाही साखर उत्पादन अधिक आहे. त्याचे साखर उत्पादन ९६५१४ मे. टन होते त्याचे प्रमाण १०.०९ टक्के होते. तर पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर यांचे प्रत्यक्ष गाळप ९,३४,३०५ मे. टन जास्त असतानाही साखरेचे उत्पादन ९३,४३० मे.टन होते त्याचे प्रमाण ९.७७ टक्के होते. या तीनही कारखान्यांचे एकूण साखर उत्पादन २,८८,५६९ मे. टन असून त्याचे प्रमाण ३०.१७ टक्के आहे.

अहमदनगर जिल्ह्यात इतर उत्पादनात

पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्यात १०,६२४ मे.टन इतके इथेनॉल तयार होते. तर ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यात ३२९ मे.टन इतके उत्पादन होते. इतर साखर कारखान्यात इथेनॉलचे उत्पादन होत नाही. तसेच एकूण मद्यार्काचे उत्पादन जिल्ह्यात २४,३४२ हजार लिटर्स होते. त्यात पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्यात ९९६१ हजार लिटर्स इतके उत्पादन होते. त्याचे प्रमाण ४०.९२ टक्के इतके होते. मुळा सहकारी साखर कारखान्याचे मद्यार्क उत्पादन ६२४१ हजार लिटर होते. त्याचे प्रमाण २५.६४ टक्के इतके होते. कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. कोळपेवाडी याचे ५८९२ हजार लिटर मद्यार्क उत्पादन होते त्याचे प्रमाण २४.२० टक्के इतके आहे. तसेच साखर कारखान्यात वीज उत्पादन केले जाते एकूण वीज उत्पादन ११२ मेगा वॅट इतके होते. त्यापैकी साईकृपा साखर कारखाना लि. हिरडगाव या खासगी कारखान्यात सर्वात जास्त म्हणजे ४० मेगा वॅट इतकी वीज निर्माण होते. त्याचे प्रमाण ३५.७१ टक्के होते. मुळा सहकारी साखर कारखाना लि. सोनई येथे १६ मेगा वॅट वीज निर्मिती होते. त्याचे प्रमाण १४.२८ टक्के होते. तर जगदंबा सहकारी साखर कारखाना लि. राशीन येथे १५ मेगा वॅट वीज निर्माण होते. त्याचे प्रमाण १३.३९ टक्के होते. अहमदनगर जिल्ह्यातील सन २०१२-१३ मधील सद्यस्थितीत साखर कारखान्यांची प्रगती दिसत असली तरी प्रत्यक्षात, राहाता तालुक्यातील गणेश सहकारी साखर कारखाना लि. गणेशनगर, शेवगाव तालुक्यातील केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि. शेवगाव, नगर तालुक्यातील नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि. वाळकी, पारनेर तालुक्यातील पारनेर सहकारी साखर कारखाना लि. देवी भोयरे व श्रीगोंदा तालुक्यातील साईकृपा साखर कारखाना लि. देवदैठण(खासगी) हे कारखाने या कालावधीत बंद आहेत.

जिल्ह्यातील साखर उद्योगांच्या समस्या:

साखर उद्योग हा कृषी उद्योग असल्याने कृषी उत्पादनात होणाऱ्या चढउतारानुसार या उद्योगाच्या उत्पादनातही चढउतार होताना दिसतात. अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगाला खालील समस्यांना तोंड द्यावे लागते.

कच्च्या मालाची समस्या:

ऊसाचा पुरवठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. ऊसाच्या उत्पादनात झालेल्या चढ उताराबरोबरच साखरेच्या उत्पादनातही चढ उतार होतात. ऊसाच्या कमतरतेमुळे साखर कारखान्यांना आपल्या उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर करता येत नाही.

ऊसाचा निकृष्ट दर्जा:

अहमदनगर जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने ऊस पिकवत नसल्यामुळे त्यांचे ऊसाचे उत्पादन व दर्जा यावर नियत्रंण राहत नाही.

उत्पादन खर्च जास्त:

साखर कारखान्यांची अकार्यक्षमता, उत्पादन क्षमतेचा अपुरा वापर, जुनाट यंत्रसामग्रीचा वापर ही कारणे उत्पादन खर्च जास्त असण्यास जबाबदार आहेत.

गळीत हंगाम लहान:

नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत १२० दिवसच कारखाने चालू असतात. वर्षातला मोठा काळ कारखाने बंद असल्याने कारखान्याची उत्पादन क्षमता वाया जाते.

उपवस्तुंच्या निर्मिती सबंधीची समस्याः

ऊसापासून साखरेचे उत्पादन केले जात असताना चिपाडे, मळी या पदार्थांचा योग्य वापर केल्यास साखरेचा उत्पादन खर्च कमी होणे शक्य होते. कागद, खत, मद्यार्क, इथेनॉल, यांचे उत्पादन सर्व कारखान्यात होत नाही.

शासकीय धोरणः

साखर कारखान्यावर लेव्ही आकारल्याने कमी किंमतीला साखर सरकारला विकावी लागते. तसेच मळीची किंमत व वितरण यावरही सरकारचे नियंत्रण आहे.

जिल्ह्यातील साखर उद्योगाचे भवितव्यः

इथेनॉल, मद्यार्क, याचे उत्पादन वाढविणे, साखरेचा बफर साठा वाढविणे, अधिक सबसिडी देऊन तिची निर्मिती वाढवणे, साखरेची किंमत आणि ऊसाचे दर यांचा थेट सबंध जोडण्यात यावा. या रंगराजन समितीच्या शिफारशीचा विचार करणे हे या उद्योगाला वाचविण्याचे खरे मार्ग आहेत. साखर निर्यात करायची तर जागतिक बाजारभावाशी स्पर्धा करणे क्रमप्राप्त आहे. स्पर्धा तर दूरच पण देशी साखर महाग आणि आयात साखर स्वस्त अशी वेळ येऊ घातली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ साखर कारखाने आणि शेतकरी यांच्यापुरताच मर्यादित राहिलेला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. एकीकडे ज्या सहकारातून हे उद्योग उभे राहिले त्या सहकारात सभासद हा मालक आणि संचालक हे विश्वस्त हे सूत्र राजकीय संचालकांनी पायदळी तुडवल्याने कारखानदारांच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची मानसिकता शेतकऱ्यात उरलेली नाही. तर दुसरीकडे साखरेचा बाजारभाव आता कोणाच्या हातात राहिला नाही. त्यामुळे प्रश्न फक्त आर्थिक तुटी पुरता मर्यादित नाही. ही तूट भरुनही निघेल पण भावना आणि विश्वासाचा बॅकलॉग भरून काढण्याचे खरे आव्हान अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी व खासगी साखर कारखान्यांना पेलावे लागणार आहे.

साखर उद्योगाच्या समस्येवर धोरणात्मक शिफारशीः

अहमदनगर जिल्ह्यात अनेक साखर कारखान्यांनी अजूनही जुनी एफ आर पी. प्रमाणे थकित देणी पूर्ण केली नाहीत. त्यातच एफ आर पी जाहीर करताना साखरेचा दर ३३ रुपये होता. गेल्या वर्षभरात साखरेचा सरासरी दरमात्र २२ रुपयांपर्यंत घसरला आहे. थकीत एफ आर पी चा प्रश्न यातूनच निर्माण झाला. यावर नियंत्रण आले नाही तर साखर उद्योग कोलमडू शकतो.

अहमदनगर जिल्ह्यात सध्या दुष्काळाची छाया आहे. या भागात हजारो टन ऊस पावसा अभावी मुदतीपूर्वीच तुटू लागला आहे. अपुऱ्या वाढीचा ऊस किरकोळ किंमतीत चाऱ्यासाठी विकला जात आहे. यातून साखर उद्योगाला अपुऱ्या कच्चा माल टंचाईला सामोरे जावे लागत आहे. यासाठी कारखान्यांची व शेतकऱ्यांची मानसिकता बदलण्यासाठी व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परिसंवाद घेण्याची गरज आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी बचत करण्यासाठी व ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी ऊसाला ठिबक सिंचन अनिवार्य केले पाहिजे. यासाठी कारखान्यांनी व शासनाने अनुदान देऊन शेतकऱ्यांना ठिबकसाठी उद्युक्त केले पाहिजे.

संदर्भ सूचीः

१)रसाळ राजेंद्र, भारतीय अर्थव्यवस्था समस्या व भवितव्य, सक्सेस प्रकाशन, पुणे, पृ. ५.३८

ते ५.४२
२)पवार शंकर सुदामराव, (२०१५), महाराष्ट्रातील साखर उद्योग, अर्थसंवाद,जुलै-सप्टें.,खंड ३९,अंक २, पृ.१६३, १६५.
३)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०१३, जिल्हा अहमदनगर.
४)महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,२०१३-१४, महाराष्ट्र शासन.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१५ ते ३१/१२/२०१५ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१६ पूर्वी कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६) यांच्याकडे पाठवावेत. २०१६ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. आर.बी.भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# शेतीआधारित उद्योग - सद्यस्थिती व भवितव्य

**रूपा शहा, कोल्हापूर,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
महावीर महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२२०४३३९९
ई-मेल: rupashaha2955@yahoo.com

देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची अर्थव्यवस्था मुख्यत: शेतीवर आधारित होती. देश कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात होता. अर्थात असे असले तरी शेतीसाठी सुयोग्य सिंचन व्यवस्था निर्माण करणे व कृषि उत्पादनांवर आधारित उद्योगांना चालना देणे यासाठी खूप काही करणे अत्यावश्यक होते. कृषि उद्योगासाठी पावले उचलण्यापूर्वी देश अन्नधान्याबाबतीत स्वावलंबी बनवणे हीदेखील एक महत्त्वाची गरज होती. महात्मा गांधींनी दूरदृष्टीने ग्रामस्वराज्य व स्वावलंबी शेती आणि खेडे यांची कल्पना वेळोवेळी सूचित केलेली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं. जवाहरलाल नेहरूंना जगाबरोबर रहायचे तर केवळ शेतीवर अवलंबून चालणार नाही तर उद्योग क्षेत्रालाही चालना दिली जायला हवी याची जाणीव झाली आणि त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करत एकीकडे शेतीला सिंचन उपलब्ध करून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकल्पांना गती देण्याचा प्रयत्न केला आणि त्याचबरोबर देशातील उद्योग क्षेत्राचा पाया भक्कम केला जाईल यादृष्टीने धोरणे आखली. देशाची लोकसंख्या वाढत असतानाही पारंपरिक शेतीच्या पलिकडे जाऊन हरितक्रांतीमध्ये सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रेरित करण्यात आले आणि त्यातून एका टप्प्यावर देश अन्नधान्याबाबत स्वावलंबी झाला इतकेच नव्हे तर अन्नधान्य निर्यात करू लागला. दरम्यान शेतकऱ्याला पत मिळावी आणि औद्योगिक प्रगतीमध्ये सहभागी होत त्या प्रगतीचा लाभ त्याला घेता यावा यादृष्टीने देशात सहकारी चळवळीच्या माध्यमातून साखर कारखाने, दुग्ध व्यवसाय अशा उद्योगांना बळ मिळाले. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जीवनमान यामध्ये लक्षणीय बदल घडताना दिसू लागले. मात्र हे सर्व घडत असताना या बदलांच्या म्हणूनही काही मर्यादा होत्या. काळाच्या ओघात या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. उदा. देशात किती धरण

प्रकल्प होऊ शकतात आणि किती टक्के जमीन सिंचनाखाली येऊ शकते याची मर्यादा उघड झाली. अगदी २१ व्या शतकाच्या दुसऱ्या शतकात आपण पोहोचल्यानंतरही देशातील ८० टक्के शेती ही कोरडवाहू आहे. शेती क्षेत्राबाबत झालेला दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे संकरित बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापर करून केली जाणारी शेती ही हळूहळू परावलंबी स्वरूपाची शेती बनत गेली. शेतीत या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यानंतर काही वर्षे हेक्टरी उत्पादन वाढले, पण नंतर ते कमी झाले. हळूहळू शेतजमिनींचा वापर अन्य कारणांसाठी वाढत गेल्याने शेतजमीन घटायला लागली, शेती परावलंबी व्हायला लागली आणि त्यातून छोट्या शेतकऱ्यासाठी शेती आतबट्ट्याची ठरून तो कर्जबाजारी झाला व आत्महत्या करू लागला. १९९० च्या दशकात भारत सरकारने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आणि त्यातून सहकार चळवळीसमोरही नवी आव्हाने उभी ठाकली. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार म्हणजे संधी व आव्हान यांचे पॅकेज होते. वस्तुस्थिती अशी आहे की, त्यातील संधींचा लाभ अजूनही देशातील शेतकरी व उद्योजक पूर्ण क्षमतेने उठवू शकलेले नाहीत. देशातील कृषि उत्पन्न वाढीचा दर घटलेला आहे. आता सरकार पुन्हा हा दर उंचावण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि त्याचबरोबर 'मेक इन इंडिया'चा नारा देत अन्य उद्योगांबरोबरच कृषि उत्पादनांवर आधारित उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याचा विचार करत आहे.

**कृषि क्षेत्रावरचे संकट:**

कृषि उत्पादनावर आधारित उद्योग वाढवायचे असतील तर त्यासाठी कृषि उत्पादनांची हमी गरजेची आहे. कोणत्या धान्याचे किती उत्पादन होणार, त्यापैकी देशांतर्गत गरजेसाठी किती आणि निर्यातक्षम उद्योगांना देता येईल असे कृषि उत्पादनाचे प्रमाण किती या गोष्टी हुकूमी सांगता यायला हव्यात. प्रत्यक्षात या गोष्टींबाबत हुकूमीपणाने काही सांगण्यात निसर्गाच्या लहरीपणामुळे व अन्य कारणांनीही अडचणी येत आहेत. दुसरीकडे जिथे धान्य, फळे आणि भाजीपाला निर्माण होतो तिथे त्या प्रमाणात त्यांच्या संकलनाची, साठवणुकीची आणि निर्यातीसाठीच्या योग्य यंत्रणेची व्यवस्थाच उपलब्ध नाही परिणामी फळे आणि भाजीपाला यांचे जितके उत्पादन होते त्याच्या ४० टक्क्यांहून अधिक उत्पादनाच्या साठवणुकीची योग्य व्यवस्था नसल्याने नासाडी होते. शेती क्षेत्रातील उत्पादकता हीदेखील एक चिंतेची बाब आहे. उदाहरण सांगायचे तर निती आयोगाने १६ डिसेंबरला प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार भारतात तांदळाचे उत्पादन दरहेक्टरी ३७२१ इतकेच आहे. चीन, इंडोनेशिया, बांगला देश, व्हिएतनाम यासारख्या देशांमध्ये तांदळाचे हेक्टरी उत्पादन आपल्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. देशातील लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी २२ टक्के क्षेत्रावर भाताची लागवड होते हे लक्षात घेतले तर तांदळाच्या एकूण उत्पादनामध्ये किती वाढ प्रयत्नाने करता येणे शक्य आहे हे लक्षात येईल. गव्हाच्या लागवडीखाली भारतातील क्षेत्र १५.६ टक्के आहे आणि या पिकाचे भारतातील उत्पादन दरहेक्टरी ३१७७ किलो आहे. फ्रान्समध्ये हेच उत्पन्न दरहेक्टरी ७५९९ किलोपर्यंत घेतले जाते. तृण धान्यांबाबत म्हणजे ज्वारी, बाजरी, नाचणी याबाबत तसेच कडधान्ये व तेलबियाणे

यांच्याबाबतही स्थिती कमीअधिक अशीच आहे.

तांदूळ आणि गहू यांच्या तुलनेत यांचे दरहेक्टरी उत्पादन आणखी खूपच कमी आहे, कारण हरितक्रांतीतले प्रयोग हे मुख्यत: गहू आणि तांदूळ पिकांच्यासंदर्भातच देशामध्ये अधिक प्रमाणात करण्यात आले. ज्वारी हे मुख्यत: महाराष्ट्रातील लोकांचे अन्न होते आणि त्याचे उत्पादनही महाराष्ट्रात चांगल्या पद्धतीने होत असे, पण पूर्वी सणासुदीला महाराष्ट्रीयन घरात चपात्या केल्या जात असत, पण अलिकडे बहुतेक घरात चपाती रोजच्या आहारात आणि ज्वारी, बाजरी कधीतरीच अशी स्थिती झाली आहे. बाकी गोष्टींबरोबरच ज्वारीच्या पिठात ग्लुटेनचा अंश नसल्याने ज्वारीच्या पिठाचा गोळा तयार करून हाताने भाकरी करायला कष्ट पडतात. गव्हाच्या पिठाचे फुलके करायला आता रोटी मेकर मिळतात. साहजिकच नोकरी करणाऱ्या महिलांना भाकरी करण्यापेक्षा चपात्या किंवा फुलके करणे अधिक सोयीचे जाते.

ऊस आणि कापूस यासारखी पिके पैशांची पिके म्हणून शेतकऱ्यांनी स्वीकारली असली तरी त्यांना मिळणाऱ्या दरांच्या तुलनेत त्यांचा उत्पादन खर्च तसेच देशातील आयात-निर्यात धोरण या सर्वांचा परिणाम या पिकांच्या लागवडीवर सातत्याने होत असतो. सहकार चळवळीने काही प्रदेशात ऊस पीक वाढले खरे, पण कालांतराने सहकारी चळवळीतील व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव आणि राजकारणात प्रवेश करण्यासाठीची एक पायरी म्हणून सहकारी संस्थांचा वापर करणे यातून सहकारी चळवळ आणि ऊस शेती यावर अरिष्ट निर्माण झाले. उसासारख्या पिकाला ज्या प्रमाणात पाणी लागते त्याबाबतही आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे.

**शेती हा उद्योग मानण्याची गरज:**

जगभर शेतीमध्ये सातत्याने विविध प्रयोग होत आहेत. शेतजमीन घटत असताना अलिकडेच अंतराळात जिनियाचे फूल फुलवण्याचा पराक्रम शास्त्रज्ञांनी करून दाखवला आहे. त्यामुळे भविष्यात जमिनीवरच नव्हे तर अन्यत्रही पीक घेण्याच्या पद्धती विकसित झाल्या तर आश्चर्य वाटू नये. शेतीतील बदलते तंत्र आणि नवनवे प्रयोग आत्मसात करण्याची मानसिकता शेतकरी वर्गामध्ये तयार केली जायला हवी तसेच नवे तंत्र आणि प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी योग्य व्यवस्था हवी.

भारतात ८० टक्के इतके कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रमाण आहे. हा शेतकरी जे उत्पादन घेतो ते बाजारपेठेत नेल्यानंतर माल चांगल्या दर्जाचा नाही, त्यात ओलावा अधिक आहे, माती अधिक आहे अशी कारणे दाखवून मालाचे वजन मुळातच असते त्यापेक्षा किमान दहा टक्के कमी मानले जाते. बाजारपेठेच्या यंत्रणेसाठी पुन्हा शेतकऱ्याला वेगळे पैसे द्यावे लागतात. अशा पद्धतीने होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी मुळात उद्योगाचे निकष लावून शेतीनियोजन करायला हवे व उद्योजकाची मानसिकता प्रत्येक गावापर्यंत कशी पोहोचेल हे पहायला हवे. आपल्याला शेतात निघालेला माल जागेवरच वाळवला, त्याची चाळणी व प्रतवारी केली तर अनावश्यक बाबी बाजारपेठेपर्यंत जाणार नाहीत आणि मालाला चढा भाव मिळू शकेल. उदा. कर्नाटक प्रांतातून बाजारपेठेत येणारी तूर आधीच स्वच्छ केलेली असते त्यामुळे तिला अधिक भाव

मिळतो. आंध्रप्रदेशमध्ये बाजारपेठेत भुईमुगाला नव्हे तर शेंगदाण्याला मागणी असते हे लक्षात घेऊन शेंगा शेतात वाळवतात. शेंगा फोडणी यंत्र वापरून शेंगा फोडल्या जातात आणि फक्त शेंगदाणेच बाजारात आणतात. त्यामुळे शेतकऱ्याला योग्य भाव मिळतो. तसेच फोडलेल्या शेंगांची फोलपटे पुन्हा खतासाठी वापरता येतात. याप्रमाणे आता झाडावरून शेवग्याच्या शेंगा काढणे, नारळ काढणे, संत्रा, मोसंबी, डाळिंब, द्राक्षे यासारखी फळे काढणे, मक्याचे कणीस सोलून दाणे वेगळे काढणे अशा कामांसाठी छोटी छोटी यंत्रे विकसित झाली आहेत. शेतकऱ्यांनी त्यांचा उपयोग करायला हवा.

शेतकऱ्यांचा माल साठवून बाजारपेठेत भाव येईल तेव्हा तो विकता यावा यादृष्टीने फळे व भाज्या साठवणुकीसाठी आता शीतगृहे तयार केली जाऊ शकतात. अशा शीतगृहात माल ठेवण्यासाठी एक किलोला ५० पैसे ते १ रुपया दरमहा इतकाच खर्च येतो. शेंगदाण्यापासून चॉकलेट तयार करणाऱ्या मार्क्स नावाच्या कंपनीची वार्षिक उलाढाल १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे हे लक्षात घेतले तर कृषि उत्पादनांवर आधारित उद्योगांच्या प्रगतीसाठी किती मोठ्या प्रमाणात वाव आहे हे लक्षात येऊ शकते.

**'मेक इन इंडिया'त कृषि प्रक्रिया उद्योग:**

कृषि उत्पादनांवर प्रक्रिया करण्याच्या उद्योगाच्या वाढीला भारतात मोठ्या प्रमाणावर वाव आहे आणि अशा उद्योगांची वाढ झाल्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो हे लक्षात घेऊन भारत सरकारने मेक इन इंडियामध्ये कृषि प्रक्रिया उद्योगालाही महत्त्व देण्याचा निर्णय घेतला आहे. मेक इन इंडिया अंतर्गत या उद्योगांसाठी ज्या सुविधा व सवलती देऊ केल्या गेल्या आहेत त्याचा फायदा भारतातील शेतकरी व उद्योजक कसा घेणार ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

'मेक इन इंडिया'अंतर्गत तब्बल १४ हजार कोटी रुपये कृषि प्रक्रिया उद्योगांसाठी खर्च करण्याचा सरकारचा मानस आहे. देशामध्ये तब्बल ४२ मेगा फूड पार्कस् उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी पाच फूड पार्कस्ची उभारणी पूर्ण झाली आहे आणि उर्वरित प्रकल्प २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचा संकल्प आहे. फूड पार्कस्च्या प्रकल्पामुळे ३ लाख रोजगार निर्माण होती आणि सुमारे साडेबारा लाख शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळेल, अशी अपेक्षा आहे. कृषि प्रक्रिया उद्योगांची देशातील सध्याची संख्या ही ३७ हजार १८५ आहे. गेल्या पाच वर्षांत देशातील कृषि प्रक्रिया उद्योग क्षेत्राची ८.४ टक्के दराने वाढ झाली आहे आणि सकल राष्ट्रीय उत्पादनातील या क्षेत्राचा वाटा ९.८ टक्के आहे. आज अन्य प्रक्रिया उद्योगात मुख्यतः दळलेले धान्य, साखर, खाद्यतेल, पेये, फळे आणि भाजीपाला प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश आहे. या उद्योगाला प्रोत्साहन मिळावे, तसेच कृषी उत्पादनांच्या निर्यातीत भारताचा सध्या ६ वा असलेला क्रमांक किमान आहे तितका कायम रहावा यासाठी प्रयत्नांचा भाग म्हणून या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला १०० टक्के मुभा देण्यात आली आहे. आज देशामध्ये फळे आणि भाजीपाला यांची नासाडी होण्याचे प्रमाण २० ते ४० टक्के इतके आहे ते रोखण्यासाठी आणि योग्य स्थितीत मालाचा पुरवठा करता यावा म्हणून १३८ कोल्डचेन स्टोरेज स्थळांची निर्मिती केली जात आहे. फळे व भाजीपाल्यांचे वर्गीकरण रिटेल

पॅकिंग व्हॅक्सीन अशा गोष्टींना सेवाकरातून सूट देण्यात आली आहे. या क्षेत्रातील उद्योगांना पहिल्या पाच वर्षातील आयकरातून १०० टक्के सूट आहे तसेच या क्षेत्रासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या वातानुकूलित यंत्रणेलाही अबकारी करातून सूट देण्यात आली आहे.

## संदर्भ सूची:


१. *अर्थपूर्ण,* अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे जून २०१३, वर्ष ३, अंक ६.

२. *Indian Economic Growth : Can it Translate into Rural Prosperity?* The Analyst, Special issue on Agri-business, August 2007.

३. ढाले रविंद्र, *डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयक आर्थिक विचार,* २००९.

४. *Indian Journal of Agricultural Economy Vol.63.*


---

**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2015 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2016. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C.,*
*Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# महाराष्ट्र भूषण डॉ. माधवराव चितळे

विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर
प्राध्यापक व विभाग प्रमुख / संचालक,
व्यवसाय व्यवस्थापन विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ.
भ्रमणध्वनी: ९८२२७३७७२५

दुष्काळाने होरपळलेल्या आणि भयग्रस्त असलेल्या राज्यातील जनतेला दिलासा देणारे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य आणि माजी विश्वस्त डॉ. माधवराव चितळे यांना महाराष्ट्र टाईम्सचा अत्यंत मानाच्या *महाराष्ट्र भूषण* पुरस्काराने गौरविण्यात आले. परिषदेसाठी आणि अर्थसंवादच्या तमाम वाचकांसाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विविध उपक्रमांत माधवराव अत्यंत हिरिरीने भाग घेऊन परिषदेच्या कार्यकर्त्यांना उद्‌धृत करीत असतात. परिषदेच्या व्यासपीठावरून माधवरावांनी आपले मौलिक विचार अनेकदा आपल्यापुढे मांडले आहे. त्यांचे व्याख्यान ऐकण्यास परिषदेचे सभासद नेहमीच आतुर असतात. आपल्या व्यस्त कार्यक्रमांतून देखील परिषदेच्या कार्यात ते आपला सहभाग देत असतात. अर्थसंवादच्या चोखंदळ वाचकांपैकी माधवराव आहेत, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. महाराष्ट्राच्या जल आयोगाचे अध्यक्ष असतांना परिषदेच्या सदस्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी त्यांनी सांगली येथे चर्चासत्र आयोजित करण्यास प्रोत्साहन दिले. पुढे या सत्रात सादर केलेल्या निबंधांचा अंतर्भाव अर्थसंवादच्या अंकात देखील करण्यात आला. जलनीती, सिंचन, पीकरचना आणि माधवराव यांचे अतुट नाते आहे, हे त्यांनी सातत्याने जपले आणि कालौघात वृद्धिंगत केले. मातृभूमीसाठी काही तरी करावे या उद्देशाने माधवरावांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. ग्रामीण महाराष्ट्रातून नव्या ताकदीने तरूण उभे रहावेत असा प्रयत्न माधवराव तन्मयतेने करीत असतात. डॉ. माधवराव चितळे यांच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट असे की, पाण्यासंबंधीची तांत्रिक बाजू त्यांना अवगत असली तरी त्या संबंधीची सामाजिक जाण ही माधवरावांची जमेची बाजू आहे. मानवी जीवन आणि निसर्ग या दोहोंतील नातं झपाट्याने बदलत चालल्याची जाणीव माधवराव करून देतात. हवामानात होणारे बदल आणि त्याचा पर्जन्यावर झालेला परिणाम हा एक घटक पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण करण्यास कारणीभूत असेल परंतु लोकसंख्यावाढ हा घटक पाण्याची उपलब्धता कमी होण्यास जबाबदार आहे. या बरोबरच राहणीमानात झालेल्या बदलांमुळे पाण्याची गरज कशी वाढत

गेली या बाबतचे चिंतन माधवराव सतत करीत असतात. कालक्रमात काटकसरीने राहण्याच्या सवयीत बदल झाला आहे. पूर्वी प्रती व्यक्ती ४० लिटर पाण्यात भागत असे. परंतु हल्ली दैनंदिन जीवनातील पाणी वापरात भरमसाठ वाढ झाली आहे. नवीन व्यावहारिक जीव रचना पाण्याच्या कमतरतेमध्ये रूढ करणे हे खरे आव्हान आहे असे माधवराव मानतात. पाण्याचा फेर वापर हा पाणी कमतरतेच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सुदैवाने तंत्रज्ञान बरेच पुढे गेले आहे. मात्र नागरी जीवनात पाण्याच्या फेरवापराचा उपयोग ज्या प्रमाणात करायला पाहिजे तसा केला नाही, ही शोकांतिका आहे. पाण्याचा एकांगी विचार न करता वेगवेगळ्या स्त्रोतांमधून उपलब्ध होणारे पाणी याचेदेखील चिंतन व्हावे. आकाशातून छतावर पडणारं पाणी, भूजलात रूपांतरित होणारे पाणी, फेरवापराने वापरात येणारे पाणी, नळांद्वारे होणारी गळती थांबवून वापरात आणण्याचे पाणी याचा नागरी जीवनात एकंदर हिशोब लावू शकलो तर कदाचित पाण्याचा वाटणारा भार तितकासा वाटणार नाही. पाण्याच्या बचतीच्या उपायांबाबत माधवराव सातत्याने जनसामान्यांचे प्रबोधन करीत असतात. पाण्याच्या किंमती देखील पाण्याचे व्यवस्थापन प्रभावी करण्याच्या दृष्टीने कशा महत्त्वाच्या ठरू शकतात या बाबत माधवराव अत्यंत काटेकोरपणे मांडणी करतात. ॲरिझोना राज्यात अत्यंत अवर्षण प्रवण स्थिती असते. घराभोवती असलेल्या बागेत पाणी द्यायचे झाल्यास विशेष करून हिरवळीचे पाणी सकाळी ६ च्या आतच देता येते. त्यावेळेला बाष्पीभवन कमी असते हवेतील आर्द्रतेचे प्रमाण जास्त असते, उष्णता नसते. दुपारी हिरवळीला पाणी देता येत नाही तसे केल्यास दंड आकारण्यात येतो.

आंतराष्ट्रीय स्तरावरील त्यांचे अनुभव महाराष्ट्रातील पाण्याचा दुष्काळ हाताळण्यास उपयुक्त ठरू शकतात. स्पेनचा अभ्यास केल्यास असे दिसते की, ऋतुनिहाय पाण्याचे दर बदलत असतात. समाजमन काटकसरीकडे कसे नेता येईल याचा गांभिर्याने विचार व्हावा. पाण्याचे आवश्यकता लक्षात घेता आभाळातून पडणारे पाणी, नाल्यांमधील वाहणारे प्रवाह, भूजल साठा या बाबी चोखंदळपणे लक्षात घेऊन त्याचा हिशोब व्हावा. खरा आपला शत्रु बाष्पीभवन हा असल्याने शेतीव्यवस्थेला छाया निर्माण करण्याचे दृष्टीने प्रयत्न व्हावा. आपले आणि पाण्याचे बदलते नाते लक्षात घेतल्या खेरीज पाण्याचे व्यवस्थापन करता येणार नाही. दुष्काळावर मात करण्यास नियोजन आणि शक्ती निर्माण करण्याची आवश्यकता माधवराव अनेक दाखले देऊन समाजमनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतात.

१९६० च्या सुमारास जागतिक बँकेने मुंबई शहराला ६० कि.मी. अंतरावरून पाईपने पाणी पुरवठा करण्याची योजना आखली. माधवरावांनी या योजनेत बदल करून पिण्याच्या पाण्या सोबतच सिंचन आणि जलविद्युत निर्माण करण्याची व्यवस्था यामध्ये उभारली. मोठ्या प्रकल्पांचे विकासाच्या इतर संधीशी एकीकरण साधण्यात आल्यास प्रकल्पांचा उपयोग पुर्णांशाने करता येईल, ही माधवरावांची या संदर्भातली भूमिका होती. पानशेत आणि खडकवासला ही धरणे कोसळल्यानंतर पुण्यातील जनतेचा पाणी पुरवठा पुन:प्रस्थापित करण्याच्या कार्यात माधवरावांनी स्वत:ला झोकून दिले. १९६१ च्या या त्यांच्या कार्याची महती सर्वदूर पसरली. माधवरावांनी पाणी व सिंचनाच्या संदर्भात अनेक जबाबदाऱ्या स्वीकारून यथायोग्य पूर्ण केल्या.

सिंचन घोटाळ्यासंबंधी त्यांनी शासनाला सादर केलेला सुमारे ६०० पानांचा अहवाल बराच गाजला. त्यावर उलटसुलट चर्चा देखील झाली. रु.७,००० कोटींचा सिंचन घोटाळा आणि त्याची संपूर्ण छाननी करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीकडे सोपविली होती. प्राथमिकता स्पष्ट न करणे, सिंचन महामंडळाची दोलायमान स्थिती, धोरणातील संदिग्धता, लाभक्षेत्रातील पीकरचना, प्रकल्पांना अति उत्साहाने घाईत देण्यात आलेली मंजुरी, सरकारने अत्यंत उथळपणे हाताळलेला सिंचनाचा प्रश्न असे अनेक दोष या समितीच्या अहवालात दर्शविण्यात आले. सिंचनाची आकडेवारी गोळा करण्याच्या कार्यपद्धतीत बदल करण्याची शिफारस देखील अहवालात आढळले.

१९९९ साली नेमलेल्या जलसिंचन आयोगाने अध्यक्षपद डॉ. माधवराव चितळे यांनी भूषविले. शेतकऱ्यांच्या पाणी वापर संस्था स्थापन करून सिंचनाचे पाणी उपलब्ध होण्यासाठी २००५ साली जलनीती तयार करण्यात आली. या जलनीतीची अंमलबजावणी होत नाही या बद्दलचा खेद डॉ.चितळे वेळोवेळी व्यक्त करतात. सिंचन खाते कंत्राटदारांच्या चक्रव्यूहात कसे अडकत गेले, याचे विश्लेषण चितळे समितीच्या अहवालात आढळते. सिंचन विकासाची व्यवस्था विकासप्रवण व्हावी, खर्च प्रवण नको हे विचार माधवराव वेळोवेळी व्यक्त करतात.

स्टॉकहोम पाणी पुरस्कार हा जागतिक स्तरावरील अत्यंत मानाचा पुरस्कार मानण्यात येतो. पाण्यासंबंधी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीला या प्रतिष्ठित पुरस्काराने १९९१ पासून सन्मानीत करण्यात आले आहे. स्टॉकहोम पाणी पुरस्कार विजेते जगाच्या विविध भागातून निवडण्यात येतात. पाण्याचे संवर्धन आणि संरक्षण करून जीवसृष्टीवरील प्राणीमात्रांच्या कल्याणात वाढ करण्याच्या दृष्टीने भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. युनायटेड नेशन्स जागतिक पाणी दिवसाच्या निमित्ताने दरवर्षी २२ मार्च रोजी पारितोषिक मानकऱ्यांचे नाव घोषित करण्यात येते. ऑगस्ट महिन्यात स्टॉकहोम येथे साजरा होणाऱ्या जागतिक पाणी सप्ताहाच्या दरम्यान १,५०,००० युएस डॉलर्स आणि मानचिन्ह देऊन स्टॉकहोम पुरस्कार विजेतल्याला सन्मानित करण्यात येते. १९९३ या वर्षीच्या पुरस्कारासाठी माधवरावांची निवड करण्यात आली.

दक्षिणपूर्व आशियात पाण्याचे संवर्धन करून जनजागृती कार्यक्रम सर्जनशीलतेने राबविल्याने त्यांच्या कार्याची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली. नोबेल पुरस्काराइतकीच स्टॉकहोम पाणी पुरस्कारालाही प्रतिष्ठा आणि मान्यता आहे. बाहेरील राष्ट्रांनी त्यांच्या कामाची दखल वेळोवेळी घेतली हे इथे विशेष उल्लेखनीय.

औरंगाबाद येथे वास्तव्यास असलेल्या माधवरावांना यंदाच्या महाराष्ट्र टाईम्सच्या अत्यंत मानाच्या *महाराष्ट्र भूषण* पुरस्काराने सन्मानित करणे आणि महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्र्यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान होणे हे देखील तेवढेच मानाचे आणि प्रतिष्ठेचे आहे. त्यांनी सिंचन आणि पाण्याच्या संदर्भात विविध प्रकारे केलेल्या कार्याला हा मानाचा व कृतज्ञतेचा मुजरा आहे! मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे डॉ. माधवराव चितळे यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

# नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष वाईन उद्योगाच्या समस्या व उपाय

**होळकर दिपा कैलास**, नाशिक,
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य,
महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९८८१३७९०५६.

नाशिक जिल्हा आज द्राक्ष विक्रीबरोबरच द्राक्ष वाईनची आंतरराष्ट्रीय बाजारपेठत विक्री करण्यात काही प्रमाणात यशस्वी झाला आहे. महाराष्ट्रातील द्राक्ष निर्यात लक्षात घेऊन द्राक्ष किमतीत स्थिरता येण्यासाठी व नैसर्गिक परिस्थितीचा फायदा घेऊन रोजगार वाढविण्यासाठी सरकारने कृषीफळ प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचे ठरविले व त्यातूनच २००१ मध्ये महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन द्राक्षापासून वाईन तयार करण्याचे धोरण आखले. त्याचा परिणाम म्हणजे नाशिक, सांगली, पुणे या तीन जिल्ह्यात द्राक्ष निर्मितीस पोषक असणाऱ्या वातावरणामुळे वाईनरींची संख्या वाढली परंतु संख्यात्मक वाढ झाली असली तरी गुणवत्तेच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाले. आणि अल्पावधीतच काही वाईनरी बंद पडल्या. प्रचंड भांडवली गुंतवणूक असणाऱ्या या द्राक्ष वाईन उद्योगाच्या समस्या अभ्यासणे आणि त्यावर उपाय सूचविणे हा या संशोधनपर लेखाचा प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्रातील द्राक्ष वाईनरींची संख्या जर विचारात घेतली तर नाशिक - ३८, सांगली - १५, पुणे - ९, सोलापूर - ४, बुलडाणा - ३, उस्मानाबाद - २, तळेगाव -१, एकूण - ७२. भारतातील वाईन पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यात अल्पावधीतच ३८ वाईनरी उभ्या राहिल्या आणि त्यातील आजच्या स्थितीत १० वाईनरी बंद पडल्या. नाशिक जिल्ह्यातून दरवर्षी ७० लाख लीटर पेक्षा अधिक उत्पादन होते व ७५ हजार केसेसची विक्री होते. (१ केस = ९ लीटर) वाईनसाठी आवश्यक असणारे द्राक्षे हे ६००० एकर क्षेत्रावर पिकवले जातात व दरवर्षी त्यात १०० एकरची भर पडत आहे. वाईन द्राक्ष निर्मिती करणारे जवळ-जवळ एक हजार शेतकरी असून नाशिकमध्ये

१५० ते २०० कोटी रुपयांची वाईन उद्योगाची दरवर्षी उलाढाल होत आहे. सामंत वाईन्स प्रा.लि., राजधीर वाईन्स प्रा.लि. या कंपन्यांकडून द्राक्ष वाईन प्रामुख्याने फ्रान्स, इटली, जर्मनी, हॉलंड, अमेरिका, न्युयॉर्क, सिंगापूर, ब्राझील या देशात निर्यात करून परकीय चलन मिळवत आहेत. रोजगार निर्मिती बरोबरच परकीय चलनाची प्राप्ती, द्राक्षाची किंमत स्थिर ठेवण्यास मदत, पर्यटन व्यवसायात वाढ इ. अनेक उद्दीष्टे या द्राक्ष वाईन उद्योगामुळे साध्य होण्यास मदत झाली आहे.

महाराष्ट्र शासनाने द्राक्ष वाईन उद्योगांचे महत्त्व लक्षात घेऊन जे २००१ मध्ये द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण जाहीर केले त्यानुसार द्राक्ष व वाईन संदर्भात द्राक्ष उत्पादक व उद्योजक यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध सोयी सवलती मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) व केंद्र शासनातर्फे कृषी आणि अन्नप्रक्रिया उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण यांच्यामध्ये ७ जानेवारी २००२ रोजी सामंजस्य करार करण्यात आला व त्यानुसार वाईन निर्मिती उद्योगाला निर्यात क्षेत्र यामध्ये समाविष्ट करून सर्व सोयी-सवलती दिल्या आहेत. तसेच एम.आय.डी.सी. ची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक झाली आहे. ३० ते ३५ हजार रुपये येतो म्हणजेच कमी भांडवल गुंतवणूकीत अधिक क्षेत्र वाईन द्राक्षासाठी वापरणे शक्य आहे. ३ टेबल ग्रेप्सच्या उत्पादनामुळे प्रतीवर्षी सरासरी प्रती एकर २ लाख रु. चे उत्पन्न मिळते तर वाईन ग्रेप्स पासून सुमारे १ लाख ८५ हजार रु. चे उत्पन्न मिळते. असे जरी असले तरी त्यासाठी गुंतवणूकही कमी करावी लागते. ह्या द्राक्षवेली अधिक काळपर्यंत वातावरणाशी जुळवून घेऊ शकतात.

महाराष्ट्र सरकारच्या द्राक्ष प्रक्रिया उद्योग २००१ मध्ये दिलेल्या आदेशानुसार पुढील प्रकारचे फायदे वाईन उद्योगाला झाले आहेत.

१) प्राधान्य क्षेत्र म्हणून जाहीर झाल्याने नाबार्ड व बँकाकडून अर्थसहाय्य उपलब्ध असते.

२) लघू उद्योग क्षेत्रात याचा समावेश केल्याने लघू उद्योगासाठी असणाऱ्या सर्व सोयी सवलती मिळण्यास मदत झाली.

३) विक्री करात सवलत - वाईनवर सध्या २० टक्के विक्रीकर असून त्यातील १६ टक्क्यांचा परतावा होतो. व प्रत्यक्षात ४ टक्केच विक्रीकर भरावा लागतो.

४) वाईन विक्रीसाठी ५५०० रूपये प्रतिवर्षी परवाना शुल्क आकारण्यात येते.

५) वाईन उत्पादनाचा परवाना सोयीस्कररित्या प्राप्त होतो. जर उत्पादन वाईन पार्कमध्ये सुरू करणार असेल तर ३० दिवसाच्या मुदतीत असा परवाना मिळतो.

६) वाईन उत्पादन घटकांना अन्न प्रक्रिया घटकाचा दर्जा दिल्याने सवलती मिळत आहेत.

७) वाईन उत्पादन घटक पर्यटकांना खुले करून प्रत्यक्ष वाईनवरही विक्री करण्यास परवाने देण्यात आल्याने उद्योजकांच्या खर्चात बचत झाली आहे.

८) नाशिक मधील विंचूर येथे गोदावरी वाईन पार्कची स्थापना झाल्याने त्याठिकाणी शेतकऱ्यांना स्वस्त किंमतीत भूखंड, चांगल्या दर्जाचे रस्ते, पाणीपुरवठा, विजेची व फोनची सुविधा, मदर युनिट, गेस्ट हाऊस इ. पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

या सर्व सोयी-सवलती द्राक्ष वाईन

उद्योगास प्राप्त होऊनही या उद्योगाचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही.

**द्राक्ष वाईन उद्योगाच्या समस्या:**

१) वाईन द्राक्ष ही खाण्याच्या द्राक्षांपेक्षा (टेबल ग्रेप्स) वेगळी असतात. वाईन द्राक्ष उद्योजकांकडून घेतांना साधारणत: एकरी ६ टन माल पिकवावा की जेणे करून त्याची प्रत चांगली राहील अशी अट असते. जेव्हा ६ टन मालापेक्षा अधिक माल निघतो तेव्हा शेतकऱ्यांसमोर या मालाचे करायचे काय? असा प्रश्न उभा असतो कारण हे द्राक्ष खाण्यास योग्य नसतात. ती एकतर अतिशय कमी किंमतीला विकावी लागतात किंवा फेकून द्यावी लागतात. आणि म्हणूनच २००९ ते २०११ या कालावधीत अनेक शेतकऱ्यांनी आपल्या बागा तोडल्या.

२) शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या द्राक्षांबाबत- उद्योजकाने विकत घेतलेली द्राक्षेही हंगामातील मजुरांची कमतरता व वाहतुकीतील अडथळे इ. मुळे वेळेवर पोहोचत नाहीत. त्यामुळे मालाचा दर्जा घसरतो व उतारा कमी मिळतो. (द्राक्षे काढल्यानंतर ती सहा तासाच्या आत वाईनरीवर पोहोचवणे आवश्यक असते.)

३) प्रत्यक्ष प्रक्रिया करताना येणाऱ्या अडचणी - वाईन तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी काही कच्चा माल परदेशातून मागवावा लागतो. तो जर वेळेवर उपलब्ध झाला नाही तर अडचणी निर्माण होतात तसेच प्रत्यक्ष प्रक्रिया करताना फर्मन्टेशन महत्वाचे असून त्यासाठी तापमान योग्य प्रकारे योग्य वेळी नियंत्रित करावे लागते. परंतु वीजपुरवठा अनियमित असेल आणि पर्यायी व्यवस्थाही नादुरूस्त असेल तर वाईनचा दर्जा घसरतो.

४) वाईन मास्टरसाठी अधिक खर्च - आंतरराष्ट्रीय बाजारात माल पाठविण्यासाठी वाईनची चवही महत्वाचा मुद्दा असतो व त्यासाठी परदेशी वाईन मास्टरची गरज असते. त्यांच्या भेटीचा व सल्ल्याचा खर्चही एक वाईन उद्योगासमोर मोठी समस्या आहे.

५) वाईन दर्जाबाबत - चांगली वाईन ही द्राक्षाच्या चांगल्या प्रतीवर अवलंबून असते. चांगल्या प्रतीसाठी उद्योजकांना करार केलेल्या शेतकऱ्यांच्या बागेचे निरीक्षण आणि मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करावी लागते त्यामुळे खर्चात वाढ होते.

६) देशांतर्गत बाजारपेठेबाबत - मुळातच भारतात वाईनचा खप कमी आहे. (भारतात दरडोई वाईनचा उपभोग १९ एमएल इतका आहे तर ब्राझील २.२६ लिटर, रशिया ८.१ लिटर, ०.९ लिटर चायना आणि ७ लिटर साऊथ आफ्रिकेत आहे.) आपल्याकडील वाईनचा दर्जा चांगला असून किंमतही कमी आहे. परंतु परदेशात असलेल्या कमी दर्जाच्या वाईन आपल्या देशात काही कंपन्यांकडून आयात केल्या जातात आणि 'इम्पोर्टेड वाईन' या नावाखाली भारतीय लोक मोठ्या प्रमाणात परकीय वाईनला मागणी करतात.

७) कामगारविषयक समस्या - वाईन उद्योगासाठी प्रशिक्षित कामगारांची आवश्यकता असते. या उद्योगात हार्वेस्टींग जानेवारी ते एप्रिल दरम्यान चालते. इतर वेळेस काम कमी असते. परंतु अशा प्रशिक्षित कामगारांना कायमस्वरूपी पगार द्यावा लागतो कारण तसे न केल्यास हंगामात हे कामगार उपलब्ध होऊ शकत नाहीत.

८) नमुना म्हणून वाटपाचा खर्च - नमुना देण्याची पद्धत असल्याने बरेच मान्यवर अधिकाऱ्यांना टेस्टींगसाठी नमुना द्यावा लागतो, त्यामुळे खर्च

वाढतो.

९) विविध प्रदर्शनात भाग घेण्यासाठी येणारा खर्च - विविध प्रदर्शनामध्ये भाग घेण्यासाठी फी व इतर खर्च करावा लागतो. या प्रदर्शनासाठी ठेवण्यात येणाऱ्या वाईनचा नमुना द्यावा लागतो. त्यामुळे खर्चाचे प्रमाण वाढते. बऱ्याच कंपन्यांचा अनुभव असा आहे की विशिष्ट ब्रँडलाच याचा अधिक फायदा होतो.

१०) व्याजदराबाबत समस्या - वाईन उद्योगाला कर्जपुरवठा साधारणतः १२ ते १२.५ टक्के दराने होतो. परंतु व्हाईट वाईनची विक्री कमीत कमी ७ महिने व रेड वाईनची विक्री करण्यासाठी कमीत कमी दिड वर्ष लागते. त्यामुळे कर्ज परत फेडीसाठी अधिक कालावधी लागतो.

अशा अनेक समस्यांवर मात करून आज सुला वाईन्स, एन.डी. वाईन्स इ. वाईन बनविणाऱ्या कंपन्यांनी आपला ब्रँड प्रस्थापित करण्यात यश मिळविले आहे. द्राक्ष वाईन उद्योगाच्या विकासासाठी शेतकरी, उद्योजक, सरकार यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. जेणेकरून आहे त्या कंपन्या अधिक फायद्यात चालतील. सर्वेक्षणात आढळून आलेल्या समस्यांवर पुढील उपाय योजना करणे गरजेचे आहे.

१) वाईन द्राक्षाच्या दर्जावर लक्ष केंद्रीत करणे - वाईन तयार करण्यासाठी जर उत्तम प्रकारची व चांगल्या गुणवत्तेची द्राक्षे उपलब्ध नसतील तर जगातील कोणताही तज्ज्ञ वाईन मेकर चांगल्या प्रतीची वाईन तयार करू शकणार नाही हे शेतकऱ्यांनी लक्षात घेऊन उत्पादन करावे.

२) वाईन द्राक्ष सेंद्रीय पद्धतीने उत्पादित करण्याबाबत आज जगात सेंद्रीय अन्नाला अधिक मागणी आहे. परकीय नागरिक आरोग्याबाबत अधिक जागरूक असल्याने सेंद्रीय उत्पादनांना अधिक किंमत देण्यास तयार असतात. भविष्यात परकीय नागरिक सेंद्रीय द्राक्षापासून तयार झालेल्या वाईनला अधिक मागणी करतील.

३) उत्पादनाचा खर्च कमी करणे - वाईन उद्योजकांसमोर हे सर्वात मोठे आव्हान आहे. जर वाईनची विक्री वाढवायची असेल तर तीची किंमत सर्वसामान्यांना परवडली पाहिजे. त्यासाठी सोलर सिस्टीमचा किंवा पवन चक्क्यांचा वापर करून विजेचा खर्च कमी करणे, वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लँट स्वतःचा असणे गरजेचे आहे.

४) मदर युनिटचा फायदा घेणे - 'गोदावरी पार्क' विंचूर या ठिकाणी सरकारने स्वतः खर्च करून मदर युनिट उभारले आहे. वास्तविक पाहता जी मशीनरी उद्योजकांना वर्षातून दोन दिवस ते तीन आठवडे पर्यंतच उपयोगी पडते व त्यावर २० ते २५ लाख रूपये खर्च होतात. ते टाळून आपल्या उद्योगात खेळते भांडवल कमी पडू नये यासाठी या युनिटची उभारणी सरकारने केली. परंतु काहीच कंपन्या याचा फायदा घेतात. या युनिटचा फायदा घेण्याची सक्ती करणे गरजेचे आहे.

५) ब्रँडची स्थापना - ब्रँड म्हणजे उद्योजकांची गुंतवणूक होय. आपण तयार करीत असलेली वाईन उत्कृष्ट तर आहेच शिवाय आपण दिलेले वचन पूर्ण करीत आहोत हा विश्वास उद्योजकात आणि ग्राहकात निर्माण होऊन ग्राहकांच्या पसंतीला ब्रँड उतरल्याने त्या उत्पादनाची मागणी कायम स्वरूपी खात्रीने वाढते.

६) विक्री खर्चात बचत - वाईन विक्री करीत असताना मोठ्या प्रमाणात घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी इत्यादींना कमिशन द्यावे लागते

हे टाळण्यासाठी उद्योजकांनी सरकारकडून स्वत:च्या दुकानांसाठी परवानगी घ्यावी तसेच कमिशनची रक्कम कमी करण्यावर भर द्यावा. सरकारने प्रत्यक्ष कंपनीकडून विक्री करण्यास परवानगी दिली आहे. परंतु ग्राहकांचा त्याला प्रतिसाद मिळत नाही.

७) दर्जात कोणताही समझोता नको - आज प्रत्येक क्षेत्रात ब्रँडेड वस्तूंना अधिकची किंमत प्राप्त होते. खर्च कमी व्हावा म्हणून आवश्यक त्या ठिकाणी बचत गरजेची आहे. परंतु काही कंपन्या कॉर्क ऐवजी सरळ झाकनांचा उपयोग करतात. कॉर्कच्या झाकनाने वाईनच्या चवीला चांगला दर्जा प्राप्त होतो, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

८) विंचूर येथे १४२ हेक्टर क्षेत्रावर वाईन पार्क साकारला आहे व दोनशे भूखंड तयार आहेत. त्यात फक्त सात वाईनरी आहेत. त्यातील काही वाईनरी बंद आहेत. सरकारने या गुंतवणुकीला चालना देण्यासाठी या ठिकाणी काही भागात इतर उद्योग सुरू करण्याचा पुनर्विचार केला तर त्या ठिकाणी येणारा कच्चा माल, बाहेर जाणारा पक्का माल, त्यांच्या सोयीसाठी कँटीन, हॉटेल्स इ. ची वर्दळ वाढून वाईनची मागणीही वाढेल.

९) वाईन टुरिझमला चालना - झंपा ग्रोव्हर क्रशिंग फेस्टीवल, सुला वाईन फेस्टीवल विंचूरला ग्रेप हार्वेस्ट फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात येते. अशी आयोजने होत राहीली तर पर्यटकांचा सहभाग वाढून वाईन उद्योगाचा फायदा होईल.

१०) निर्यातीवर लक्ष केंद्रीत करणे - काही देशात द्राक्ष वाईन सेवन केली जाते परंतु उत्पादन करीत नाहीत अशा नेदरलँड, बेल्जियम, जपान, डेन्मार्क, स्वीडन, पोलंड, नॉर्वे, आयलँड, फिनलँड या देशात आपली वाईन विकणे आपल्याला शक्य आहे. देशांमध्ये आपल्याला आपली वाईन विकण्यासाठी प्रदर्शनाचे, कार्यक्रमाचे आयोजन करून त्यातून आपल्यासाठी कायमचा ग्राहक शोधावा.

११) सरकारकडून आकारले जाणारे कर व फी - वाईन निर्मिती कंपन्यांना व्हॅट, सी.एस.टी. ग्रामपंचायतीचा कर इ. भरावे लागतात. सरकारकडून वेळोवेळी आपल्या टॅक्सच्या अटीमध्ये वेगवेगळ्या परवान्यांच्या व त्याच्या नुतनीकरण फी मध्ये बदल केला जातो. सरकारने करांचा काही वर्षासाठी पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

द्राक्ष वाईन उद्योगाच्या भरभराटीसाठी हीच योग्य वेळ आहे. कारण वाईन ग्रेप्ससाठी ३० ते ३५ हजार रूपये प्रतिवर्षी बदलता खर्च येतो म्हणजेच कमी भांडवल गुंतवणुकीत अधिक क्षेत्र वाईन द्राक्षासाठी वापरणे शक्य आहे, तर टेबल ग्रेप्सच्या उत्पादनामुळे प्रतीवर्षी सरासरी प्रती एकर २ लाख रु.चे उत्पन्न मिळते तर वाईन ग्रेप्सपासून सुमारे १ लाख ८५ हजार रु.चे उत्पन्न मिळते, त्यासाठी गुंतवणुकही कमी करावी लागते. ह्या द्राक्षवेली अधिक काळपर्यंत वातावरणाशी जुळवून घेऊ शकतात. परदेशी कंपन्या आपले ब्रँड स्थापन करण्यात यशस्वी होण्याअगोदरच आपण आपला ब्रँड स्थापन कसा करू हे पाहणे ही काळाची गरज आहे कारण जगामध्ये युरोप (६७.५६ टक्के), अमेरिका (२०.४९ टक्के), आशिया (७.०५ टक्के), आफ्रिका (२.५९ टक्के) व ओशिआनिया (२.३० टक्के) हे खंड वाईन खपात अग्रस्थानी असून अजूनही जगामध्ये नेदरलँड, बेल्जियम, जपान, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, आयलँड, फिनलँड हे देश वाईनचे उत्पादन

करीत नाहीत मात्र त्यांच्याकडून एकूण वाईन उत्पादनापैकी जवळजवळ १०.४ टक्के उपभोग घेतला जातो. आशिया खंडात वाईन सेवनाचे प्रमाण सिंगापूर देशात सर्वाधिक असून तो ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, चिली, अमेरिका व इटली या देशांकडून वाईन आयात करतो. जगात द्राक्ष वाईनची बाजारपेठ शंभर अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त असून एकूण उत्पादन प्रतिवर्षी ३५,००० दशलक्ष लिटरपेक्षा अधिक आहे. जगात दरवर्षी सुमारे २५,००० ते ३०,००० दशलक्ष लिटर द्राक्ष वाईन प्यायली जाते. एकूण उत्पादनाच्या १५ टक्के वाईन जागतिक बाजारपेठेत विक्रीला येते तिचे मूल्य १० अब्ज डॉलर्स आहे. जगात वाईन सेवन करणाऱ्यांचे प्रमाण दरवर्षी १२ टक्क्यांनी वाढत आहे.

जगामध्ये थंड तापमानात वाईन निर्मिती करणाऱ्या देशात सूर्यप्रकाश आणि स्वच्छ वातावरण मिळण्यास अनेक प्रयोग केले जातात त्या तुलनेत भारत हा भरपूर सूर्यप्रकाश आणि स्वच्छ वातावरणाच्या बाबतीत भाग्यशाली आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगामधील द्राक्ष पिकविणारा सुंदर रमणीय भूप्रदेश, विशेषतः नाशिकचे अल्हाददायक हवामान वाईन उद्योगांच्या भरभराटीला पोषक आहे म्हणूनच सरकारचा योग्य आधार मिळाल्यास आणि प्रामाणिकपणे व्यवसाय केल्यास नाशिकची वाईन आंतरराष्ट्रीय वाईनला शह देऊ शकेल यात शंका नाही.

**संदर्भ सुची:**

१) डॉ.जयदीप कृ. काळे, २००९, *मी द्राक्ष वाईन उद्योग उभारू शकतो का?*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२) जगन्नाथ शिंदे, कृषि प्रक्रिया उद्योग गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.

३) होळकर दिपा, *नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष वाईन उद्योग समस्या व उपाययोजना*, पुणे विद्यापीठास लघूसंशोधन प्रकल्प सादर.

४) इंटरनॅशनल वाईन ॲण्ड स्पिरिट रेकॉर्ड रिपोर्ट

५) नाशिक टाईम्स २० एप्रिल २०१३

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### देणगी : २०१५-१६

| अ.क्र. | देणगीदाराचे नांव | पावती क्र. | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अशोकराव नानवटी, येवला | २३२ | २०००/- |

# गुऱ्हाळघरे-शेतीमाल आधारित उद्योग

प्रमिला जयवंतराव पाटील, कोल्हापूर,
न्यू कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९४०३४५३७३०
ईमेल : vipragourisai@gmail.com

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या मेक इन इंडियाच्या उपक्रमातून विकासाचे इंजिन म्हणून ओळखला जाणाऱ्या ग्रामीण भागाकडे लक्ष वेधले जात आहे. याच खेड्याच्या स्वयंपूर्णतेचा लढा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिलेला होता. *खेड्याकडे चला* तेथील साधनसंपत्तीवर आधारित उद्योगांची कास धरा आणि मनुष्यबळाच्या सहाय्याने रोजगाराची निर्मिती करा. याच संदेशातून ग्रामीण भागात अनेक उद्योग सुरू झाले. यापैकी शेतमालावर आधारित असणारा शेतकऱ्यांनी विकसित केलेला, स्वत:च्या कौशल्य पद्धतीने तयार केलेली गुऱ्हाळघरे त्यामधून उत्पादित होणारा गूळ. याच गुळाने जागतिक बाजारपेठेत नावलौकिक मिळवून दिलेला आहे. अनेकांना शिक्षणाबरोबर रोजगार मिळवून दिलेला आहे. गूळ उद्योजकांना भवितव्य उज्ज्वल आहे. तरीही आज हा व्यवसाय अनेक समस्यांनी ग्रासलेला दिसतो. अशा गुऱ्हाळघराचा आढावा घेण्याच्या हेतूने हा शोधनिबंध लिहत आहे.

## शोधनिबंधाची अभ्यासपद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध हा गुऱ्हाळघरे-शेतीमालावर आधारित उद्योग हा सविस्तररित्या अभ्यासण्याच्या हेतूने तयार केलेला आहे. सदर शोधनिबंध हा प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारित आहे. प्राथमिक सामग्रीमध्ये प्रश्नावली, मुलाखत तंत्र निरीक्षण या पद्धतीचा अवलंब केला आहे. दुय्यम साधन सामुग्रीमध्ये विविध ग्रंथ, अहवाल, मासिके, वर्तमानपत्रातील लेख, एम.फिल. शोध प्रबंध व इतर सरकारी कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे.

## गुऱ्हाळघरे (गूळ उद्योग):

ग्रामीण भागातील शेतकरी व शेती हे देशाच्या अर्थव्यवस्थेत असणारे महत्त्वाचे घटक आहे हे ओळखूनच राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित नेहरू व अन्य नेत्यांनी नियोजनाच्या माध्यमातून शेती क्षेत्राच्या विकासावर भर दिलेला होता. ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक विषमता कमी करण्याचे साधन म्हणून शेतीआधारित

उद्योग महत्त्वपूर्ण ठरतात. हे उद्योगच अनेक अकुशल मजुरांना रोजगार मिळवून देण्यात अग्रेसर आहेत. यापैकी कोल्हापूर जिल्ह्यातील गुऱ्हाळघरे हा होय.

## गूळ उद्योगाची पार्श्वभूमी:

अनंत काळापासून भारतात ऊस उत्पादन आहे. याचा उल्लेख इ. स. पू. ५००० च्या वैदिक वाङ्मयात ऊस उत्पादन, ऊसाचे व त्याच्या उत्पादनाचे ज्ञान भारतीयांनाच होते याचे अनेक पुरावे आहे. ऊस, ताड, माड इ. वनस्पती पासून मिळणारा रस उकळून थंड झाल्यावर जो घन पदार्थ तयार होतो. त्याला गूळ म्हणतात. प्रथियकोश या ग्रंथात प्रत्येक बौद्ध भिक्षूने गुळाचा आहारात वापर करावा असा उल्लेख केल्याचा आढळतो. लासेन या संशोधकाने गूळ या शब्दाची उत्पत्ती *गौर* या बंगालमधील प्राचीन काळच्या शहरावरून लावली आहे. तर काहीजण बंगालच्या गोंड देश या प्राचीन नावावरून गौड म्हणजे *गुळाचा देश* असाही अर्थ घेतात. सेल्युनायकेटॉर यांनी इ. स. पूर्व ४० च्या सुमारास गूळ म्हणजे केशरी रंगाचा आणि अंजीर, मध यापेक्षा अतिशय गोड असणारा दगड म्हणजे गूळ असे वर्णन केलेले आहे. अशा गुळाचा उपयोग औषधासाठी, जेवणात केला जातो. त्याचबरोबर गूळ तयार करणाऱ्या या उद्योगाने अनेकांना रोजगारही उपलब्ध करून दिला आहे.

## गुऱ्हाळघरासंबंधी आवश्यक बाबी:

कोणताही व्यवसाय सुरू करण्याकरिता भूमी, श्रम, भांडवल, संयोजक या घटकांची गरज असते. गुऱ्हाळ मालकाला संयोजकाची भूमिका पार पाडताना वरील घटकांना एकत्रित घेऊनच उत्पादन सुरू करावे लागते. याकरिता गुऱ्हाळमालकांना जागा, गुंतवणुकीसाठी रक्कम, मजूर, लागणारा कच्चा माल यांची गरज लागते. प्रत्यक्षात गुऱ्हाळाचे कामकाज सुरु झाल्यानंतर मांदण, कढई, गाळणी लाकडी चरखा/विद्युत चरखा, फावली, शिवे शेबाळे, लाकडी खरबडळे, वाफा, घमेली, बांबू, ढेपाळी (बादल्या), हौद, चुलाण यासारख्या साधनाच्या पूर्वतयारीतून गुळवी मांडवकरी, घाणेकरी, चुलवे यासारख्या मजुरांच्या सहाय्याने गुऱ्हाळाचे काम चालू राहते. यातील मजूरांची अनुपस्थिती हीच गुऱ्हाळमालकांची समस्या असते. यातील गुळव्या हा उद्योगातील कौशल्यपूर्ण मजूर असतो. त्याच्या ज्ञानातूनच उद्योग विकसित होताना दिसतो.

## कोल्हापूर जिल्हा-गूळ उद्योग (गुऱ्हाळघरे):

गूळ उत्पादन व्यवसायाला १०० पेक्षा जास्त वर्षांचा इतिहास आहे. राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी गूळ उद्योगाला चालना देण्यासाठी १८८५ मध्ये कोल्हापूर येथे गुळाची पहिली बाजारपेठ निर्माण केली. पूर्वीच्या काळी गुळाच्या बाजारपेठेचा असणारा अभाव, त्यामुळे गूळ कोल्हापुरचा पण नाव राजापुरचे अशी परिस्थिती होती. कोल्हापूर संस्थानचे पहिले इंग्रज अधिकारी मेजर ग्रॅहम यांनी १८५४-५५ साली तयार केलेल्या अहवालात कोल्हापुरी गुळाचा उल्लेख आहे. कोल्हापुरी गुळ रंग, रुची व टिकाऊपणात मशहूर होता. हाच गूळ कोकणात राजापूरच्या बाजारपेठेत जाई. हाच गूळ *राजापुरी गूळ* म्हणून प्रसिद्ध होता. सांगलीच्या बाजारपेठेत या गुळाने चांगला नावलौकिक मिळविला पण गुळाची वाहतूक करण्यात शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत. शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊनच राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी शेतीमालाला कोल्हापुरची

बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच कोल्हापुरात बाजारपेठेची स्थापना झाली. त्याद्वारे गुळकरी, शेतकरी तसेच गूळ व्यापारी यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविल्या. तेव्हापासून आजपर्यंत गुळाची प्रक्रिया व उत्पादन ही परंपरागत पद्धतीने सुरू आहे. काळाच्या ओघात औद्योगिक विकासामुळे उभ्या लाकडी चरखा ऐवजी अधिक क्षमतेच्या आणि गुणवत्तेच्या आडव्या लोखंडी चरखांचा वापर होऊ लागला आहे. विद्युतीकरणामुळे डिझेल इंजिनची जागा इलेक्ट्रीक मोटारीने घेतली. एवढे बदल सोडल्यास गूळ उत्पादन प्रक्रियेत तसेच त्यासाठी लागणाऱ्या साधनात फारसा बदल झालेला नाही. पूर्वीपासूनच्या गुऱ्हाळघरांच्या अवस्थेत फारसा बदल झालेला नाही. गूळ तयार करण्याची पद्धत तशी नवीन नाही. चांगला गूळ हा रसाच्या प्रतीवर अवलंबून असतो. ही प्रत उसाची जात, जमीन, पिकाची निगा, तोडणीवेळी ऊसाचे वय यावर अवलंबून असते. ऊसाच्या रसापासून गुळ तयार करण्याची कला ही परंपरागत पद्धतीतील मजुरांच्या कौशल्यावर व ज्ञानावरच अवलंबून असते. त्यांच्या उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत नावलौकिक मिळालेला आहे. म्हणूनच कोल्हापुरला गूळ आणि साखरेचे महाराष्ट्राचे कोठार म्हणतात. राज्यातील सर्वाधिक ३० लाख रव्याचे गूळ उत्पादन एकट्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये होते. सर्वात जास्त गूळ करवीर तालुक्यातील परंपरागत गुऱ्हाळघरातून उत्पादित होतो. कोल्हापुरच्या ग्रामीण संस्कृतीत गुऱ्हाळघरांना महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या प्रतवारीने जागतिक बाजारपेठेत पोहोचलेला कोल्हापूरी गुळ हे कोल्हापूरचे महत्त्वाचे वैशिष्ट्य.

शाहू महाराजांनी गूळ उद्योग विकसित करण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यामध्ये गूळ निर्यातीसाठी रेल्वे मार्गाची बांधणी, शाहूपुरी, जयसिंगपूर बाजारपेठांची निर्मिती केली. त्यातूनच १९०२ सालापर्यंत या बाजारपेठेमधून दरवर्षी ५० लाखांचा गूळ निर्यात झाल्याचा उल्लेख आढळतो. याच गूळ उद्योगाला प्रोत्साहन देण्याकरिता शाहू महाराजांनी शेतीला पाणीपुरवठा योग्य पद्धतीने व्हावा याकरिता केलेली धरणाची सोय, शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून केलेली सहकारी पतव्यवस्था, व्यापाऱ्यांना दिलेल्या मोफत प्लॉटस्, अन्य सुविधा, मोफत टेलिग्राम व पोस्ट व्यवस्थेची राबवलेली योजना या सर्व दूरदृष्टीच्या धोरणातूनच *कोल्हापूरी गूळ* बाजारपेठेत उदयास झाला. आजही याच नावाने प्रसिद्ध आहे. परंतु अलीकडे गुऱ्हाळघरांची स्थिती फारशी समाधानकारक नाही. कारण वाढलेला उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांना बाजारात मिळणारा कमी दर बाजारपेठेतील सौदाशक्ती. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती यामुळे जरी हा उद्योग संकटात सापडला असला तरी रोजगाराच्या दृष्टीने व शेतकऱ्यांच्या कौशल्याला संधी देणारा हा उद्योग आहे. त्यामुळे या उद्योगाची कार्यपद्धती त्यातील समस्या यांचा ऊहापोह होणे अपेक्षित आहे.

### गूळ निर्मितीची प्रक्रिया:

गुळाची प्रत ही सर्वस्वी गूळ तयार करण्याच्या गुळव्याच्या कौशल्यावर अवलंबून असते. पण गूळ तयार करण्याच्या या प्रक्रियेचे अजूनही नीट प्रमाणीकरण न झाल्याने गूळ तयार करणे ही एक कला मानली जाते. गूळ तयार करण्याकरिता साधारणपणे पुढील प्रक्रिया कराव्या

लागतात.

१) ऊसाची पक्वता व तोडणी - ऊसाचे वाडे पिवळे पडणे, पेऱ्यावर खणखणीत आवाज होणे, ऊस तोडताना पेऱ्यावर कटकन मोडणे, ऊसाची चोय उन्हात धरताच त्यातील साखरेचे कण दिसून येणे या ऊस उत्पादकांच्या पारंपरिक ज्ञानातूनच ऊसाची पक्वता पाहतात. शास्त्रीय पद्धतीने पक्वता पाहताना हॅन्ड रिफॅक्टोमीटर / ब्रिक्स हॅड्रोमीटरचा वापर करून ऊसातील रसाची घनता पाहतात. त्यास ऊस रसाची डिग्री म्हणतात. हे ब्रिक्स २१ डिग्रीपेक्षा जास्त झाल्यास तो पक्व मानतात. अशा ऊसाची तोडणी सकाळीच करतात. तोडल्यानंतर तो ६ ते १२ तासांतच गाळावा लागतो. दिवसा स्वच्छ प्रकाश, कोरडी हवा, कमाल व किमान तापमानातील अंतर अधिक असेल तरच ऊसातील साखरेत वाढ होते. म्हणूनच गुऱ्हाळे ही सर्वसाधारण पणे ऑक्टोबर-नोव्हेंबर पासून जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत सुरू असतात.

२) ऊसाचे गाळप व रस उकळणे - १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत तेलाच्या घाण्यासारख्या घाण्याने ऊस गाळाला जात होता. इ. स. १८०० नंतर चरख्याचा वापर केला. यानंतर तांत्रिक विद्युत शक्तीवर चालणाऱ्या रसवंती यंत्रांचा वापर केला जात आहे. यांच्या सहाय्याने काढलेला रस आधणात सोडतात. तेथून तो काहीलीत ठेवून चुलवाणावरती उकळण्याकरिता ठेवला जातो.

३) रसाचे शुद्धीकरण - रसातील घाण काढून टाकण्याकरिता उत्पादकांच्या ज्ञानानुसार, कळीचा चुना, फॉस्फरिक ॲसिड, हायड्रोल पावडर, भेंडीच्या झाडीचा रस मिसळतात. रस उकळताना त्याच्या पृष्ठभागावर असणारी मळी बाजूला काढतात.

४) रस प्रक्रियाकरण - कढईत ओतून तापविण्यास सुरवात झाल्यानंतर साधारणपणे अर्ध्या तासानंतर तो मळीला येतो. त्यातील नायट्रोजनयुक्त भाग घट्ट होऊन मळीच्या रूपाने तयार झालेला भाग तरंगू लागतो. त्याला ढोरमळी म्हणतात. ती काढण्याकरिता वनस्पतीजन्य पावडरीचा वापर करतात. रस उकळल्यानंतर ठराविक तापमानाला अंदाजे ११८ अंश ते १२४ अंश पर्यंत गेलेले असते. यापेक्षा जास्त तापमान झाल्यास गूळ घट्ट आणि तांबूस होतो. कमी झाल्यास नरम व पिवळसर होतो. याला गोळी धरणे असे म्हणतात. हे ओळण्यातच गुळव्याचे कौशल्य असते. गुळव्या आपल्या अनुभवाच्या व ज्ञानाच्या कौशल्यानुसार कढई केव्हा उतरावयाची याचा अंदाज घेतात. यावर गुळाचा दर्जा अवलंबून असतो.

५) गुळाच्या ढेपा पाडणे - पातळ थंड झालेल्या साच्याप्रमाणे त्याला आकार प्राप्त होतो. ढेपा घट्ट होण्यास साधारणपणे एक तास लागतो. १, ५, १०, ३० किलो यासारख्या आकाराच्या ढेप्याबरोबर मोदक व लहान आकाराच्या आयताकृती ढेपा तयार करतात. परंतु गूळ तयार करण्याचे तपमान व महत्त्वाची सूत्रे आधुनिक गुऱ्हाळ घराकरिता वापरली जातात. पारंपरिक पद्धतीत चालू असणाऱ्या गुऱ्हाळघरात गुळव्याच्या अंदाजावरच गुळाचे उत्पादन केले जात आहे.

**गुऱ्हाळघरासंबंधी सर्वसाधारण निष्कर्ष:**

गुऱ्हाळमालक, मजूर यांच्याकरिता राबवलेल्या प्रश्नावली व मुलाखत व निरीक्षण तंत्राद्वारे संकलित माहितीतून मिळालेले निष्कर्ष -

१. गुऱ्हाळघराचे केंद्रीकरण हे कोल्हापूर जिल्ह्यात

दिसून आले. तरी या जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात गुऱ्हाळघरांचे प्रमाण जास्त दिसून येते. तेथील जमिनीत हवामानामुळेच रसात स्फुरद, साखर वाढवण्याचे प्रमाण जास्त असण्याची क्षमता आहे. त्यामुळे हा गूळ उत्तम प्रतिचा असून त्याला असणाऱ्या मागणीमुळेच या उद्योगाचे केंद्रीकरण याच भागात दिसते.

२. गुऱ्हाळासाठी लागणारा ऊस स्वत:च्या व दुसऱ्याच्या शेतातून घेतात. एका रात्रीत ते कमीत कमी ४ तर जास्तीत जास्त ७ आदणे काढतात. एका आदणासाठी दोन ते अडीच टन उस लागतो. प्रत्येकाच्या आवश्यकतेनुसार १० ते १५ टन उसाची गरज लागत असल्याचे आढळून येते.

३. एका आदनातून २०० ते २५० किलो गूळ तयार होतो. या गूळ उत्पादनासाठी एकरी येणारा खर्च ३५-४० हजारांच्या आसपास येत असतो. हा गूळ उत्पादकांचा अपेक्षित खर्च आहे.

४. गूळ तयार करण्यासाठी जे मजूर लागतात त्यांचा मजुरीचा दर हा गुळव्याला एका काहिलीसाठी ३०० रु. व २ किलो गूळ तर मांडवकरी, घाणेकरी व चुलवे फडकरी यांना प्रत्येकी १५० रु. व १ किलो गूळ दिला जातो. त्याचबरोबर त्यांचे राहणे व इतर जीवनावश्यक गरजा भागवण्याच्या सुविधाही गूळ उत्पादकाला द्याव्या लागताना दिसतात.

५. गुऱ्हाळघरासाठीही २१ ते २५ मजुरांची गरज असते. मजूरांची संख्या गुऱ्हाळघराच्या आकारमानानुसार कमी जास्त असू शकते.

६. उत्पादित गुळाची विक्री सौदा पद्धतीने होते. यामध्ये कोल्हापूर मार्केट यार्डमधील बाजार समितीत व खाजगी अडत्यांच्या दुकानात केली जाते. उत्पादित मालाला किती किंमत मिळते याचा अंदाज गूळ उत्पादकांना नसतो. अलिकडे सर्वसाधारणपणे एक क्विंटलला ३,००० ते ३५०० पर्यंत दर प्राप्त होतो.

७. गुऱ्हाळ मालकांना आपला व्यवसाय करताना अडत्याकडून कर्ज घ्यावे लागते. बाजार समितीकडून कर्ज मिळते त्यावरील व्याजाचा दर जास्त असतो. त्यामुळे कर्ज घेणे परवडत नसल्याचे मत गुऱ्हाळ मालकांनी मांडले.

८. नैसर्गिक परिस्थितीचा सामना करता यावा अशा प्रकारची सुविधा निर्माण करण्यात गुऱ्हाळमालकांना समस्या निर्माण होतात. त्यातूनही झालेल्या नुकसानीचा आर्थिक फटका त्यांना सहन करावा लागतो.

९. गूळ तयार करण्यासाठी फॉस्फरिक ॲसिड, हायड्रोस पावडर, वनस्पतीयुक्त व प्रथिनयुक्त द्रव्ये यांचा वापर केला जातो. परंतु त्यांच्या किंमतीतील वाढीमुळे उत्पादन खर्च वाढताना दिसतो.

१०.वीजेची अनियमितता, वीज दरात झालेली वाढ याचा परिणाम उत्पादनावर झालेला दिसतो.

११. गूळ उद्योगाचा कोल्हापूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर परिणाम झालेला दिसतो. याच उद्योगाने ऊस शेतीचा विकास, रोजगार पुरवठा आणि शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती केली आहे.

१२.हा व्यवसाय अज्ञानी, अकुशल मजुरांना रोजगार मिळवून देतो. डोंगराळ, दुष्काळी भागात लोकांना कोणताच रोजगार, उत्पन्नाची

साधने नसतात. तेव्हा मजुरीसाठी लोक या व्यवसायाकडे वळतात. हा उद्योग पुरुषांबरोबर महिलांनाही रोजगार मिळवून देतो. अलिकडे महिलांचा बचत गट हा ऊस तोडणीपासून ते रसप्रक्रिया पर्यंतच्या सर्व कामात सक्रीय झालेला दिसतो. खेड्यातील अकुशल मजुरांना शहरीभागात न जाता या व्यवसायात रोजगार मिळवून देतो. त्यामुळे शहरी स्थलांतराचे प्रमाण कमी होते.

गुऱ्हाळघरातून वरील बाबी निदर्शनास आल्या तरीसुद्धा या उद्योगाचे महत्त्व पुढील मुद्द्यावरून दिसून येते यामध्ये लोकांच्या उपजीविकेचे साधन, जोडधंदा करण्यास उपयुक्त, या उद्योगापासून मिळणारे परकीय चलन, रोजगार मिळवून देण्यास सक्षम आणि ज्ञानावर व उत्पादकांच्या मजुरांच्या कौशल्यावर आधारित असा उद्योग असूनही या उद्योगाला पुढील समस्यांना जाणवताना दिसतात.

१) गुऱ्हाळघरासाठी लागणारा मजुरांचा पुरवठा पूर्वी मुकादम करीत होता. मुकादम उचल घेऊनही मजूर पुरवण्यात टाळाटाळ करताना दिसतात. गुऱ्हाळाच्या संख्येतील वाढीमुळे मजूर मिळविण्यासाठी स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे मजुरांच्या दरात, ते घेत असलेल्या उचल रकमेत वाढ होत असून त्याचा आर्थिक फटका मालकांना सहन करावा लागतो. त्यामुळे गुऱ्हाळघरातील मजुरांच्या वेतनदरात तफावत दिसते.

२) गुऱ्हाळघरांना केला जाणारा वीज पुरवठा व्यापारी पद्धतीने होतो. तसेच ग्रामीण भागात होणाऱ्या वीज भारनियमाचा फटकाही त्यांना सहन करावा लागतो. प्रसंगी त्यांनी केलेल्या जनरेटरच्या वापरामुळे डिझेल उत्पादन खर्चात वाढ होत आहे.

३) वीज कपात, पर्यावरणीय समस्या याचा परिणाम गुऱ्हाळघरावर होतो. त्याचा परिणाम मजुरांच्या वेतनदरावर आर्थिक परिस्थिती व राहणीमानावर होतो.

४) गुऱ्हाळमालकांना गुऱ्हाळे सुरू करण्यापूर्वी पूर्वतयारीसाठीही ४०-४५ हजार रुपयापर्यंत किरकोळ खर्च करावा लागतो. अशा वेळी योग्य वेळेत बँकांकडून अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही. तेव्हा अडत्या/सावकाराकडून अधिक व्याजदराने कर्ज घ्यावेच लागते. त्यामुळे आर्थिक ताणतणाव वाढताना दिसतो.

५) शासनाने गुऱ्हाळघराच्या किंमतीविषयी, कर्ज देण्याकरिता पद्धत याबाबतीत कोणतेही ठोस धोरण नाही. तसेच सरकारकडून अनुदान मदत, सहाय्य व मजुरांच्या बाबतीत मदत व इतर सुविधा देण्यात उत्साह दिसून येत नाही.

५) अजूनही गुळाची विक्री सौदा पद्धतीनेच होते. प्रतवारीनुसार गुळाला दर दिला जाणारा योग्य नाही. उत्पादन खर्चावर आधारित दर देण्याची पद्धत वापरली जात नसल्याने शेतकऱ्यांना योग्य दराची हमी मिळत नाही.

६) गुळाची साठवणूक कशी करावी ही समस्या शेतकऱ्याची असल्यामुळे शेतकरी बाजारात गूळ विक्रीस काढतात. तेव्हाच अडते गुळाला दर कमी देतात. त्याचबरोबर काही गुळाचे रवे काढून घेतात. याचा आर्थिक फटका शेतकऱ्याला बसतो.

७) बाजारातील अडते व दलाल शेतकऱ्यांचा

गूळ उत्पादकाकडून गूळ घेतल्यानंतर त्याचे बील देण्यातही दिरंगाई करतात. त्यांनी दिलेली किंमत योग्य आहे का याची दखलही घेतली जात नाही.

८) उत्पादन खर्चात होणारी वाढ, केमिकल्सच्या दरातील वाढ, शासनाकडून किमान आधारभूत किंमतीचा अभाव, हमाली व तोलाइ अधिक, हमालांचा संप, मजूर मिळवण्यात अडचण इ. समस्यांना गुऱ्हाळ मालकांना तोंड द्यावे लागते.

९) गुऱ्हाळमालकाप्रमाणे या व्यवसायात काम करणारा मजूर वर्ग, त्यांच्याबरोबर कामावर आलेली त्यांची मुलेही शिक्षणापासून अलिप्त राहताना दिसून येतात. तीही याच व्यवसायात काम करताना दिसतात.

१०) अलिकडे सरकारने शेतमाल तारण योजनेत गुळाच्या समावेश केला आहे. परंतु बाजारपेठेत गुळाचा दर लवकर वाढला नाही तर शेतकऱ्यांना व्याजासहित रक्कम द्यावी लागणार आहे. याचा फटका गूळ उत्पादकास होतो. त्यामुळे या योजनेचा फायदा होत नाही असे मत गुळ उत्पादकांचे असल्याचे दिसून येते.

वरील समस्यांतून या उद्योगाचे अस्तित्व टिकवणे गरजेचे आहे.

**उपाययोजना:**

१) गुऱ्हाळघरे ही मनुष्यबळावर आधारित असतात. त्यांना शिक्षणाची अट नसते. परंतु उत्पादनाची गती वाढविण्याकरिता काही तंत्राचा वापर करण्याकरिता काही तंत्रांचा वापर करण्याकरिता मजुरांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून उत्पादनातील वाढ करवून घ्यावी. याचे प्रशिक्षण शासनामार्फत द्यावे.

२) मजुरांची अनुपलब्धता हा गुऱ्हाळमालकांसाठी समस्या असते. ती कमी करण्याकरिता स्थानिक मजुरांना या व्यवसायाकडे येण्याकरिता प्रवृत्त करावे.

३) सरकारने गुळाला आधारभूत किंमतीची हमी द्यावी. सौदा पद्धत बंद करून उत्पादन खर्चावर आधारित दर देण्याची व्यवस्था करावी.

४) गुळाचा सौदा झाला की लगेच शेतकऱ्यांना त्याच्या मालाची किंमत द्यावी. शासनाने अनुदान व सहाय्य देण्याकरिता प्रयत्न करावेत.

५) सरकारने तारण योजनेत गुळाचा समावेश करण्याऐवजी गुळाला किंमतीची हमी द्यावी.

६) वीज वितरण कंपनीने व्यापारी पद्धतीने दराची आकारणी करू नये. तसेच वीज कपात सातत्याने करू नये.

७) गुळाचा दर्जा कसा असावा, आधुनिक पद्धतीने उत्पादन कसे करावे, गूळ निर्यातीकरिता कोणत्या प्रतीच्या गूळ उत्पादनांची गरज आहे याची माहिती गूळ उत्पादकाला देण्यात यावी. त्याच्याच निर्मितीसाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे.

८) गुळाच्या प्रतवारीनुसार गुळाची विक्री करावी.

९) बाजारसमितीतील व्यापारी, अडते, हमाल व तोलाई यावर योग्य नियंत्रण असावे.

१०) केमिकल्सच्या वाढत्या दरांचे नियंत्रण करावे.

११) सरकारने गूळ उद्योगाला कमी व्याज दराने कर्जपुरवठा उपलब्ध करून द्यावा.

**समारोप:**

छत्रपती शाहू महाराज यांनी संस्थान काळात पुरवलेल्या सुखसुविधा व प्रोत्साहनामुळेच

हा उद्योग विस्तृत प्रमाणात शेतकऱ्याच्या सांपत्तिक स्थितीत व रोजगारात वाढ होण्यास कारणीभूत ठरला आहे. परंतु या उद्योगाकडे साखर उद्योगाचा स्पर्धक अशा संकुचित अर्थाने पाहिले जाते. त्याचबरोबर नैसर्गिक परिस्थितीत व अनिश्चितता, गूळ तयार करण्याकरिता लागणाऱ्या साधनात झालेली दरवाढ, अवेळी पावसाने उताऱ्यात झालेली घट, किंमतीची अनिश्चितता, मजूर मिळविण्यातील अडचणी, सौदे बाजारपद्धती इ. समस्या गूळ उत्पादकांना लक्षात घेऊन उत्पादन करावे लागते. हा उद्योग प्रामुख्याने मनुष्यबळावर आधारित असणारा, रोजगारप्रधान, विकास क्षमता असलेला विकेंद्रित उद्योग म्हणून लक्षात घेतला जावा. गूळ उद्योगाला प्रेरणा मिळावी म्हणून बाजार समितीने किंमतीत स्थिरता राखण्याचा प्रयत्न करावा. समस्या सोडविण्याकरिता शासकीय पातळीवर गुऱ्हाळगृहासाठी योग्य ठोस धोरण निश्चित करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सरकारकडून सवलत, अर्थसहाय्य, अनुदान करात सवलत, कर्जपुरवठा कर्जाच्या व्याजदरात सवलत, निर्यात योग्य गूळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या बाबीचे प्रोत्साहनपर प्रशिक्षण द्यावे. गूळाची प्रत कशी ओळखावी, विक्री कशी करावी, उत्पादन खर्चावर आधरित किंमतीचे नियोजन, योग्य दराने वीजपुरवठा, नुकसान भरपाईस अर्थसहाय्य, यासारख्या उपाय योजनांचा अवलंब केला तर गूळ उद्योगाला चांगले भवितव्य येईल मेक इन इंडियाच्या संकल्पनेतील ग्रामीण रोजगाराचे, उत्तम दर्जाच्या उत्पादनाचे व निर्यातवाढीचे उद्दिष्ट शेतीआधारित उद्योगातून साध्य होईल. यातून ग्रामीण विकास करण्याचे स्वप्न खऱ्या अर्थाने साध्य होईल.

**संदर्भ सूची:**

पुस्तके-

१.डॉ. देशपांडे, डॉ. मृणालिनी, *श्रम अर्थशास्त्र*, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९९, पृ.३२-३५.

२.सौ. कुलकर्णी मीना आणि कुळवणी व. शि., *श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण*, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ.१४.

३.प्रा. मंगारे जाधव, शिंदे, ज. का. पाटील, *गूळ आणि काकवी तयार करण्याचे सुधारित तंत्रज्ञान*, डॉ.रा.बा.देशमुख महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, नवीन आवृत्ती २००६ , पृ.२३.

४.डॉ. पवार जयसिंगराव, *राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ*, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. जानेवारी २००१, पृ.२०२-०३ व ६२३-२५

अहवाल -

१.करवीर तहसिलदार कार्यालयीन कागदपत्रे, संक्षिप्त करवीर तालुका टिपणी, २०१२-१३.

२.कोल्हापूर जिल्हा शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर सर्वसाधारण माहिती अहवाल व कार्यालयीन कागदपत्रे, २०१२-१३.

मासिके-

१.गोडवा महाराष्ट्र राज्य शेतकरी सहकारी कारखाना संघ, मुंबई, १९९०

वर्तमानपत्रे-

१.दैनिक पुढारी, दि.२४ डिसेंबर २०१४, वर्धापन दिन विशेषांक.

२.दैनिक लोकमत, दि.२५ नोव्हेंबर २००५, दि.२४ डिसेंबर २०१४ व दि. ८ डिसेंबर २०१५.

३.दैनिक सकाळ, दि. १६ डिसेंबर २०१६.

४.दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. १८ नोव्हेंबर २०१२ यामधील लेख.

# महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांच्या समस्या

**शिवाजी कारभारी ढगे, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख व समन्वयक, अर्थशास्त्र संशोधन केंद्र
बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी,
भ्रमणध्वनी: ९८५०७३२०३७

प्रस्तावना:

द्राक्ष हे नगदी पिकांच्या फळांत मोडणारे असून जगातील फळांच्या उत्पादनापैकी प्रतिवर्षी सुमारे ४० दशलक्ष टन उत्पादन द्राक्षापासून मिळते. जगातील खाद्यपदार्थांमध्ये द्राक्षाचा क्रमांक आठवा लागतो. जगाच्या पाठीवर अनेक देशात द्राक्ष लागवड केली जाते. जगात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र अंदाजे १.२ कोटी हेक्टरपेक्षा जास्त असून त्यामानाने भारतातील द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र अत्यंत कमी आहे. जगात द्राक्ष उत्पादन करणारे जे प्रमुख देश आहेत त्यात भारताचा क्रमांक ११ वा लागतो. परंतु प्रति हेक्टर उत्पादनाच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक (२१.८ टन) लागतो. भारतात द्राक्ष लागवडीच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला लागतो. भारतातील एकूण द्राक्ष लागवडीखालील क्षेत्रापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्र एकट्या महाराष्ट्रात दिसून येते. महाराष्ट्रात २०१४-१५ मध्ये द्राक्ष लागवडीखालील एकूण क्षेत्र ८७०२९ हेक्टर एवढे होते तर द्राक्षाचे उत्पादन २०००३३३ मे. टन झाले होते. महाराष्ट्रातील एकूण द्राक्ष लागवडीखालील क्षेत्रापैकी एकट्या नाशिक जिल्ह्यात ५१०६४ (५८.६७ टक्के) हेक्टर क्षेत्र दिसून येते. तर एकूण उत्पादनापैकी ११२३४०८ मे. टन उत्पादन एकट्या नाशिक जिल्ह्यात दिसून येते. महाराष्ट्रात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, सांगली, सोलापूर, पुणे, अहमदनगर, सातारा या जिल्ह्यात द्राक्षाचे उत्पादन होते. त्यात प्रामुख्याने नाशिक जिल्हा आघाडीवर आहे.

या अभ्यासाची पुढील उद्दिष्ट्ये आहेत:

१) द्राक्ष लागवड व विपणनातील समस्यांचा अभ्यास करणे

२) द्राक्ष लागवड व विपणनातील समस्यांबाबत योग्य ते उपाय सुचविणे.

**अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत अभ्यासात प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करून माहिती मिळविली. पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्ष लागवडीखालील क्षेत्रात नाशिक जिल्ह्यातील क्षेत्राचा वाटा अधिक आहे म्हणून नाशिक जिल्ह्याची निवड विशेष अभ्यासासाठी केली आहे. नाशिक जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी ५ तालुक्यांमध्ये (निफाड, नाशिक, दिंडोरी, चांदवड व बागलाण) ९० टक्के क्षेत्र असल्याने त्या तालुक्यांची निवड करून त्या तालुक्यातील १५ गावे अभ्यासासाठी निवडली. या १५ गावातील शेतकऱ्यांची यादी तयार करून स्तरित यादृच्छिक नमुना पध्दतीने ४०४४ शेतकऱ्यांपैकी ५ टक्के म्हणजे २०२ शेतकरी निवडले. या शेतकऱ्यांकडून माहिती घेण्याकरिता २०१२-१३ मध्ये प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती घेऊन तिचे पृथःकरण केले. यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे क्षेत्राप्रमाणे शेतकऱ्यांचे लहान शेतकरी ८०(०.०१ ते २.०० हेक्टर) मध्यम शेतकरी ६८(२.०१ ते ४.०० हेक्टर) आणि मोठे शेतकरी ५४(४ हेक्टरच्या पुढे) असे गट तयार करून एकूण २०२ शेतकऱ्यांचा अभ्यास केला.

**द्राक्ष लागवडीच्या समस्या:**

द्राक्ष बाग ही किफायतशीर शेती असली तरी ते पूर्णांशाने खरे नाही. द्राक्ष पिकविताना असंख्य अडचणी येतात. सुरूवातीस प्रचंड मोठा भांडवली खर्च असतो. कीड, रोगांची औषधे उत्तम दर्जाची मिळत नाहीत. संजीवके वेळेवर मिळत नाहीत. विक्रीबाबतीत दलाल व व्यापाऱ्यांकडून फसवणूक होण्याची शक्यता असते. निर्मितीचा खर्चही प्रचंड असतो. त्यामुळे प्रत्यक्ष पदरात फार वाढावा मिळत नाही. अशा एक नाही हजार समस्या. या समस्या दूर करून द्राक्षशेती करणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे.

द्राक्ष लागवड ही शास्त्रीय पध्दतीने केली जाते. द्राक्ष लागवडीपासून ते उत्पादन घेईपर्यंत शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सदरच्या अभ्यासात द्राक्ष लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ज्या महत्त्वाच्या समस्या दिसून आल्या, त्यात प्रामुख्याने पाण्याची टंचाई, सतत वाढणाऱ्या पीकसंरक्षक व खतांच्या किंमती, कडाक्याची थंडी व अकाली गारपीट, द्राक्षावरील रोग, बँकांचा वाढता व्याज दर, मजुरांची टंचाई ह्या होत. द्राक्ष लागवडीबाबत शेतकऱ्यांना ज्या महत्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या समस्या पुढील पृष्ठावर तक्ता १ मध्ये दाखविल्या आहेत.

तक्ता १ मध्ये द्राक्षावरील वाढते रोग, कडाक्याची थंडी व अकाली गारपीट या समस्या एकूण शेतकऱ्यांपैकी १९३ शेतकऱ्यात (९५.५४ टक्के) महत्वाच्या असल्याचे दिसून आले. अकाली गारपीटी मुळे द्राक्षाच्या बागांचे संपूर्णपणे नुकसान झाल्याचे दिसून आले व त्याची धास्ती शेतकऱ्यांनी घेतल्याचे दिसून आले. तसेच कडाक्याच्या थंडीमुळे रोगांचे प्रमाण वाढते व वेलीवर घड येत नाहीत किंवा घड येण्याचे प्रमाण कमी होते. त्याचप्रमाणे द्राक्षावरील रोगांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. करपा, केवडा (साखऱ्या), भुरी, डेडआर्म या रोगांमुळे व उडद्या किडीमुळे मोठ्या प्रमाणात बागेचे नुकसान होते. या रोगांची लक्षणे दिसू लागताच ताबडतोब फवारणी न केल्यास संपूर्ण बाग उध्वस्त होते. या रोगांमुळे पीक संरक्षण खर्च मोठ्या प्रमाणावर

## तक्ता १-द्राक्ष लागवडीबाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या

| समस्या | लहान शेतकरी | मध्यम शेतकरी | मोठे शेतकरी | समस्या असणारे एकूण शेतकरी | निर्देशित समस्या नसणारे शेतकरी | एकूण शेतकरी |
|---|---|---|---|---|---|---|
| सतत वाढणाऱ्या पीकसंरक्षण व खतांच्या किंमती | ७२ (३५.६४) | ५८ (२८.७१) | ४१ (२०.३०) | १७१ (८४.६५) | ३१ (१५.३५) | २०२ (१००.००) |
| द्राक्षावरील रोग | ७८ (३८.६१) | ६५ (३२.१८) | ५० (२४.७५) | १९३ (९५.५४) | ०९ (४.४६) | २०२ (१००.००) |
| मजुरांची टंचाई | ६२ (३०.६९) | ५५ (२७.२३) | ४४ (२१.७८) | १६१ (७९.७०) | ४१ (२०.३०) | २०२ (१००.००) |
| व्याजाचा दर | ४६ (२२.७७) | ३२ (१५.८४) | १० (४.९५) | ८८ (४३.५६) | ११४ (५६.४४) | २०२ (१००.००) |
| कडाक्याची थंडी व अकाली गारपीट | ७६ (३७.६२) | ६६ (३२.६७) | ५१ (२५.२५) | १९३ (९५.५४) | ०९ (४.४६) | २०२ (१००.००) |
| पाण्याची समस्या | ४८ (२३.७६) | ४४ (२१.७८) | ४७ (२३.२७) | १३९ (६८.८१) | ६३ (३१.१९) | २०२ (१००.००) |
| इतर समस्या | ३९ (१९.३१) | २५ (१२.३८) | ०७ (३.४६) | ७१ (३५.१५) | १३१ (५४.८५) | २०२ (१००.००) |

*(कंसातील आकडे एकूण शेतकऱ्यांशी शेकडा प्रमाण दर्शवितात)*

होतो. एकूण शेतकऱ्यांपैकी १७१ शेतकऱ्यांची (८४.६५ टक्के) पीक संरक्षण व खतांच्या वाढत्या किंमती ही समस्या दिसून आली. दहा वर्षापूर्वी जेवढा खर्च येत होता त्याच्या आज सहापट खर्च येतो. परंतु उत्पन्न मात्र तेवढेच आहे असे अनेक शेतकऱ्यांनी सांगितल्याचे दिसून आले. मजुरांच्या टंचाईबद्दल एकूण शेतकऱ्यांपैकी १६१ शेतकऱ्यांनी (७९.८० टक्के) नाराजी व्यक्त केली. द्राक्ष लागवडीकडे रोजगार पुरविणारी लागवड म्हणून पाहिले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणात मजुरांची टंचाई दिसून येते. द्राक्ष हंगामात मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता असते. परंतु वेळेवर मजूर उपलब्ध होत नाहीत त्यामुळे, बहुतांशी शेतकऱ्यांनी बरीचशी कामे करार पध्दतीने दिली असल्याचे दिसून आले. मोठ्या गटातील शेतकऱ्यांनी दुसऱ्या जिल्ह्यातून सुध्दा स्वतःच्या वाहनातून मजुरांची ने-आण करण्याची सोय करून ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

एकूण शेतकऱ्यांपैकी ४३.५६ टक्के शेतकऱ्यांनी पतसंस्थांच्या व्याजाचा दर परवडत नसल्याचे सांगितले. द्राक्षबाग उभी करणे म्हणजे त्यासाठी भांडवल मोठ्या प्रमाणात लागते व दरवर्षी करावा लागणारा खर्च हा सुध्दा कमी नसतो. द्राक्ष लागवड करणे खर्चीक असते. ज्यांच्याकडे स्वतःचे भांडवल असते त्यांनाच द्राक्ष लागवड करणे परवडते असे दिसून आले. बँकेचे कर्ज घेऊन जर बाग तोट्यात गेली तर ते कर्ज फेडणे अवघड असते, म्हणून बँकांचा सध्याचा व्याज दर हा जास्त असल्याचे दिसून आले.

द्राक्ष लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या इतर समस्यांकडेसुध्दा दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यासुध्दा महत्त्वाच्या आहेत. एकूण शेतकऱ्यांपैकी ३५.१५ टक्के शेतकऱ्यांच्या इतरही समस्या असल्याचे दिसून आले. बाजारात बनावट औषधे मिळणे, रेडोमील सारखे औषध उपलब्ध न होणे, सेंद्रिय खतांची टंचाई व विजेची टंचाई ही कारणे दिसून येतात.

काही शेतकऱ्यांनी गुजरात राज्यातून सेंद्रिय खते आणली असल्याचे दिसून आले. द्राक्षाची गुणवत्ता वाढविण्यासाठी संजीवकांचा वापर केला जातो. ही संजीवके (जिबरेलिक ॲसिड) द्राक्ष बागायतदार संघ आयात करून शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा तत्त्वावर पुरवितो. मात्र ही संजीवके वेळेवर उपलब्ध झाली नाहीत, तर शेतकऱ्यांना ती बाजारात विकत घ्यावी लागतात. परंतु ती खात्रीची नसल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे असे दिसून आले.

**द्राक्ष विपणनाच्या समस्या:**

द्राक्ष हे फळ इतर फळांच्या मानाने जास्त नाशवंत आहे. कारण ते वेलीवर पिकल्यानंतरच काढले जाते. त्यामुळे त्याची थोड्या अवधीतच विक्री व्हायला हवी असते. द्राक्ष लागवडीप्रमाणेच द्राक्ष विपणनात सुध्दा उत्पादकांना तोंड द्यावे लागते. त्यातील ज्या समस्या महत्त्वाच्या आहेत त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यात प्रामुख्याने शीतगृहांचा अभाव, वाहतुकीचा खर्च, पॅकिंगचा खर्च, मजुरी व मध्यस्थांचा मोबदला या महत्त्वाच्या आहेत.

**द्राक्ष विपणनाबाबत शेतकऱ्यांच्या समस्या:**

द्राक्ष विपणनात ज्या महत्त्वाच्या समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते त्या समस्या तक्ता २ मध्ये दाखविल्या आहेत.

**तक्ता २- द्राक्ष लागवडीबाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या**

| समस्या | लहान शेतकरी | मध्यम शेतकरी | मोठे शेतकरी | समस्या असणारे एकूण शेतकरी | निर्देशित समस्या नसणारे शेतकरी | एकूण शेतकरी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुशल मजुरांची अनुपलब्धता | ७० (३४.६५) | ६१ (३०.२०) | ५१ (२५.२५) | १८२ (९०.१०) | २० (९.९०) | २०२ (१००.००) |
| मजूर मिळण्याची अनिश्चितता | ४९ (२४.२६) | ३१ (१५.३५) | २२ (१०.८९) | १०२ (५०.५०) | १०० (४९.५०) | २०२ (१००.००) |
| पॅकिंग साहित्याची किंमत जास्त | ७२ (३५.६४) | ६३ (३१.१९) | ४६ (२२.७७) | १८१ (८९.६०) | २१ (१०.४०) | २०२ (१००.००) |
| वाहतुकीचा खर्च जास्त | ७१ (३५.१५) | ६० (२९.७०) | ४५ (२२.२८) | १७६ (८७.१३) | २६ (१२.८७) | २०२ (१००.००) |
| पूर्वशीतकरण व शीतगृहाचा अभाव | ६९ (३४.१६) | ६२ (३०.६९) | ४८ (२३.७६) | १७९ (८८.६१) | २३ (११.३९) | २०२ (१००.००) |
| इतर समस्या | -- | -- | ०४ (१.९८) | ०४ (१.९८) | १९८ (९८.०२) | २०२ (१००.००) |

*(कंसातील आकडे एकूण शेतकऱ्यांशी शेकडा प्रमाण दर्शवितात)*

तक्ता २ मध्ये एकूण शेतकऱ्यांपैकी १८२ शेतकऱ्यांना (९०.१० टक्के) कुशल मजूर उपलब्ध होत नसल्याचे दिसून आले. द्राक्षांची हाताळणी कौशल्यपूर्वक केली जाते. त्याकरिता कुशल मजुरांची आवश्यकता असते. उदा. घड स्वच्छ करणे, प्रतवारी करणे व पॅकिंग करणे या कामासाठी हंगामात कुशल मजुरांची आवश्यकता असते. कुशल कामगार मिळविण्यासाठी द्राक्ष उत्पादकांमध्ये चढाओढ सुरू होते. त्याकरिता प्रत्येक द्राक्ष उत्पादक जास्तीत जास्त वेतन देऊन कुशल कामगार मिळवण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचप्रमाणे द्राक्षांची छाटणी, घड बुडविणे, घडांची विरळणी या कामांसाठी अकुशल कामगारांची आवश्यकता असते. त्यावेळी सुध्दा हे मजूर मिळविण्यासाठी चढाओढ चालू असते. हे मजूर मिळण्याची सुध्दा अनिश्चितता असते असे ५०.५० टक्के शेतकऱ्यांनी सांगितल्याचे दिसून येते.

द्राक्ष बाजारपेठेत पाठविण्यासाठी शेतकरी योग्य अशी पॅकिंग करतात. निरनिराळ्या बाजारपेठेसाठी निरनिराळ्या प्रकारचे पॅकिंग केले जाते. देशांतर्गत बाजारपेठेसाठी दोन किलो व चार किलोच्या पॅकिंगचा वापर केला जातो. तर इंग्लडच्या बाजारपेठेसाठी पाच किलो व ८.२ किलोच्या पॅकिंगचा वापर केला जातो. पॅकिंग खर्च मोठ्या प्रमाणावर येत असल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी बागेतच विक्री करण्याचे पसंत केले. एकूण शेतकऱ्यांपैकी १८१ शेतकऱ्यांनी (८९.६० टक्के) पॅकिंग साहित्याची किंमत जास्त असल्याचे सांगितले. द्राक्ष निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांनी इंग्लंडसारख्या देशात द्राक्षे पाठविताना ती सुरक्षित राहवीत यासाठी ग्रेपगार्डसारखा कागद ही बॉक्सेस आयात करावी लागतात त्यामुळे त्यांची किंमत वाढते.

एवढ्या भारी किंमतीचे पॅकिंग वापरले व त्या प्रमाणात भाव मिळाला नाही तर मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्याला तोटा सहन करावा लागतो. ग्रेप गार्डसारख्या कागदाची किंमत सुध्दा जास्त असते. त्यामुळे पॅकिंग साहित्यांच्या जास्त किंमतीमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी दिसून येते. देशांतर्गत बाजारपेठेतील पॅकिंगला सुध्दा जास्त खर्च येतो.

एकूण शेतकऱ्यांपैकी १७६ शेतकऱ्यांनी (८७.१३ टक्के) वाहतुकीचा खर्च जास्त येत असल्याचे सांगितले. वाहतुकीच्या साधनांचा विचार करता बहुतेक शेतकरी ट्रकने माल पाठवितात. कारण ट्रक ताबडतोब उपलब्ध होतात. रेल्वेची सोय जलद असूनही वेळेवर उपलब्ध होत नाही. द्राक्ष हंगामाच्या वेळी अनेकदा रेल्वे अधिकारी, मंत्री यांना विनंती करूनही त्यांनी रेल्वेची सोय केलेली नाही. म्हणून शेतकरी ट्रकनेच माल पाठवितात. शिवाय रेल्वेमध्ये माल पाठविल्यास मालाची नासाडी होते तसेच माल चोरीला जातो. ट्रकने जास्त खर्च येत असूनही नाईलाज म्हणून माल पाठवावा लागतो.

पूर्वशीतकरण व शीतगृहांचा अभाव असल्याचे ८८.६१ टक्के शेतकऱ्यांनी सांगितले. पूर्वशीतकरण व शीतगृहांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना ताबडतोब येईल त्या किंमतीला माल विकणे भाग पडते. पूर्वशीतकरणाच्या बाबतीत वेलींवरून द्राक्षे काढल्यानंतर दोन तासांच्या आत ती पूर्वशीतकरण गृहात पोहोचली पाहिजेत. शीतगृहात ६ ते १० तासात ९५ टक्के सापेक्ष आर्द्रता समवेत द्राक्षांचे तापमान २° सेल्सिअस

आणले जाते. पूर्वशीतकरण केलेला माल इन्सुलेटिंग व्हॅनमधून शीतगृहात पॅकिंग रूममध्ये आणला जातो. हा खर्च करणे शेतकऱ्याला परवडत नाही. परंतु हा खर्च केला तर द्राक्ष पेट्या शीतगृहात ०° ते ०.५° सेल्सिअस तपमानात ठेवल्यास ५ ते ६ महिने द्राक्षे चांगल्या स्थितीत टिकवता येतात. परंतु हा खर्च करणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेरचे असते. तसेच इतर समस्यांबाबत चार शेतकऱ्यांनी (१.९८टक्के) निर्यातीसाठी कंटेनर वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे सांगितले. हे शेतकरी मोठ्या गटातील आहेत. एक कंटेनर पूर्ण भरण्यासाठी साधारणतः १५ टन माल लागतो व तो माल एकसारखा असावा लागतो. त्यामुळे लहान शेतकरी निर्यात करू शकत नाही. कारण प्रत्येकाच्या मालामध्ये फरक पडत असतो. कंटेनर वेळेवर उपलब्ध झाला नाही तर शेतकऱ्यांना वेळेवर मालाची निर्यात करता येत नाही असे दिसून येते.

**द्राक्ष विपणनाबाबत मध्यस्थांमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्याः**

द्राक्षाचे उत्पादन घेणे शेतकऱ्यांच्या हातात असते. परंतु विक्री करण्याचे काम दुसऱ्याच्या हातात असते. त्यामुळे उत्तम दर्जाची द्राक्षे देखील योग्य दरात विकली जाऊन हाती चांगला पैसा मिळेल याची खात्री प्रत्यक्षात पैसा हातात पडेपर्यंत नसते. शेतकऱ्यांना द्राक्ष विपणनाच्या बाबतील मध्यस्थांमुळे येणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. शेतकऱ्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या समस्या तक्ता ३ मध्ये दाखविल्या आहेत.

**तक्ता ३- द्राक्ष विपणनाबाबत मध्यस्थांमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या**

| गट | कमिशन एजंटकडून | दलालीचे दर (कमिशन)जास्त | इतर समस्या |
|---|---|---|---|
| लहान शेतकरी | ६९ (३४.१६) | ७३ (३६.१४) | ४० (१९.८०) |
| मध्यम शेतकरी | ६० (२९.७०) | ६५ (३२.१८) | २९ (१४.३६) |
| मोठे शेतकरी | ५१ (२५.२५) | ५२ (२५.७४) | ३४ (१६.८३) |
| समस्या असणारे एकूण शेतकरी | १८० (८९.११) | १९० (९४.०६) | १०३ (५०.९९) |
| निर्देशित समस्या नसणारे शेतकरी | २२ (१०.८९) | १२ (५.९४) | ९९ (४९.०१) |
| एकूण शेतकरी | २०२ (१००.००) | २०२ (१००.००) | २०२ (१००.००) |

*(कंसातील आकडे एकूण शेतकऱ्यांशी शेकडा प्रमाण दर्शवितात)*

तक्ता ३ मध्ये एकूण शेतकऱ्यांपैकी १८० शेतकऱ्यांनी (८९.११ टक्के) कमिशन एजंटकडून पैसे मिळण्यास बराच विलंब लागतो असे सांगितले. तर ९४.०६ टक्के शेतकऱ्यांनी दलालीचा दर (कमिशन) जास्त असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक बाजारपेठेतील दलालीचा दर वेगवेगळा असल्याचे दिसून आले. परंतु हा दर सुध्दा जास्त असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. तसेच कमिशन, दलाली व्यतिरिक्त अनेक प्रकारे शेतकऱ्यांकडून अनधिकृत कपात करतात. कमिशन एजंट द्राक्षाची विक्री करून शेतकऱ्यांना मालाच्या विक्रीची पट्टी पाठवितात. त्यामध्ये शेतकऱ्यांचे नाव, एकूण पेट्यांची संख्या, पेटीचे वजन, द्राक्षाची जात, पेटीचा दर, एकूण विक्री, एकूण खर्च आणि निव्वळ विक्री असे नमूद केलेले असते. एकूण खर्चामध्ये दलाली व वाहतूक खर्च नमूद केलेले असतात. याव्यतिरिक्त धर्मादाय, इमारत निधी, देणगी, कर, व इतर खर्च अशा इतर अनेक बाबी असतात. हा खर्च अनाधिकृत असतो आणि त्या खर्चाची कपात एकूण विक्रीमधूनच होत असते. व उरलेले पैसे नंतर शेतकऱ्यांना पाठवितात. या अनाधिकृत कपातीमुळे शेतकऱ्यांना कमी पैसे मिळतात.

द्राक्ष विपणनात मध्यस्थांमुळे देखील अनेक समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. त्यांचे प्रमाण ५०.९९ टक्के आहे. १) कमिशन एजंट किंवा घाऊक व्यापारी दूरच्या बाजारपेठेत असतील तर ते शेतकऱ्यांना किती माल खराब झालेला असतो हे सांगतात किंवा काही वेळेस तो खराब सुध्दा झालेला नसतो. २) सर्वसाधारणत: कमिशन एजंट शेतकऱ्याला खरी माहिती सांगत नाही. ३) थेट बागेतून माल घेणारे घाऊक व्यापारीसुध्दा बहुतेक वेळा पैसे बुडवितात. हे व्यापारी सुरूवातीला शेतकऱ्यांना उचल देतात. निम्मा माल मिळेपर्यंत पैसे बरोबर देतात. परंतु नंतर माल विकल्यानंतर पैसे देतो किंवा इतर अनेक कारणे सांगून त्यांनी शेतकऱ्यांनी फसवणूक केल्याचे दिसून आले. ४) याशिवाय दूरच्या बाजारपेठेविषयी शेतकऱ्यांना माहिती नसते. ५) प्रतवारी आणि पॅकिंग विषयी त्यांना योग्य मार्गदर्शन नसते. ६) तसेच बाजारभावाची अनिश्चितता असते.

वरील प्रकारच्या विपणनाच्या समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. तसेच निर्यात मालावर इंग्लंडच्या बाजारपेठेत १८ टक्के आयात कर आकारला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना ह्या खर्चाचा भुर्दंड सोसावा लागतो परिणामी निव्वळ विक्री किंमत कमी मिळते. वरील प्रकारच्या विपणनाच्या समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. तसेच निर्यात मालावर इंग्लंडच्या बाजारपेठेत १८ टक्के आयात कर आकारला जातो त्यामुळे शेतकऱ्यांना ह्या खर्चाचा भुर्दंड सोसावा लागतो परिणामी निव्वळ विक्री किंमती कमी मिळते.

## शिफारशी:

सध्याच्या परिस्थितीत द्राक्ष लागवड ही अतिशय खर्चिक होत चालली आहे. द्राक्ष लागवडीसाठी सुरूवातीच्या काळात मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करावा लागतो. द्राक्ष उत्पादकांचे वाढत्या उत्पादन खर्चावर नियंत्रण नाही. त्याकरिता सतत वाढणाऱ्या खते, पीक संरक्षक तसेच इतर साहित्याच्या किंमती कमी असणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन तसेच द्राक्ष

उत्पादनाचे अर्थव्यवस्थेतील व्यापारी महत्त्व लक्षात घेऊन द्राक्ष लागवडीत वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने या वस्तूंच्या किंमती निश्चित करणे आवश्यक आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कर्ज काढून द्राक्ष उत्पादन घेणे म्हणजे मोठी जोखीम स्वीकारण्यासारखे असते. कारण द्राक्ष लागवडीसाठी कर्ज काढले आणि त्यावर्षी व्यवस्थित फळ आले नाही तर तो शेतकरी कर्जबाजारी होतो. त्याकरीता बँकांनी द्राक्ष लागवडीसाठी कमी व्याजाच्या दराने वित्त पुरवठा करावा. द्राक्ष उत्पादनासाठी लागणारी औषधे व संजीवके बऱ्याच वेळी कमी प्रतीची वा बनावट मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होते. त्याकरिता शासनाने औषध विक्रेत्यांवर कडक कारवाई करावी. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी ॲगमार्क असलेली औषधेच विकत घ्यावीत. मात्र तशी औषधे शेतकऱ्यांना मिळण्याची शासनाने सोय करावी.

द्राक्ष पिकावर रोग येऊ नये यासाठी वारंवार औषधाच्या फवारण्या कराव्या लागतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. या पिकावर रोग येऊ नये यासाठी व हा खर्च कमी व्हावा याकरिता कृषी तज्ज्ञांचे योग्य ते मार्गदर्शन मिळण्याची गरज आहे. तसेच शास्त्रज्ञांनी द्राक्षावर येणाऱ्या रोगावर संशोधन करून त्या दृष्टीने रोगप्रतिबंधक द्राक्ष वेलींचे प्रकार शोधून काढण्याची गरज आहे.

द्राक्ष लागवडीसाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांचा वापर अधिक केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन जमिनीचा पोत सुधारेल व उत्पादन वाढण्यास मदत होईल. द्राक्ष लागवडीत लहान शेतकऱ्यांचे प्रमाण दिसून येते. फलोत्पादन योजनेत द्राक्ष लागवडीचा समावेश केल्यास त्याचा फायदा लहान शेतकऱ्यांना होऊन द्राक्ष लागवडीत वाढ होण्यास मदत होईल.

सध्याच्या काळात द्राक्षाचे विपणन हे सुध्दा अतिशय किचकट झाले आहे. ते पूर्णपणे विपणन यंत्रणेच्या उच्च तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. द्राक्ष उत्पादकांचे वाढत्या विपणन खर्चावर खर्चावर अजिबात नियंत्रण नाही. तेव्हा सद्यपरिस्थितीत उत्पादकांच्या समोर एकच मार्ग आहे व तो म्हणजे द्राक्षाचा दर्जा सुधारणे म्हणजेच नंबर एक प्रतीचीच द्राक्षे उत्पादित करणे किंवा नंबर दोनच्या मालाचे नंबर एकमध्ये रूपांतर करणे व नंबर तीनच्या मालाचे नंबर दोनच्या मालामध्ये रूपांतर करणे. हे साध्य करावयाचे असेल तर प्रमाणित पॅकिंगवर १० ते १५ टक्के खर्च जास्त करून वापर करणे. त्यामुळे उत्पादकांना द्राक्ष विक्रीपासून जास्त उत्पन्न मिळेल.

विपणनात दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे द्राक्ष उत्पादक हे निर्यातीच्या बाबतीत जागरूक झाले असल्यामुळे त्यांना निर्यातीसाठी आवश्यक ती साधन सामुग्री किंवा पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे. उदा. पूर्वशीतकरणाची उभारणी, शीतगृहे, बर्फाच्छादित कंटेनर्स, बोटीत वा विमानात जागेची उपलब्धता व त्यासाठी खर्चाच्या सवलतींचा समावेश याशिवाय इतर देशातील द्राक्ष आयातीवरील ड्युटी माफ करणे किंवा कमी करावयास भाग पाडणे. यासाठी सरकारने द्राक्ष उत्पादकांना जास्तीत जास्त मदत करण्याची आवश्यकता असून त्यांना प्रत्यक्ष

निर्यातीमध्ये सामील होण्यासाठी उत्तेजन देणे गरजेचे आहे.

ज्या व्यापारी व आंतरराष्ट्रीय संस्था द्राक्ष निर्यातीचे काम करतात त्यांना देखील राज्य व केंद्र सरकारने आर्थिक आणि प्रशासकीय स्वरूपाची मदत करणे आवश्यक आहे.

जर द्राक्षे निर्यात करावयाची असतील तर योग्य हंगामात द्राक्षाची छाटणी घेणे सुध्दा महत्वाचे आहे. युरोपच्या बाजारपेठेसाठी छाटणी उशिरा म्हणजेच ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात घेणे योग्य होईल. त्यामुळे १५ मार्चपासून एप्रिलपर्यंत द्राक्ष काढणी होईल. अरब राष्ट्रांसाठी रमजान सणाच्या वेळी द्राक्षे उपलब्ध व्हावीत अशा वेळी लवकर छाटणी घेणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच आपण कोणत्या बाजारपेठेत द्राक्षे निर्यात करणार आहोत याचे अगोदर नियोजन केले पाहिजे. उत्पादनासाठी व विक्रीसाठी अनुभवी संस्थांकडून, सरकारी संस्थांकडून, कृषि विद्यापीठातून व अन्य मार्गांनी माहिती मिळविणे फार गरजेचे आहे. निर्यात करणाऱ्या संस्थांनी एकमेकांमध्ये समन्वय साधून एकूण द्राक्ष निर्यातीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. निर्यात करणाऱ्या देशांमध्ये हमीची बाजारपेठ उभी करण्यासाठी सरकारने कमीत कमी दोन ते तीन वर्षे सहकार्य करावे. उदा. चिली देशात सरकार निर्यातदारांना जास्तीत जास्त सबसिडी देते. त्यामुळे तो देश युरोपीय बाजारपेठेत पूर्णपणे स्थिरावला आहे. निर्यातदारांची एक स्वतंत्र सरकारमान्य संस्था असावी. या संस्थेमार्फत उत्पादकांना निर्यातक्षम द्राक्षाचे भाव निश्चित करता येतील. उदा. कापूस खरेदी योजना, तेलबिया योजना इ. यामुळे निर्यातदारांमध्ये चढाओढ होईल व उत्पादकांना किंमतीबद्दल हमी मिळेल. संपर्क व्यवस्था अतिशय कार्यक्षम असावी, ज्यायोगे द्राक्षांना कोणत्या बाजारपेठेत किती मागणी आहे हे समजेल. त्याद्वारे योग्य वेळी योग्य बाजारपेठेत द्राक्षे विकता येतील. याकरिता शासनाने संपर्क व्यवस्था राबवावी. तसेच निर्यातीसाठी निर्यातदारांनी एकत्रित येऊन पुरवठा व मागणी यांचे नियोजन केल्यास निर्यातदार व उत्पादकांना द्राक्ष निर्यात फायदेशीर होईल.

द्राक्ष उत्पादकांच्या समस्यांचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, द्राक्षाचे उत्पादन घेणे हे दिवसेंदिवस खर्चिक होत चालले असून एकवेळ उत्पादन घेणे व उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवणे हे उत्पादकाच्या हातात असते परंतु विपणन करणे हे त्याच्या हातात नसते. विपणनाची बाब ही दिवसेंदिवस क्लिष्ट व किचकट होत चालली आहे. म्हणून वरील समस्यांचे निराकरण केल्यास द्राक्ष उत्पादन घेणे फायदेशीर ठरेल.

**द्राक्ष प्रक्रिया उद्योग:**

द्राक्षापासून तयार होणारे मद्य आणि बेदाणे यांची निर्यात केल्यास भारताला परकीय चलन मिळू शकेल. द्राक्ष प्रक्रिया उद्योग वाढीस लागला तर भारतीय अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होऊ शकेल. द्राक्ष उत्पादन किफायतशीर व्हावे व द्राक्ष उत्पादन व विपणनातील अडचणींवर मात करण्यासाठी द्राक्ष प्रक्रिया उद्योग महत्वाचा मानला जातो. या उद्योगाला हळूहळू चांगले दिवस यायला लागले आहेत. जगामध्ये ९० टक्के द्राक्षाचे उत्पादन हे वाईनसाठी घेतले जाते व १० टक्के द्राक्षे हे ज्यूस

आणि रस याकरिता वापरले जाते. भारतात मात्र ८० टक्के द्राक्षाचे उत्पादन खाण्यासाठी (टेबल ग्रेप्स) केले जाते व २० टक्के द्राक्षाचे उत्पादन वाईन, ज्यूस व रस याकरिता केले जाते. जगात द्राक्षाच्या उत्पादकतेबाबत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. म्हणून द्राक्ष लागवडीस खूप वाव आहे. महाराष्ट्रात द्राक्ष प्रक्रिया उद्योगास खूप वाव आहे. नाशिक, पुणे, सांगली, सोलापूर या जिल्ह्यात वाईन, बेदाणे व मनुका या प्रक्रिया उद्योगास मोठ्या प्रमाणात वाव आहे. द्राक्षापासून तयार होणारी वाईन ही उच्च प्रतीची मद्य म्हणून ओळखली जाते. सांगली जिल्ह्यात बेदाण्याची बाजारपेठ मोठी आहे. नाशिक जिल्ह्यात वाईनरीच्या कारखान्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. द्राक्ष प्रक्रियेमुळे लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. द्राक्ष विक्री करिता बाजारपेठ शोधण्यापेक्षा वाईन आणि बेदाण्याच्या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळू लागला आहे. द्राक्षापासून मद्यार्क, ज्यूस, जाम, जेली, चॉकलेट, बिस्किट, सौंदर्य प्रसाधने, केक, द्राक्षासव व आयुर्वेदिक औषधे तयार होतात. म्हणजेच द्राक्ष प्रक्रियेला मोठ्या प्रमाणात वाव आहे. द्राक्षापासून तयार होणारे बेदाणे हे शेतकरी रस्त्यावर देखील स्टॉल मांडून विकतांना दिसून येतात. वाईनरीचे उत्पादन घेणारे मोठे शेतकरी असल्याचे दिसून येते. यामध्ये लहान शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उत्पादन घेणे आवश्यक आहे. द्राक्षापासून तयार होणाऱ्या उत्पादनांची प्रक्रिया केल्यास त्यासाठी पॅकिंगची गरज असते. म्हणजेच पॅकिंग उद्योगासाठी लोकांना रोजगार उपलब्ध होईल. पश्चिम महाराष्ट्राचा जसा साखर कारखानदारीने विकास झाला त्याचप्रमाणे द्राक्ष प्रक्रिया उद्योग वाढला तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा जीवनात कायापालट होण्यास मदत होईल.

नाबार्डने देखील अलिकडे द्राक्ष प्रक्रिया उद्योगासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. द्राक्ष प्रक्रिया उद्योग वाढविण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून भांडवल, संयोजन कौशल्य, मनुष्यबळ, बाजारपेठ व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास या उद्योगाला चांगले दिवस यायला वेळ लागणार नाही.

**संदर्भ सूची:**


१. पाटील वे. का. आणि चव्हाण शे. दू., १९८१ *भारतीय द्राक्ष शेती*, खंड १ व खंड २, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी .
२. भुजबळ भी. गो. *द्राक्षबाग*, १९८४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,विजयानगर, पुणे-३०
३. वाघमारे र.ए. आणि भापकर द. गो., *शेतीचे हिशेब*, २०१२ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०
४. *विविध द्राक्षवृत्त अहवाल २०१० ते २०१४* महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ, पुणे ३८
५. *महाराष्ट्राची कृषि सांख्यिकी विषयक माहिती*, भाग-२ २०१३ व २०१४-१५ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# शेतीआधारित उद्योग व ग्रामीण विकास

**कुमुदिनी भा. जोगी, अचलपूर,**
अर्थशास्त्र विभाग
जगदंब महाविद्यालय, जिल्हा-अमरावती.
भ्रमणध्वनी: ९४२१३९१४१४

२००१ च्या जनगणनेनुसार भारताची जवळपास ७० प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. तर देशाची ५८ प्रतिशत लोकसंख्या उपजीविकेसाठी कृषी क्षेत्रावर विसंबून आहे. कृषी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे. मोठ्या प्रमाणावरील दारिद्र्य हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण असलेले दिसते आणि ग्रामीण दारिद्र्य हे बेरोजगारी आणि अल्परोजगारीचे फलन आहे. भारतीय शेतीच्या निसर्गावरील अवलंबित्वामुळे ती हंगामी स्वरुपाची असल्याने ग्रामीण भागात बारमहा पूर्ण रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून ग्रामीण भागात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधीची उपलब्धता करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील भांडवल व रोजगाराचा प्रभावी वापर व्हावा यासाठी शेती आधारित उद्योगांची स्थापना ग्रामीण भागात करुन कृषीक्षेत्राचा तद्वतच ग्रामीण भागाचा विकास साधने शक्य आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ग्रामीण विकासातील शेतीआधारित उद्योगांचे महत्व आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी अचलपूर तालुक्यातील आनंद पापड उद्योग, गव्हापासून तयार होणारे खाद्य पदार्थ उद्योग व ओम अळींबी (मशरुम) उद्योग यांना प्रत्यक्ष भेट देवून त्यांचा ढोबळ मानाने अभ्यास केला आहे.

## शेतीआधारित उद्योग म्हणजे काय?

The National Council of Applied Economic Regearch १९६५ नुसार, शेती आधारित उद्योग म्हणजे असे उद्योग की जे शेतमाल कच्चा माल म्हणून वापरतात किंवा अशी उत्पादने निर्माण करतात की जी शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी गरजेची असतात. या व्याख्येवरुन शेती आधारित उद्योगाच्या अर्थासोबतच कृषी आणि उद्योग या क्षेत्रातील आंतरसंबंधही स्पष्ट होतो.

शेती आधारित उद्योग आणि इतर उद्योग यात फरक करण्याच्या दृष्टीने

नियोजन आयोगाने चार निकष निश्चित केले आहेत. हेच निकष पुढे राष्ट्रीय विकास परिषद (National Development Council) कडूनही मान्य करण्यात आले आहेत.

१) शेतीकरीता प्रभावी आदाने (Input) निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

२) शेतीमालावर प्रक्रीया करण्यासाठी व त्यांचे रुपांतर करण्यासाठी मदत करणे..

३) प्रक्रीया केलेल्या वस्तुंना चांगला मोबदला मिळवून देण्याची खात्री देणे.

४) शेतीचे उत्पादन वाढविण्यास मदत करणे.

उपरोक्त निकषांमधून निदर्शनास येते की, राष्ट्रीय विकास परिषदेला शेती आधारित उद्योगांमधून कृषी क्षेत्रातील उत्पादनवाढी सोबतच या लोकांचे उत्पन्न वाढविणेही अपेक्षित आहे.

**शेती आधारित उद्योगांचे महत्व :**

भारताच्या ग्रामीण क्षेत्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने ग्रामीण अर्थव्यवस्था ही दारिद्रय, बेकारी आणि अर्धबेकारी या समस्यांनी ग्रस्त आहे. कृषी क्षेत्र वाढत्या श्रमिक फौजेला उत्पादक रोजगार पुरवू शकत नाही म्हणून शेतीआधारित उद्योगांच्या विकासाची गरज निर्माण होते. ग्रामीण भागात रोजगाराच्या अभावी लोक शहरी भागात स्थलांतरित होतात. त्याकरिता व्यावसायिक संरचनेमध्ये कृषी आधारित उद्योग क्षेत्राच्या बाजूने परिवर्तन करावे लागेल.

जलद ग्रामीण औद्योगिकरणामूळे विकसनशील देशात रोजगारीच्या संधीमध्ये वाढ होते. ग्रामीण भागातील कृषी आधारित उद्योगात निर्माण झालेल्या रोजगारीमुळे तेथील कृषी क्षेत्राच्या भरभराटीस सहाय्य होते. तसेच कृषी आधारित ग्रामोद्योगामुळे औद्योगिक विकेंद्रीकरण करणे शक्य होते. राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण करण्यास मदत होते. भांडवलामध्ये गतिशीलता आणता येते. उद्योग कौशल्यामध्ये गतिशीलता आणता येते, ग्रामीण लोकांचे शहरांकडे होणारे स्थलांतरण थांबवून खेडी ओस व शहरे बकाल होण्यापासून वाचविता येतात. एकूणच शेती आधारित उद्योगांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत गुणात्मक परिवर्तन करणे शक्य होते.

भारतीय गावांची समृध्दी व पुनर्निर्माण कृषी आधारित उद्योगांच्या माध्यमातूनच शक्य आहे. बोर्जेद्रनाथ बॅनर्जी यांनी विकसित, औद्योगिक देशांच्या अनुभवावरुन असे मत मांडले की, देशाच्या एकूण विकासात ग्रामीण व ग्रामीण विकासात कृषी उद्योग महत्वाचे आहेत. कृषीक्षेत्र व औद्योगिक क्षेत्र एकमेकांचे प्रतिस्थापन करु शकत नाही. त्यामुळे ते एकमेकांना पूरक आहेत. म्हणून दोन्ही क्षेत्रांचा एकाच वेळी विकास करुन ग्रामीण विकास साधने गरजेचे आहे. विकसित औद्योगिक देशांनी कृषी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या फळे, भाजीपाला यांच्यावर प्रक्रिया करुन त्यांचा टिकावूपणा वाढवून कृषी विकासासोबत आर्थिक विकास साधला आहे.

जगातील अनेक विकसनशील देशांनी ग्रामीण विकासासाठी कृषी आधारित उद्योगांना प्राधान्य दिले आहे. चीनने सुध्दा ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या विकास प्रक्रीयेत सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्यातील वाढत्या उत्पादकतेचा वापर करण्यासाठी स्थानिक विविधीकरणाला प्राधान्य दिले आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी राष्ट्रीय विकास परिषदेतील आपल्या भाषणात म्हटले की, *कृषी क्षेत्राला नवसंजीवनी दिल्याशिवाय सर्वसमावेशक*

*विकासाचे ध्येय साध्य करणे शक्य होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडे विशेषत्वाने लक्ष पुरविण्याची गरज आहे. म्हणून सर्व शेतकऱ्यांच्या उत्पादनात आणि उत्पन्नात वाढ करणे यावरच मुख्य रोख ठेवायला हवा.* उपरोक्त तज्ज्ञाचे विचार ग्रामीण विकासात शेती आधारित उद्योगांच्या महत्त्वाचा निर्वाळा देतात.

**अचलपूर तालुक्यातील शेतीआधारित उद्योगांचा प्रत्यक्ष अभ्यास :**

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील शेती आधारित उद्योगांचा प्रत्यक्ष अभ्यास करुन या उद्योगांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यावर उपाय सूचविण्याचाही प्रयत्न केला आहे. यामध्ये पापड उद्योग, गव्हापासून तयार होणारे खाद्य पदार्थ उद्योग, अळींबी (मशरुम) उद्योग यांचा ढोबळ मानाने अभ्यास केला आहे.

**आनंद पापड उद्योग :**

या पापड उद्योगाची स्थापना १९९१ मध्ये करण्यात आली. या उद्योगात एकूण १२ कर्मचारी काम करतात. मूग, उडीद, लसूण, मिरची, जिरे, काळे मिरी इत्यादी शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या घटकांचा वापर उत्पादनातील मुख्य कच्चा माल म्हणून होतो. उत्पादनाच्या घटकांमध्ये बदल करुन उत्पादनात विविधता आणली जाते जसे मुगाचे पापड, उडदाचे पापड, ग्रीन चिली पापड, गार्लीक चिली पापड इत्यादी हे उत्पादन मशीनच्या साहाय्याने केले जाते. तसेच पॅकींगही मशीनद्वारेच केले जाते. उत्पादित मालाची विक्री स्थानिक बाजारपेठेसोबतच मध्यप्रदेश, छत्तीसगढ, उडिसा या राज्यामध्येही केली जाते. उत्पादित मालाची विक्री किंमत १२० रु. ते १५० रु. किलो मिळत असल्याचे उद्योगांच्या मालकांनी सांगितले. तसेच खर्च वजा जाता गुंतवणुकीवर सरासरी १० प्रतिशत नफा मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**उद्योगासमोरील समस्या:**

१) उद्योगाला लागणारा कच्चा माल साठवून ठेवण्याची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे केवळ तीन महिने पुरेल एवढाच कच्चा माल साठवून ठेवता येतो. तसेच तयार उत्पादन साठवून ठेवण्यासाठी व्यवस्था आवश्यक आहे. ती उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करुन महामान उत्पादनाचे फायदे घेता येत नाही.

२) पापडाचा दर्जा अर्थात चव,टिकावूपणा, वेस्टन इत्यादी उत्तम दर्जाचे असूनही आय. एस. आय. व ॲगमार्क सारखे मानांकन प्राप्त झालेले नाही, त्यामुळे निर्यातक्षम उत्पादन असतानाही प्रत्यक्ष निर्यात करणे शक्य झालेले नाही.

३) उत्पादकाला स्वत: ग्राहकांना विक्री करणे शक्य नाही. त्यामुळे मधील व्यापाऱ्यांची जी साखळी असते त्यांना बराच वाटा जातो. व्यापाऱ्यांना त्यांच्या गुंतवणूकीवर २४ प्रतिशत नफा प्राप्त होतो. याचाच अर्थ उत्पादन करणाऱ्या उत्पादकापेक्षा व्यापाऱ्याला १४ प्रतिशत अतिरीक्त नफा प्राप्त होतो. म्हणजेच उत्पादकांना पुरेसा नफा मिळत नाही व उपभोक्त्याचे शोषण होते.

२) गव्हापासून तयार खाद्य पदार्थ उद्योग :

गहू या कृषीमध्ये उत्पादित होणाऱ्या घटकाचा मुख्य कच्चा माल म्हणून उपयोग करुन त्यापासून खजूर, गोड मिरची, बालुशाही आणि चकल्या बनविण्याचा शेती आधारित उद्योग अचलपूर या तालुक्याच्या ठिकाणी स्थित आहे. या उद्योगाची स्थापना २००७ मध्ये करण्यात आली. हा उद्योग कुटीर उद्योग असल्यामुळे यामध्ये

कुठल्याही विजेवर चालणाऱ्या मशीनचा वापर होत नाही. त्यामुळे भांडवल गुंतवणूक अत्यंत कमी आहे. त्याचबरोबर कुटुंबातीलच सदस्य यामध्ये काम करीत असल्याने उत्पादन खर्च बराच कमी येतो. तसेच उत्पादित मालाचे पॅकींग करुन उत्पादक स्वत:च स्थानिक बाजारपेठ व ग्रामीण भागात विक्री करीत असल्यामुळे साठवणूक, वाहतूक व जाहिरातीवरील खर्च नगण्य आहे. सदर उद्योगामध्ये २०१४-२०१५ मध्ये एकूण ४७२ क्विंटल विविध प्रकारचा माल उत्पादित करण्यात आला. त्यासाठी ३४८६००रु. एवढा उत्पादन खर्च झाला. तर ५,३१०००रु. एवढी प्राप्ती झाली म्हणजेच १८२४०० रु. अर्थात ५२.३२ प्रतिशत नफ्याची प्राप्ती उद्योगाला झाली.

उपरोक्त विवेचनावरुन असे लक्षात येते की, गव्हाच्या कच्चा माल म्हणून उपयोग करुन पारंपरिक पदार्थापेक्षा वेगळे पदार्थ तयार करण्याची सर्जनशीलता उद्योजकाने दाखविल्यामुळे कमी भांडवल गुंतवणूक करुन समाधानकारक नफ्याची प्राप्ती झाली आहे.

**उद्योगासमोरील समस्या:**

१) उत्पादित मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठ विस्तारण्यासाठी मालाला आकर्षक वेष्टनाची गरज आहे. त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.

२) मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी भांडवलाची गरज आहे. परंतु तो सहजतेने उपलब्ध होत नाही.

३) ओम अळींबी (मशरुम) :

ओम मशरूम हा कल्टीव्हेशन, ट्रेडींग, प्रोसेसींग व रिसर्च करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेला उद्योग ग्रा.पं. देवमाळी, ता. अचलपूर, जि. अमरावती येथे स्थित आहे. अळींबी ही वनस्पती मानवी आरोग्याकरिता अत्यंत उपयुक्त सिध्द झाली आहे. बटन अळींबी, धिंगरी अळींबी, भात पेठावरील अळींबी असे प्रकार अळींबी असलेले दिसून येते. अळींबी लागवड घरातील एखाद्या खोलीतही करता येते. त्यासाठी केवळ विशिष्ट तपमान व आर्द्रतेची गरज आहे.

**अळींबी प्रतवारी, पॅकींगप्रक्रीया व विक्री:**

अळींबीच्या आकारानुसार तिची प्रतवारी केली जाते. त्यानंतर अळींबी दीर्घकाळ टिकून रहावी यासाठी त्यावर प्रक्रिया करणे गरजेचे असते. त्याचबरोबर त्याचे हवाबंद डब्यांमध्ये पॅकींग करणेही आवश्यक असते. अळींबीची विक्री मात्र स्थानिक बाजारात किंवा ग्रामीण भागात होताना दिसत नाही. कारण अळींबीचा प्रती किलो दर जवळपास ८०० ते १००० रुपये दरम्यान असतो. एवढ्या प्रमाणात क्रयशक्ती ग्रामीण भागात असत नाही. अळींबीची विक्री पंचतारीक हॉटेल्स, डिपार्टमेंटल स्टोअर्स, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असते. त्यामुळे उत्पादकाचा मात्र बराच फायदा होत असतो.

**अळींबी उद्योगासमोरील समस्या:**

१) स्थानिक पातळीवर मागणी होत नसल्यामुळे प्रक्रिया, पॅकींग व वाहतुकीचा खर्च बराच जास्त येतो.

२) उद्योग करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. त्यामुळे प्रशिक्षणाखेरीज ग्रामीण लोक हा उद्योग करण्यास धजावत नाहीत आणि सोयीच्या ठिकाणी व सोयीच्या वेळी प्रशिक्षण उपलब्ध होत नाही.

उपरोक्त तीनही उद्योग शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग असून त्यांचे रुपांतर करण्यासाठी मदत करणारे उद्योग आहेत. तसेच प्रक्रिया

केलेल्या वस्तुंना चांगला मोबदला मिळवून देण्याचे कामही या उद्योगांमुळे होत आहे. अर्थात कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढीसोबतच उत्पन्न वाढविण्याचा हेतू या उद्योगांमधून पूर्ण होत असल्याचे लक्षात येते.

### शेती आधारित उद्योगांच्या विकासासाठी उपाय योजना:

शेती आधारित उद्योगांचा प्रत्यक्ष अभ्यास करीत असतांना त्या-त्या उद्योगाच्या समस्यांचा विचार आपण केला आहे. त्याच समस्यांच्या अनुषंगाने काही उपाययोजना या ठिकाणी विशद केल्या आहेत.

१) कृषी आधारित उद्योग ग्रामीण भागातच आणि शेतकरी, शेतमजूर यांनी सहकारी तत्त्वावर किंवा बचत गटाच्या माध्यमातून सुरु करण्यास प्राधान्य देण्यात यावे. जेणेकरुन ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्न स्तरात वाढ होवून ग्रामीण विकास साधने शक्य होईल.

२) शेती आधारित उद्योगांची स्थापना ग्रामीण भागात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आधारभूत सोयी-सुविधा जसे- वीज, पाणी, रस्ते, अधिकोष, प्रशिक्षण संस्था इत्यादी निर्माण केल्यास ग्रामीण शेती आधारित उद्योग सुरु करण्याची प्रेरणा ग्रामीण लोकांना मिळेल. त्यातून रोजगार निर्मिती, उत्पन्न वाढ दारिद्र्य निर्मूलन यासारख्या गोष्टी साधल्या जातील.

३) शेती आधारित उद्योग ग्रामीण भागात स्थापन केले तरी त्यामध्ये उत्पादित होणाऱ्या उत्पादनाला देशी बाजारपेठेसोबतच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी निर्यातक्षम उत्पादन करण्यासाठी उद्योजकांना प्रेरित करण्यासाठी निर्यातीकरीता आवश्यक सुविधा त्यांना सहज आणि सोपेपणाने उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने प्रयत्न करावे.

४) शेती आधारित उद्योगांच्या विकासासाठी शेतीआधारित उद्योग, विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी. ज्याअंतर्गत या उद्योगांसाठी प्रशिक्षण, वित्त पुरवठा, अनुदान देऊन ग्रामीण तरुणांना शेतीआधारित उद्योग स्थापण्याकरीता आकर्षित करता येईल.

५) वेगळा कृषी अर्थसंकल्प दर वर्षी सादर करण्यात यावा जेणेकरुन एकूणच कृषीक्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करणे शक्य होईल. शेती आधारित उद्योगांना विशेष प्राधान्य देऊन ग्रामीण विकास पर्यायाने राष्ट्र विकास साधण्यास मदत होईल.

### संदर्भ सूची:


१) Banerjee Brojendra Nath : *Industry, Agaiculture, and Rural Development,* 1987, B.R. Publishing Corporation, Delhi.

२) सिंग मनमोहन, *कृषी, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा यांना प्राथमिकता,* योजना, अंक ९, पृ. २.

३) पाटील साधना, *शेती आधारित उद्योगातील रोजगार व मूल्यवृध्दीचा अभ्यास,* अर्थसंवाद, एप्रिल-जून २०१५/ खंड ३९ अंक १, पृ. ३.

# फळे व भाजीपाला सहकारी संस्था

**निकिता भोरे, सांगली,**
अर्थशास्त्र विभाग,
गणपतराव आरवाडे वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ८२७५३७६९९७

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने शेती व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून अनेक शेती आधारित उद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून कृषी व्यवसायाला *अन्न बहु कुर्वीत तद्व्रतम* असे समजले जाते. देशाच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रावर अधिक भर दिला आहे. शेतकऱ्यांचा व पर्यायाने देशाच्या प्रगतीसाठी कृषी विकासाचा दर उंचावण्याची गरज आहे. भारतातील शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन पारंपरिक स्वरुपाचा असल्याने शेती एक व्यवसाय म्हणून पाहणे गरजेचे आहे. तरच शेतीपासून बराच नफा मिळू शकतो. योग्य प्रकारे शेतीचे व्यवस्थापन केले तर शेती व्यवसायास भविष्यात मोठया प्रमाणात संधी उपलब्ध होऊ शकतात. भारतातील बरेचसे उद्योग व्यवसाय शेतीवर अवलंबून असल्याने शेती उद्योगाला बरेचसे महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात १९६० नंतर शेतीमध्ये सुधारणा घडून आल्याचे दिसून येते. हरित क्रांतीनंतर भारतात शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. भारतीय शेतीमध्ये आज अन्नधान्याबरोबरच ऊस, द्राक्षे, कापूस, विविध प्रकारची फळे यांचेही उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. प्रामुख्याने ऊस, द्राक्षे, फळे, कापूस यासारख्या शेतमालाच्या उत्पादनात वाढ झाल्याने त्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची म्हणजेच शेतीवर आधारित उद्योगांची निर्मिती झालेली दिसून येते. भारताच्या आर्थिक धोरणामध्ये शेतीक्षेत्राबरोबर शेतीवर आधारित उद्योगांचेही योगदान फार मोठ्या प्रमाणात आहे.

आपल्या देशात विविध प्रकारच्या भौगोलिक परिस्थितीमुळे निरनिराळ्या प्रकारच्या फळे व भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. परंतु तो नाशवंत असल्याने त्यावर प्रक्रिया करुन त्यापासून टिकाऊ पदार्थ तयार करणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या फळ प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून फळावर प्रक्रिया केली जाते व

त्यापासून टिकाऊ पदार्थ बनविले जातात. कोणताही उद्योग यशस्वी करण्यासाठी त्याचे योग्य नियोजन, मालाची गुणवत्ता, नियंत्रण व त्यासाठी लागणारे परवाने याबाबतची माहिती घेणे आवश्यक आहे व त्यासाठी फळे व भाजीपाला सहकारी संस्थाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. परंतु सहकारी चळवळीच्या क्षेत्रातील एक दुर्लक्षित राहिलेला संस्था प्रकार म्हणून या संस्थांकडे पाहता येईल. वस्तूत: फळे व भाजीपाला उत्पादनात भारताचा आज जगात चीन नंतर दुसरा क्रमांक लागतो. तसेच भारताच्या एकूण कृषी उत्पादन निर्यातीमधील १३% ते १४% निर्यात ही फळे व भाजीपाला यांचीच होते. परंतु भारतात आजही या संस्थांच्या प्रगतीसाठी संघटनात्मक स्तरावर फारसे प्रयत्न झालेले नाहीत. यासाठी फळे व भाजीपाला सहकारी संस्थांची कार्ये, त्यांच्यापुढील समस्या व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास प्रस्तूत शोधनिबंधात केलेला आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तूत शोधनिबंध हा विश्लेषणात्मक स्वरुपाचा असून विश्लेषणासाठी दुय्यम साधनांचा वापर केला आहे. यामध्ये भारताच्या आर्थिक पाहणेचे अहवाल, अधिकृत संकेतस्थळे, विविध मान्यताप्राप्त नियतकालिकातील लेखांचा आधार व पुस्तकाचाही आधार घेतलेला आहे.

प्रस्तूत शोधनिबंधाच्या विश्लेषणासाठी पुढील उद्दिष्टे विचारात घेतलेली आहेत. १)भारतातील व महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला सहकारी संस्था विकासाचा अभ्यास करणे. २)फळे व भाजीपाला सहकारी संस्थांच्या कार्याचा अभ्यास करणे. ३) महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला सहकारी संस्थांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सूचविणे.

**फळे-भाजीपाला सहकारी संस्थांचा विकास:**

प्रथमत: भारतात सन १९१२ च्या सहकारी कायद्याने सहकारी तत्त्वावरील विपणन संस्था स्थापनेस सुरुवात झाली. त्यानुसार सन १९१३ साली कुंभकोनम शेतकी संस्थेची स्थापना झाली. जिचा उद्देश बियाणे व खतांचा पुरवठा करणे व शेती उत्पादन विक्री करणे हा होता. सन १९१५ सालच्या मॅक्सागान समितीने देखील या संदर्भात महत्त्वाची शिफारस केली होती. भारतात १९३५ मध्ये गुजरात येथील पर्डी येथे *दक्षिण गुजरात फळे व भाजीपाला उत्पादक संस्था* स्थापन झाली. भारतात सन १९४५ मध्ये नेमण्यात आलेल्या सहकारी नियोजन समितीने भारतातील प्रति २०० गावामध्ये एक सहकारी विपणन संस्था स्थापनेची शिफारस केली. तसेच १९५१ मध्ये गोरवाला समितीने आपल्या अहवालातून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी विपणन व प्रक्रिया क्षेत्राला आधारभूत राष्ट्रीय स्तरावरील संस्था स्थापण्यासाठी शिफारस केली होती. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देखील सदर सहकारी संस्थांच्या विकासासाठी विशेष लक्ष देण्यात आले होते.

**महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला सहकारी संस्था:**

फळे व भाजीपाला उत्पादनात आज महाराष्ट्राचा भारतात प्रथम क्रमांक लागतो. भारतातून होणाऱ्या फळ निर्यातीत महाराष्ट्रात उत्पादित होणाऱ्या आंबा व द्राक्षे या फळांचे प्रमाण मोठे आहे. महाराष्ट्रात केळी, संत्री, कांदा हे उत्पादन देखील मोठ्या प्रमाणात घेतले जाते. महाराष्ट्रात सन २०१३ मध्ये १८.३६ लाख हेक्टर इतके क्षेत्र

विविध पिकाखाली येते. त्यापैकी ५.२५ लाख हेक्टर जमीन आंब्याखाली, १.६८ लाख हेक्टर जमीन संत्र्याखाली, १.४५ लाख हेक्टर जमीन मोसंबीखाली, १.७३ लाख हेक्टर जमीन डाळिंबाखाली आणि उर्वरित जमीन केळी, चिकू, द्राक्षे व इतर फळपिकांच्या लागवडीखाली होती. राज्य सरकारने फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी फळ रोपवाटिका स्थापन करणे आणि सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांना फळझाडे व भाजीपाला वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य करणे यावर भर दिला आहे. यामुळे २०१४ पर्यंत १८.४३ लाख हेक्टर इतके क्षेत्र लागवडीखाली आले आहे. आज देशामध्ये एकूण भाजीपाल्यापैकी ६% भाजीपाल्याचे उत्पादन हे महाराष्ट्रात होते.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्यातील फळे व भाजीपाला याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करुन उत्पादित मालाची प्रतवारी, आवेष्टन, शीतकरण, वाहतुक व साठवणूक याद्वारे परदेशात निर्यात करुन परकीय चलन मिळविणे तसेच उत्पादक शेतकरी व ग्राहक यांना योग्य तो भाव मिळावा या हेतूने फळे व भाजीपाला सहकारी संस्थेची नोंदणी झाली आहे. सन २०१२ मधील उपलब्ध आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत फळे व भाजीपाला सहकारी संस्थांची संख्या ७१९ इतकी असून त्यापैकी ४१६ संस्था या कार्यरत आहेत. तर २०७ संस्था बंद अवस्थेत आहेत व १६ संस्था अवसायनात आहेत. अशाप्रकारे फळे व भाजीपाला क्षेत्रात सहकारी संस्था ही आपले योगदान देत आहेत.

**फळे व भाजीपाला सहकारी संस्थांची कार्ये:**

फळे व भाजीपाला सहकारी संस्था या सभासदांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळावा या प्रमुख उद्देशाने पुढील कार्ये करतात.

१) फळे व भाजीपाला मालाचे एकत्रीकरण, वर्गवारी व प्रतवारी: फळे व भाजीपाला सहकारी संस्था कार्यरत असणाऱ्या गावाच्या ठिकाणी सभासद उत्पादकांच्या मालाच्या एकत्रीकरणाचे काम करतात व त्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्थासुध्दा उपलब्ध करुन देतात. फळे व भाजीपाला एकत्रीकरणानंतर सदर मालाचे रंग, आकार, स्वाद अशा गुणधर्माआधारे वर्गीकरण करुन त्याचा अधिक चांगला मोबदला मिळविण्याच्या दृष्टीकोनातून प्रतवारी लावतात.

२) मालाची साठवणूक: फळे व भाजीपाला हा नाशवंत माल असल्याने अशा मालाला मागणी येईपर्यंत त्याची साठवणूक व संरक्षण करणे गरजेचे असते. या संस्था अशा मालाच्या साठवणुकीचे कार्य स्वतःच्या गोदामामार्फत करतात. तसेच आवश्यक असल्यास शीतगृह साठवणुकीची सोय उपलब्ध करतात. सदर कार्यामुळे शेतमालाच्या गुणवत्तेचे संरक्षण होते व त्याची योग्य किंमत मिळण्यास मदत होते.

३) आदानांचा पुरवठा करणे: सभासदांना बी-बियाणे, खते, किटकनाशके आणि इतर उद्यान उपयोजन सामग्री वाजवी दराने पुरवितात. दर्जेदार आदानांचा पुरवठा करुन या संस्था उच्च गुणवत्तेचा माल उत्पादित करण्यास चालना देतात.

४) शीतगृहाच्या सोयी पुरविणे: फळे आणि

भाजीपाल्याच्या विपणनात शीतगृहाचे स्थान महत्त्वपूर्ण असते. परंतु सध्या बहुतांश शीत संग्रहण क्षमता खाजगी क्षेत्रात आहे. फळे व भाजीपाला सहकारी संस्था आपल्या सभासदांना शीतगृहाच्या सोयी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करतात. अपेडा, राष्ट्रीय विकास महामंडळ, नाबार्ड इ. यांच्या सहकार्याने सहकारी संस्था शीतगृहाच्या सुविधा पुरवितात.

५) विपणन आणि विक्री:
या सहकारी संस्थांचे सर्वात मुख्य कार्य म्हणजे सभासदांच्या मालाचे विपणन व त्याची विक्री करुन त्याद्वारे सभासदांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळवून देणे. या सहकारी संस्थांना सदर कार्यात राष्ट्रीय व राज्य स्तरावरील विविध संस्था जशा नाफेड, महामँगो, महाग्रेप्स, महाबनाना, महाअनार, महाऑरेंज यांची मदत होते.

६) फळे व भाजीपाला प्रक्रिया:
राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या उद्यानविद्या पिकांच्या हंगामोत्तर व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करण्यास उत्तेजन दिले जाते. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ प्रक्रिया एकक सुरु करण्यासाठी वित्तीय मदत करणे, फळे व भाजीपाला सहकारी संस्था मालावर प्रक्रिया करून त्याची मूल्यवृध्दी घडवून आणतात. मालाला अधिक दर मिळवून देतात.

७) पतपुरवठा व विपणन यांच्यात समन्वय:
फळे व भाजीपाला सहकारी संस्था सभासदांना पतपुरवठा संस्थाकडून कर्जे मिळवून देतात. सभासदांच्या मालाची विक्री करुन आलेल्या रकमेतून पतपुरवठा संस्थेकडे कर्जफेडीची रक्कम पाठवतात.

८) फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया:
राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या उद्यानविद्या पिकाच्या हंगामोत्तर व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करण्यास उत्तेजन दिले जाते. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ प्रक्रिया एकक सुरु करण्यासाठी वित्तीय मदत करते. या सहकारी संस्था मालावर प्रक्रिया करुन विविध उत्पादने जसे जाम, जेली, सॉस, लोणची, रस इ. निर्मिती केल्यास अशी उत्पादने दीर्घ काळ टिकतात व त्यांना किंमतही चांगली मिळते.

९) खत व्यवस्थापन:
फळे व भाजीपाला उत्पादक क्षमता तसेच त्याच्या गुणवत्तासमृध्दीसाठी जैविक खत निर्मिती व पुरवठा करण्याचे कार्य हा सहकारी संथा करतात. सदर खताचा पुरवठा किंवा विक्री सभासदांखेरीज इतरांनाही उत्पन्न वृध्दीसाठी करण्यात येते.

**फळे व भाजीपाला सहकारी संस्थापुढील समस्या:**

दूध नाशवंत असूनही भारतात दुग्ध सहकारी संस्थानी प्रचंड प्रगती साधली आहे. पण त्या तुलनेत फळे व भाजीपाला सहकारी संस्थांना पुरेसे यश आलेले दिसून येत नाही. कारण या संस्थांना निरनिराळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे.

१)खाजगी क्षेत्राकडून स्पर्धा: भारतात आज या सहकारी संस्थांकडून हाताळल्या जाणाऱ्या मालाचे प्रमाण एकूण मालाच्या केवळ १०% पर्यंतच आहे.

सहकारी संस्थांना आज खासगी क्षेत्रातील संस्थाकडून होणाऱ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. व्यापारी तत्त्वावर, आर्थिक शिस्त व नियोजनबध्दतेने काम करणाऱ्या संस्था जसे रिलायन्स फ्रेश, हिंदुस्थान युनिलिव्हर, आर.टी.सी. अशा प्रबळ संस्था अथवा कंपन्यापुढे सहकारी क्षेत्रातील संस्था सर्वच बाबतीत दुबळ्या ठरतात व स्पर्धेत टिकू शकत नाहीत.

२) पायाभूत सुविधा व प्रक्रियातील विभिन्नता: फळे भाजीपाला संस्थापुढील महत्त्वाची समस्या म्हणजे प्रत्येक फळ अथवा भाजीपाल्याच्या प्रकारानुसार साठवणूक प्रक्रिया, वाहतूक, तसेच हाताळणी व प्रक्रिया इत्यादीसाठी आवश्यक असणारी विभिन्न पायाभूत सुविधा व यंत्रणांची गरज आहे. साखर, दुध, अथवा इतर सहकारी संस्थाप्रमाणे केवळ एकाच पायाभूत सुविधा अथवा यंत्रणेचा वापर सर्वत्र एकत्रित मालासाठी फळे व भाजीपाला सहकारी संस्था करु शकत नाहीत.

३)कर्जबाजारी शेतकऱ्यांची व्यापारी व मध्यस्थांशी बांधिलकी: भारतात बहुतांश शेतकरी हे कर्जाच्या विळख्यात अडकलेले दिसतात. बऱ्याचदा हंगामा आधीच शेतकरी त्यांच्या पिकासाठी स्थानिक व्यापारी व मध्यस्थांकडून आगाऊ रक्कमा उचलतात. तसेच हंगामानंतर आपले पीक सदर व्यापारी अथवा मध्यस्थानांच विकण्याची अट स्वीकारतात. दुष्काळी अथवा वारंवार नैसर्गिक आपत्ती येणाऱ्या परिसरात हा प्रभाव जास्त दिसतो.

४) भागभांडवलाची कमतरता: सहकारी संस्थांना सभासदांकडून माल खरेदी तसेच त्याचे विपणन व विक्री व त्या अनुषंगाने कराव्या लागणाऱ्या कार्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. हंगाम काळात अशा भांडवलाची गरज सर्वाधिक असते. सभासदांकडन उभारलेले भांडवल अशा संस्थांची गरज भागविण्यात अपुरे पडते. तसेच या संस्थांना बँक अथवा वित्तीय संस्थामार्फत कर्जपुरवठा होत नाही व शासकीय अनुदान मिळण्याबाबत अडचणी येतात.

५) अपुऱ्या पायाभूत सोई सुविधा: या सहकारी संस्था प्रामुख्याने ग्रामीण भागात कार्य करतात. सदर सस्थांना मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, साठवणूक, वाहतूक यासाठी आवश्यक रस्ते व वीज अशा पायाभूत सुविधा पुरेशा विकसित नाहीत. मालाच्या शास्त्रशुध्द साठवणुकीसाठी आवश्यक गोदामांची संख्यासुध्दा भारतात अपुरी पडते. यामुळे मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. ज्याचा फटका उत्पादक शेतकरी तसेच या क्षेत्रातील संस्थांना बसतो.

६) कार्याचे हंगामी स्वरुप: भारतातील फळे व भाजीपाला सहकारी संस्थांचे कार्य हे विशिष्ट फळे व भाजीपाला प्रकारापुरते मर्यादित आहे. बहुसंख्य फळे व भाजीपाला याचे उत्पादन हे वर्षातील विशिष्ट काळातच होते. त्यामुळे अशा संस्थांच्या कार्यक्षेत्रातील हंगामाचा काळ वगळता वर्षातील इतर काळात या प्रकारातील संस्था निष्क्रीयच असतात.

७) गुंतागुंतीची परवाना पध्दती: आंब्याचा रस व इतर पदार्थ कोकम, आवळा, करवंद इ. सरबते व जॅम बनवणारे उद्योग आदींना विविध परवाने मिळविणे कठीण जाते. जागेची तपासणी, परवाना मिळविणे, दरवर्षी नुतनीकरण करुन घेणे या बाबीं त्रासदायक ठरतात.

८) निर्याततीतील समस्या: विविध करांचे ओझे सोसून फळे व भाजीपाल्यांच्या निर्यातदाराला

जवळपास २१ कायदे व जाचक नियमांना तोंड द्यावे लागते. अनेक सरकारी खात्यांशी व्यवहार करावा लागतो. या अडचणींची दखल सरकारी पातळीवर गंभीरपणे घेतली जात नाही.

९)वाहतूकीचा अधिक खर्च: या संस्थांना वाहतुकीसाठी अधिक प्रमाणात खर्च करावा लागतो. हा माल नाशवंत असल्याने शीतकरणयुक्त वाहनांमधून त्याची वाहतूक करावी लागते. तसेच प्रक्रियायुक्त उत्पादनाच्या पॅकिंगमुळे व जलद पाठवणुकीच्या अपरिहार्यतेमुळेही अधिक वाहतूक खर्चाला सामोरे जावे लागते.

१०)अकार्यक्षम व्यवस्थापन: अस्तित्वात असणाऱ्या फळे व भाजीपाला सहकारी संस्थांपैकी अनेक संस्थांची निर्मिती शासकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी झालेला आहे. त्यामुळे या संस्था शासकीय उद्दिष्टपूर्ती होईल इतकेच कार्य करतात. सदर संस्थांतील व्यवस्थापन हे सुध्दा अकार्यक्षम व कोणत्याही प्रशिक्षणाचा व अनुभवाचा अभाव असणारे आहे. या सर्वांचा विपरित परिणाम या संस्था प्रकाराच्या कार्यावर व योगदानावर होतो.

**उपाय योजना:**

फळे व भाजीपाला सहकारी संस्थांपुढील समस्या दूर करण्यासाठी खालील उपाययोजना करता येतील.

१) पर्यायी विक्री व विपणन मार्ग शोधणे.
२) प्रक्रिया उद्योगाद्वारे मूल्यवृध्दी करणे.
३) संस्था सभासदत्व नियमित करणे.
४) कार्यविस्तार करणे.
५) मालाचा निर्यातीसाठी प्रयत्न.
६) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर.
७) सक्षम व्यवस्थापन.
८) शासकीय मदत.
९) वरकड खर्च कमी करणे.
१०) शीतगृहाची सोय करणे.

शेतीवर आधारित उद्योगांची निर्मिती झाल्याने आर्थिक व सामाजिक प्रगती होते. वरील उपायांची अंमलबजावणी केली तर फळे व भाजीपाला सहकारी संस्थांना आपली प्रगती साधता येईल आणि त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होईलच पण यासाठी शासन स्तरावर प्रयत्न झाले पाहिजेत. त्यामुळे आर्थिक विकासासाठी शेती आधारित उद्योगांची गरज आहे.

**संदर्भ सूची:**

१) B. S. Mathur, *Co-Operation in India,*
२) Raikhelkar Dange, *Indian Economy* (Marathi)
३) प्र रा. कुलकर्णी, सहकाराची मूळतत्वे.
४) सी.जे.जोशी, के.सी.जोशी, *सहकाराचा विकास*
५) Datta and Sundharam, *Indian Economy.*
६) रुपा शहा, बी. एच. दामजी, *सहकाराचा विकास.*

# भारतातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग


**कु. लाजवंती आर. टेंभुर्णे, मोर्शी,**
भारतीय महाविद्यालय, जिल्हा- अमरावती.
भ्रमणध्वनी: ९८८१११६३८०


## प्रस्तावना:

भारत हा अन्नधान्य उत्पादनातील जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आज अन्नधान्य प्रक्रिया उद्योग हा उद्योगातील एक मोठा उद्योग म्हणून उदयास येत आहे. विकासाच्या दृष्टीने (प्रॉश) खाद्यान्य प्रक्रिया उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कृषी प्रक्रिया उद्योगाची सुरुवात १७९० मध्ये फ्रान्स मध्ये अन्न सुरक्षेसाठी कमाल तपमान निर्माण करण्यातून झाली. त्यानंतर १८६० मध्ये लुईस पाश्चर या शास्त्रज्ञाने बिअर आणि वाईन पाश्चराईज करण्याच्या प्रक्रियेचा विकास केला.

भारतात १८६३ मध्ये सर्व प्रथम कृषी प्रक्रिया उद्योगाबाबत विचार करण्यात आला. पुढे १८७० मध्ये दुष्काळी समितीने कृषी प्रक्रिया उद्योगांची आवश्यकता प्रतिपादीत केली. १९२८ मध्ये रॉयल कमिशनने सुध्दा ब्रिटीश सरकारला या उद्योगांबाबत विचार करायला भाग पाडले. १९६४ मध्ये डॉ. नॉर्मल बोरलॅग यांच्या नेतृत्वात हरितक्रांतीला सुरूवात झाली यापासून प्रेरणा घेऊन डॉ. एस. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वात हरितक्रांतीचा प्रयोग यशस्वी करण्यात आला. एकंदरीत भारतामध्ये १९६५ नंतरच कृषी प्रक्रिया उद्योगाची यशस्वी वाटचाल होऊन या प्रक्रियेला आधुनिक तंत्रज्ञानाचे स्वरूप देऊन उत्पादनामध्ये वाढ घडून आली.

## शेतमाल प्रक्रिया म्हणजे काय ?

शेतमाल प्रक्रिया म्हणजे त्या मालाचे स्वरूप बदलविणे, वस्तूची गुणवत्ता, कच्च्या मालाचे पक्क्या मालात रुपांतर करणे, अंतिम उपयोगाकरिता वस्तू तयार करणे होय.

सामान्यपणे वस्तूच्या बाह्य रूपात आमूलाग्र बदल करणे म्हणजे कृषी माल प्रक्रिया होय. या प्रक्रियेतून शेतमालाला कच्च्या मालापेक्षा जास्त पैसा

प्राप्त होतो.

## कृषी माल प्रक्रिया उद्योगांची आवश्यकता:

भारतात जवळपास ६४ % लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. भारताच्या सकल उत्पादनामध्ये जवळपास १३.९ % व निर्यातीमध्ये १२ % योगदान या शेतीचे आहे. त्याच प्रमाणे आजही २/३ लोक रोजगारासाठी या क्षेत्रावर अवलंबून असलेले दिसतात. जीवन निर्वाहाचे साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. तसेच भारतीय शेती मान्सूनवर अवलंबून आहे. म्हणूनच कृषीच्या विकासासाठी कृषी विकासाची नितांत आवश्यकता आहे. हे खालील मुद्यांवरून आपल्या लक्षात येते.

१) मोठ्या प्रमाणात रोजगारीच्या संधी व नवीन दालने खुली करणे.

२) कृषी व त्यावर आधारित उद्योगांचा जलद गतीने विकास.

३) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीचा वाटा वाढविणे.

४) कच्च्या मालाचा पूर्णपणे उपयोग करणे.

५) शेतीमालाची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी.

६) कृषी मालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी.

७) शेतकऱ्यांच्या राहणीमानात वाढ करण्यासाठी

८) नैसर्गिक साधनसामग्री व मानवी साधन सामग्रीचा पुरेपुर उपयोग.

९) स्पर्धात्मक बाजू तीक्ष्ण करण्यासाठी.

१०) पारंपरिक पध्दतीकडून तांत्रिक ज्ञान आत्मसात करणे.

११) प्रतिव्यक्ती उत्पन्न व क्रयशक्ती वाढ करणे.

१२) पायाभूत सुविधा आणि वितरणाचे जाळे यांचा विकास.

१३) साठवणूक, सुलभ बाजार, व खाद्यान्न वाढीत एकरूपता आणणे.

१४) अनेक डाएट मॉडेलचे स्केल व खाद्यान्न प्रक्रियेवर अवलंबून असते.

१५) जलद शहरीकरण, उद्योग साक्षरतेत वाढ होण्यासाठी.


१६) कारखान्यातील महिलांची संख्या जास्तीत जास्त वाढविण्यासाठी

१७) कृषीतील, कच्च्या मालाचे रुपांतर पक्क्या मालात होऊन त्याची किंमत वाढविणे.

१८) उत्पादनात आणि प्रकियेच्या उद्योगात संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी.

१९) उद्योग आणि शेती यांना एकत्रित आणण्यासाठी

## भारतातील खाद्यान्न प्रक्रियेची संरचना:




१) भारतामध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये ४२% खाद्यान्न प्रक्रिया उद्योग आहेत.

२) ३३% उद्योग हे लघु उद्योग आहेत.

३) २५% उद्योग हे असंघटीत क्षेत्रातील आहे.

**खाद्यान्न व कृषी प्रक्रिया उद्योगाचे वर्गीकरण:(कृषी व खाद्यान्न प्रक्रिया क्षेत्र)**

१) अन्न प्रक्रिया उद्योग:

देशामध्ये मुख्य अन्न हे तांदूळ व गहू आहे तसेच डाळी व तेलबियांचाही समावेश यामध्ये होतो. गव्हाच्या रोल पिठ गिरण्या, ऊसापासून साखर उद्योग, त्याचप्रमाणे त्याच्या मळीपासून गूळ व दारू त्याच प्रमाणे साखरेच्या चिपेपासून वस्तू तयार करण्यात येतात. भात गिरण्यांच्या संख्येत सुध्दा मोठी वाढ झाली आहे. या गिरण्यापासून तेल निघणारा भुसा प्राप्त झाला आहे. या भूश्यापासुन त्यावर प्रक्रिया करून मोठ्या प्रमाणात तेल निर्माण होत आहे. तेलबिया प्रक्रिया उद्योग सुध्दा मोठ्या प्रमाणात निर्माण होतांनी दिसत आहे.

२) मत्स्य व मास प्रक्रिया उद्योग:

मत्स्य उत्पादनामध्ये भारत हा जगातील ६ व्या क्रमांकाचा देश आहे. हा एक भरपूर उत्पन्न व मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा उद्योग आहे. कारण आज माशांचे उत्पादन व त्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारतात १९९०-९१ मध्ये माशांचे उत्पादन ३८ मिलीयन टन होते ते २०१०-११ मध्ये वाढून ८३ मिलीयन टन झाले.

त्याचप्रमाणे मांस व मांसाचे पदार्थ यांच्या उत्पादनामध्येही निरंतर वाढ होत आहे. देशामध्ये बकरी, डुक्कर, म्हैस, मेंढी इ. जनावरांच्या मांसाचे उत्पादन होते. मांसाच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ विदेशी चलनाची आवक वाढविते. निर्यात होणारे हे मांस मशीनद्वारे कापले व पॅकींग केले जाते. २००८-०९ यापासून येणारी आवक ५,३७१ कोटी रुपयापर्यंत वाढली.

३) कुक्कूटपालन व अंडी प्रक्रिया:

हा पशुपालन व्यवसायातील एक महत्त्वाचा उद्योग आहे. माणसाच्या खाण्या-पिण्याच्या सवयी बदलत असल्यामुळे तसेच पोषक आहार आवश्यक असल्यामुळे तो अंडी खाऊ लागला. यामुळे देशात ब्रायलर कोंबड्या व अंड्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढले. यामध्ये अंड्याचे संरक्षण पॅकींग, कोंबड्याचे खाद्य तयार करणे, अंडे साठविण्यासाठी ट्रे तयार करणे, तिचे मांस विकणे. इ. प्रकारचे उपव्यवसाय या उद्योगातून निर्माण झाले. देशामध्ये ३० लाख लोक कुक्कूटपालन व्यवसाय कार्यरत आहेत.

सध्या देशामध्ये अंडी पावडर, जरदी (अंड्यातील बलक) पावडर या उत्पादनाच्या प्रारंभ झाला असून २००८-०९ मध्ये रु.४२२ कोटी ची निर्यात या उद्योगाने केली आहे.

४) दूध प्रक्रिया उद्योग:

देशात झालेल्या श्वेत क्रांतीमुळे दूध उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शेतीक्षेत्राला जवळचा किंवा पर्यायी व्यवसाय म्हणून याकडे बघितले जाते. दूध हे मानवाचे खाद्यान्न म्हणून वापरले जात असून एकुण १७% उत्पन्न या दूध व्यवसायातून प्राप्त होते. या दुधापासुन दुग्धजन्य पदार्थ हा उपउत्पादने बनविली जातात. पारंपरिक पदार्थामध्ये लोणी, दही, दूध पावडर इ. उत्पादने नविन दूध उत्पादनामध्ये पाश्चराईज्ड दूध तसेच आंबविलेले पदार्थ तयार करण्यासाठी दुधाचा वापर केला जातो. या उत्पादनामध्ये दुधापासून पनीर, श्रीखंड, छन्ना इ. तसेच यापासुन लॅक्टोज, दाणेदार पावडर, बेकरी उत्पादने तयार करण्यासाठी याचा उपयोग होतो.

खवा, मिष्टान्न, बर्फी, पेठे, गुलाबजामून यासारखे पदार्थ बनविण्यासाठी देखील दुधाचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. अशा प्रकारे या पदार्थांची गुणवत्ता वाढवून ते जास्त काळ टिकतील अशा व्यवस्था निर्माण केल्यास या दुग्धजन्य पदार्थांच्या बाजारपेठ विस्तारास मोठा वाव मिळेल.

५) अनुकूल उद्योग / सोईचे उद्योगः

अ)फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योगः

देशाच्या लोकसंख्येत वाढ होत असल्यामुळे त्यांच्या गरजा भागविणे आवश्यक आहे. म्हणूनच शेती व शेतीपूरक उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे. फळामध्ये अनेक फळांचा समावेश होतो. संत्री, मोसंबी यासारख्या पदार्थांचा रस तयार करणे, भुकटी तयार करणे, त्यांच्या सालीपासुन तेल, फळांच्या बियांपासून तेल तयार करणे, कँडी तयार करणे, प्राण्याचे खाद्य तयार करणे इ. उद्योग केले जातात. चिकू, सिताफळ यासारख्या फळांपासुन टॉफीबार, जेल, जॅम, हलवा, च्युईंगम इ. पदार्थ तयार केले जातात. कोकम तसेच लिंबूसारख्या पदार्थांपासून शरबत, रस, निरनिराळी औषधे तयार करता येतात. त्याचप्रमाणे भाजीपाल्यांवर प्रक्रिया करून ते जास्तीत जास्त टिकवून ठेवता आले तर उत्पादकाला आपल्या मालाचा योग्य तो भाव प्राप्त होऊ शकतो.

ब)मिठाई व बेकरी:

दूध, चीज, ईस्ट या पदार्थापासुन अनेक प्रकारच्या मिठाई व पाव, टोस्ट, खारी यासारखे पदार्थ तयार करून मोठ्या प्रमाणात उत्पादन प्राप्त करता येते.

क)खाण्यासाठी तयार अन्नः

लोकांच्या गरजा वाढत आहे. आजच्या धावपळीच्या युगात वेळेची सवड मिळत नसल्यामुळे लोकांना सोईचे होईल असे उद्योग जर निर्माण झाले तर त्यापासून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतात. उदा. भाज्या निवडून ठेवणे, पीठ मळून चपात्या तयार करणे, नाश्ता तयार करणे इ.

६)पेय बनविणारे उद्योगः

यामध्ये अल्कोहोल तयार करणारे, चहा व कॉफी तयार करणारे, सिलबंद पाणी आणि इतर पेय बनविणाऱ्या उद्योगांचा समावेश होत असून या उद्योगापासून सुध्दा मोठ्या प्रमाणात निर्यात व रोजगाराच्या संधी ह्या प्राप्त होतात.

खाद्यान्न उद्योगामुळे होणारे फायदेः

भारतामध्ये अनेक प्रकारचे खाद्यान्न प्रक्रिया उद्योग स्थापन झाल्यामुळे अनेक प्रकारचे फायदे प्राप्त होतात.

१)या उद्योगांमुळे खूप प्रमाणात संशोधक व संशोधनाचे विशेष कौशल्य एकत्रित येतील.

२)भारत मोठ्या प्रमाणावरील जगातील एक मोठा उत्पादक बनेल.

३)पायाभूत सुविधा आणि वितरणाच्या मोठ्या सोई निर्माण होतील.

४)स्त्री-पुरूष दोघांनाही मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होईल.

५)स्वयंरोजगार मोठ्या प्रमाणात निर्माण होईल.

६)संशोधनाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पदार्थविज्ञानाचे तंत्रे उपलब्ध होतील.

७)मोठी बाजारपेठ व व्यापारी मॉडेल तयार होतील.

८)खाद्यान्न प्रक्रिया उद्योगामुळे डाएटसाठी एकदम चांगला प्रभाव राहील.

९)टेस्ट मध्ये पाहिजे तो बदल खाद्यान्न उद्योगामुळे

आपल्याला मिळविता येतो.

१०)प्रक्रिया झालेल्या वस्तुसाठी लोक जास्त पैसे मोजण्यासाठी तयार होत असल्यामुळे मालाची किंमत वाढते.

११)खाद्यान्न प्रक्रिया उद्योगातून जास्तीत जास्त पोषक मुल्ये प्राप्त होतात उदा. विटॅमिन.

१२)सामाजिक कल्याणाच्या योजनांमध्ये वाढ होऊन रोजगाराच्या संधी प्राप्त होईल आणि त्यामुळे ग्रामीण भाग सशक्त होईल.

१३)खाद्यान्न प्रक्रिया उद्योगामुळे शेती आणि उद्योग यांच्या मध्ये संयोग घडवून महत्त्वपूर्ण ठरतो.

**खाद्यान्न प्रक्रिया उद्योगासमोरील समस्याः**

१) खाद्यान्न प्रक्रिया उद्योगामध्ये पुरेशा भांडवलाचा व व्यवस्थापनाचा अभाव दिसून येतो.

२) उद्योग सरकार संस्था यांचा अजूनही योग्य मेळ जुळून आलेला नाही.

३) खाद्यान्न उद्योग प्रक्रियेसाठी अजूनही विद्युत पुरवठा पुरेशा प्रमाणात होत नाही.

४) जेवढी गुंतवणूक या उद्योगामध्ये व्हायला पाहिजे ती होताना दिसत नाही व यामुळे तांत्रिक कौशल्य, पायाभूत सुविधा यांचा विकास झालेला नाही.

५) खाद्यान्न प्रक्रिया उद्योगासाठी लागणाऱ्या वित्त व्यवस्थेचा पुरवठा होण्यासाठी वेळ लागतो.

६) पाणी पुरवठ्याच्या पुरेशा सोयी उपलब्ध नाही.

७) खाद्यान्न प्रक्रियेतील वस्तूसाठी विपणन व नाममुद्रा (Brand- building) साठी दुर्लक्ष केल्या नाही.

८) मोठ्या प्रमाणात व्यापारिक जागरूकता व चुकीच्या योजनांची निवड केलेली दिसून येते.

९) कच्च्या मालाचा पूर्णपणे उपयोग केला जात नाही.

**संदर्भ सूचीः**

१) रायखेलकर दामजी, *भारतीय अर्थव्यवस्था* विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जाने. २०१३.

२) कटमुसरे एस.बी., *कृषी अर्थशास्त्र*, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपुर, एप्रिल २०१३.

३) अर्थसंवाद,

४) साप्ताहिक किसान,

५) युनिक बुलेटीन,

६) चाणक्य मंडल,

७) योजना.

निवेदन: अर्थसंवादच्या ऑक्टोबर-डिसेंबर २०१५, खंड ३९ अंक ३ मधील अनुक्रमणिकेतील पृष्ठ क्रमांक बरोबर आहेत. संपादकीय संवादाचे पृष्ठ क्रमांक २२५ व २२६ आहेत. या अंकातील प्रथम शोधनिबंधाचा पृष्ठ क्र.२२५ ऐवजी तो पृष्ठ क्र.२२७ असून त्यापासून पुढे याप्रमाणे पृष्ठ क्रमांक क्रमाने आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# महाराष्ट्रातील शेती आधारित उद्योग: सद्यस्थिती

**सुरेश व्यंकटराव ढमढेरे, पुणे,**
सहयोगी प्राध्यापक,
एस.पी.जे. महाविद्यालय, पाबळ.
भ्रमणध्वनी: ९९७०२०८५२०

महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्रगण्य राज्यांपैकी एक असून देशाच्या कृषिउद्योग क्षेत्रामध्ये महत्वाचे स्थान आहे. शेतात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांचे उत्पादन करणे तसेच शेतातील उत्पादित मालावर प्रक्रिया करणे असा दुहेरी अर्थ कृषि उद्योग या संज्ञेत घेतला जातो. यामुळे अनेक उद्योगधंदे या सदराखाली येतात. आपण येथे शेतीतील उत्पादित मालावर प्रक्रिया असा अर्थ घेत आहोत. जसे कापड उद्योग, तेलबिया व तेलापासून होणारी उत्पादने, तंबाखू, फळांवरील प्रक्रिया, मद्यार्क, साखर कारखाने, वनोत्पादने, लाकडाच्या वस्तू, चामड्यांच्या वस्तू इ. उद्योगधंदे या वर्गातच मोडणारे आहेत. परंतु अल्पभांडवलात आणि अल्पवेळात पूर्ण होणाऱ्या अनेक कृषिउद्योगांना अजूनही राज्यात वाव आहे. उदा. नीरा, मधुमक्षिकापालन, काथ्याच्या वस्तू, कागद, पुठ्ठा, मेण, फळांचे निर्जलीकरण, मसाल्याचे पदार्थ, बेकरी वस्तू, आयुर्वेदीय औषधी, काड्यापेट्या इ. राज्यातील शेतकी व औद्योगिक विकासात या उद्योगांमुळे विकासाचा वेगही वाढेल व रोजगाराचा प्रश्नही सुटू लागेल.

सध्या पर्यटन उद्योग हा व्यवसाय गती घेत आहे. साखर व दुध या दोन मोठ्या कृषि उद्योगापाठोपाठ निलगिरी शेती व त्यापासून कागदाचे उत्पादन हा एक मोठा कृषि उद्योग विकसित होत आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये निलगिरी उत्पादन सहकारी संस्था निर्माण झालेल्या आहेत. इगतपुरी (जि. नाशिक) येथे निलगिरी पासून कागद तयार करण्याच्या कारखान्याची उभारणी झाली आहे. राज्यात उद्योग गटनिहाय कार्यान्वित प्रकल्पांची संख्या १९९१ ते २०१४ पर्यंत पुढीलप्रमाणे आहे.

वस्त्रांचे कार्यान्वित प्रकल्प ९२६ असून त्यातील गुंतवणूक १५७४७ कोटींची आहे. साखरेच्या कार्यान्वित प्रकल्पांची संख्या २१६ असून एकूण गुंतवणूक ७२५३ कोटींची आहे. कागद व कागद उत्पादनांच्या कार्यान्वित

प्रकल्पांची संख्या २६१ असून एकूण गुंतवणूक ७२१४ कोटी रु. आहे. प्रक्रिया केलेले अन्न या प्रकल्पांची संख्या ४३३ असून गुंतवणूक ५२८६ कोटींची आहे. वनस्पती तेल आणि वनस्पती या प्रकल्पांची संख्या २०२ असून त्यात २२८२ कोटी रूपयांची गुंतवणूक झालेली आहे. तर याच प्रकल्पांचे मंजुर झालेले प्रस्ताव वस्त्रे १९८१, साखर १५२१, कागद व कागद उत्पादने ५३१, प्रक्रिया केलेले अन्न १०३८, वनस्पती तेल आणि वनस्पती ३७२ आहे. त्यामुळे या उद्योगांची संख्या वाढताना दिसून येते. राज्यात कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यातील काही कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांची सद्यस्थिती व भवितव्य पुढीलप्रमाणे सांगता येते.

या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

१) महाराष्ट्रातील कृषी उद्योगांचा अभ्यास करणे.

२) कृषि प्रक्रिया सहकारी उद्योगांची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३) फुलोद्योगाचा अभ्यास करणे.

४) काजु उद्योगाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

५) कृषि पर्यटन उद्योगाची सद्यस्थिती जाणून घेणे.

**संशोधन पध्दती:**

कृषि उद्योगांच्या संख्येत वाढ होत आहे सदर अभ्यास दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे.

**कृषि प्रक्रिया सहकारी उद्योग:** कृषि प्रक्रिया सहकारी संस्था शेतकऱ्यांना उत्पादनाचा वाजवी मोबदला आणि ग्रामीण उद्योगांच्या वाढीला चालना देऊन त्याद्वारे रोजगार निर्मिती करून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. राज्य सरकार सहकारी संस्थाना कृषि प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य पुरविते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थाचे सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्यसंस्था हे प्रमुख घटक आहेत.

अ) सहकारी सूत गिरण्या सद्यस्थिती: २०१४ मध्ये राज्यात १४९ सहकारी सूत गिरण्या होत्या. या सूत गिरण्यांच्या भागभांडवलामध्ये राज्य शासनाचा ८३.३ टक्के हिस्सा होता. उत्पादन चालू असलेल्या फक्त ६५ गिरण्या होत्या. उत्पादित सुताचे मुल्य २६२४ कोटी रुपये होते. सुमारे ३७.६२ टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. यावरून सूत गिरण्यांची स्थिती समाधानकारक वाटत नाही.

ब) सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्था: राज्यात २०१४ मध्ये ६७२ सहकारी हातमाग व २१३६ यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६.५ व ७३.२ टक्के होता. मागांची संख्या २,२८,००० एवढी होती. तर उत्पादनांचे मूल्य ७७ कोटींचे होते. सुमारे ४८.४ टक्के सहकारी हातमाग व ५५ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. म्हणजेच एकूण तोट्यातील संस्था ३२५ एवढ्या होत्या. म्हणजेच हातमाग व यंत्रमाग यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून येते.

क) साखर कारखाने: देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३१ टक्के कारखाने महाराष्ट्रात असून त्या खालोखाल २३ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. २०१४ अखेर देशातील एकूण गाळप झालेल्या साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ३२ टक्के होता. त्या

खालोखाल उत्तर प्रदेशाचा हिस्सा २७ टक्के होता. महाराष्ट्रात साखर उद्योग महत्त्वाचा आहे. ग्रामीण जीवनाचे चित्र पालटण्यासाठी साखर उद्योगाने सहकारी तत्त्वानुसार महत्त्वाचे काम केले आहे व ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणले आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केलेली आहे. १९५० मध्ये महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर एक साखर कारखाने होते. २०१४ ला महाराष्ट्रात २०२ साखर कारखाने होते. त्यातील उत्पादन चालू असलेले ९६ कारखाने आहेत. साखर उत्पादन ५६.५२ लाख मे. टन एवढे झाले आहे. सह वीज निर्मिती प्रकल्प असलेले ४६ कारखाने आहेत. त्यांची वीज निर्मिती क्षमता ८२७ दशलक्ष युनिट एवढी आहे. २०१४ मध्ये साखर कारखान्यांनी ४५९.७२ लाख मे. टन एकूण ऊस गाळप केलेले आहे. तर ऊसाची खरेदी २१०० रूपये प्रति मे. टन अशी केली गेली. तर ५६.२० लाख मे. टन एकूण साखर उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले. याच वर्षातील साखर उतारा सरासरी ११.६१ टक्के होता.

महाराष्ट्रात साखर कारखान्यांची गाळप क्षमता आणि साखर उत्पादन वाढलेले आहे. मात्र सध्या गेल्या दोन-तीन वर्षापासून महाराष्ट्रात दुष्काळ पडत असल्याने ऊस लागवडीमध्ये घट झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील साखर कारखान्याची पूर्ण क्षमता वापरली जात नाही. तसेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे सरकारकडून होणाऱ्या अनुदानाचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत.

**साखर कारखान्यांच्या समस्या:**

१)आधारभूत किंमतः सन १९६६ च्या ऊस नियंत्रण कायद्यानुसार केंद्र सरकार प्रत्येक हंगामासाठी ऊसाची किमान आधारभूत किंमत ठरवून देते. ही किंमत सरकारच्या कृषीमूल्य आयोगाच्या शिफारशीवर अवलंबून असते. ऊस उत्पादकांना ऊसाच्या दराची हमी मिळावी यासाठी महत्त्वाची असते. ही आधारभूत किंमत ऊस लागवडीपूर्वी घोषित होणे आवश्यक असते. परंतु सरकार या किमान आधारभूत किंमती उशिरा जाहिर करते. त्याचा प्रतिकूल परिणाम ऊस लागवडीवर व साखर उत्पादनावर होतो. ऊसाची आधारभूत किंमत ठरवितांना ऊस उत्पादन आणि त्याची किंमत इतर वस्तूंच्या किंमती, ऊसाचा सरासरी साखर उतारा, तयार झालेली साखरेची किंमत तसेच बाजारातील साखरेची उपलब्धता इ. विचारात घेऊन सरकारने आधारभूत किंमत ठरविणे आवश्यक आहे. तसेच महागाई, खते, पाणी, औषधे, किटकनाशके इत्यादी खर्चाचा विचार करणे आवश्यक आहे.

२) सहवीज निर्मितीः महाराष्ट्रातील सध्याची वीजनिर्मिती व वीजेचा वापर यामध्ये प्रचंड तफावत आहे. ग्रामीण भागात १२ ते १६ तास भारनियमन करावे लागते. तर शहरी भागात चार ते दहा तास भारनियमन करावे लागते. त्यामुळे ऊसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. सहवीज निर्मितीसाठी सरकारने नियोजन आणि धोरण ठरविणे आवश्यक आहे.

३) लेखा परीक्षण व तोट्यातील कारखाने: महाराष्ट्रातील ६१ सहकारी साखर कारखान्यांनी

गेल्या बावीस वर्षात लेखा परिक्षण केलेले नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. तर २२ कारखान्यांच्या नमुना लेखा परीक्षणात असंख्य गंभीर बाबी दिसून आल्या आहेत. त्यामध्ये तोट्यात चाललेली सहकारी कारखानदारी तसेच संचालक मंडळातील भ्रष्टाचार या बाबी विशेष महत्वाच्या आहेत.

साखर कारखान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना:

१) महाराष्ट्रात यापुढे नवीन साखर कारखाने स्थापन करून नयेत.

२) सहकारी साखर कारखान्यांसाठी केंद्र सरकारने जाहिर केलेल्या किमान वैधानिक दराचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

३) कामगारांचे वेतन, वीज, पाणी, वाहतूक खर्च, ऊस तोडणी वरील खर्च त्वरित अदा करून कारखान्याबाबत विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.

४) सरकारने ठरवून दिलेली लेव्ही साखर ठेवून, शिल्लक साखर निर्यात करणे आवश्यक आहे.

५) सहकारी साखर कारखान्यांनी लेखा परीक्षण करणे आवश्यक आहे.

६) सहकारी साखर कारखान्यांनी पेपर, पशुखाद्य उद्योग, खते, इंधन, रसायन आणि वीज उद्योग उभारणे गरजेचे आहे.

७) कामगारांना प्रशिक्षण, चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कारखान्यांची तांत्रिक क्षमता सुधारेल.

८) सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खते, औषधे व बियाणे यासाठी अर्थसहाय्य देणे आवश्यक आहे.

दुग्ध व्यवसाय: दुग्ध व्यवसायाच्या बाबतीत महाराष्ट्राचे स्थान वरच्या दर्जाचे आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर इ. ३६ ठिकाणी सहकारी दुध योजना राबविली जाते. त्यापैकी आठ ठिकाणी सहकारी दूध योजना आहेत. दूध संकलन केंद्रावरून ते गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करून स्थानिक गरजा भागविल्यानंतर त्याचे शहरी भागात वाटप करणे, दुधापासून बनविलेल्या दूध भुकटी, लोणी, चीज, तूप अशा वस्तूंची विक्री करणे हे यातील कार्यक्रम आहेत. राज्यात ११४ शीतकरण केंद्रे आहेत. स्पेन आणि सिरीया या देशांना दुधाची भुकटी निर्यात होत आहे. राज्यात २०१४ मध्ये २६५७७ सहकारी दुध संस्था होत्या. तर ७८ सहकारी दुग्ध संघ होते. सुमारे ४६.३ टक्के सहकारी दुग्ध संस्था आणि ४३.६ टक्के दुग्धसंघ तोट्यात होते.

दुधापासून तयार होणाऱ्या पदार्थांचे उत्पादन व वापर वाढणे महत्त्वाचे आहे. शीतकरण प्रक्रिया व भुकटीकरण या बाबतीत शासनाच्या बरोबरीनेच सहकारी क्षेत्रांचाही वाटा आहे. जळगाव व वारणानगर येथे हे कारखाने सहकारी क्षेत्रात आहेत. दुग्ध व्यवसायामुळे १५ लाखापेक्षा अधिक रोजगार निर्माण झालेला आहे. राज्यात एकूण दुध भुकटी कारखाने ९ आहेत. १४१ मे. टनापेक्षा अधिक दुधाची भुकटी केली जाते. थोडक्यात राज्यात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. मात्र व्यवसाय संकटात सापडलेला आहे. सहकारी संस्थांचे आजारपण, वाढती स्पर्धा, अत्युत्पादन, घटता दर्जा, सदोष व्यवस्थापन व वाढता तोटा आणि दुधाच्या अधिप्राप्तीत घट सर्वत्र दिसून येते.

महाराष्ट्र राज्य कृषीउद्योग विकास महामंडळाची स्थापना झालेली असून फळे, भाजीपाला या कृषी मालावर प्रक्रिया करणे व तत्सम पदार्थांची निर्यात करणे ही या संस्थेची कार्ये आहेत. त्यानुसार फलोत्पादनास सध्या महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते.

**फलोद्योग:** केंद्र सरकारने फलोद्योगाच्या एकात्मिक विकासासाठी तांत्रिक मिशनची स्थापना केलेली आहे. याद्वारे फलोद्योगाबाबत देशभरात राबविल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे एकत्र नियोजन करण्याचा प्रयत्न याद्वारे केला जातो. या कार्यक्रमांतर्गत ९७५०८ हेक्टर क्षेत्रावर फलोत्पादनाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. विविध फळांवर प्रक्रिया करणारे स्वतंत्र उद्योग विकसित झाले आहेत. ज्यूस, जेली, जाम, लोणची इत्यादी प्रक्रिया केलेल्या उत्पादनाला मोठी मागणी आहे. फळ प्रक्रिया उद्योगामुळे फलोत्पादन वाढीला चालना मिळाली आहे.

महाराष्ट्र शासनाने १९९०-१९९१ पासून फलोत्पादनाला मोठ्या प्रमाणात चालना दिली. १९९०-९१ मध्ये २.४२ लाख हेक्टरवर फळपिके होती. त्या क्षेत्रात वाढ होऊन सन २०१३-१४ पर्यंत १८.३६ लाख हेक्टर क्षेत्र विविध फळ पिकांखाली आले आहे. आंब्याखाली ५.२५ लाख हेक्टर, संत्र्याखाली १.६८ लाख हेक्टर, मोसंबी खाली १.४५ लाख हेक्टर, डाळिंबाखाली १.७३ लाख हेक्टर, केळी खाली ०.८३ लाख हेक्टर, चिकूखाली ०.८५ लाख हेक्टर आणि द्राक्षाखाली ०.९० लाख हेक्टर क्षेत्र आले आहे. फलोत्पादन वाढीमुळे प्रक्रिया उद्योगाची स्थापना राज्यात होत आहे. मात्र प्रक्रिया उद्योगाने अद्यापही वेग घेतलेला दिसून येत नाही.

**काजु उद्योग:** अमेरिका आणि युरोपातील देशांना काजुची निर्यात करणारा भारत हा प्रथम क्रमांकाचा देश आहे. जागतिक मागणीच्या ५० टक्के निर्यात भारतातून होते. महाराष्ट्रातील काजु लागवडीचा विचार करता, काजु लागवडी खालील क्षेत्र आणि उत्पादकता यामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. १९९० पर्यंत काजु पिकाखालील क्षेत्र २१५०० हेक्टर होते ते २०१२ पर्यंत १.७३ लाख हेक्टर पर्यंत वाढले आहे. राज्यात काजुची उत्पादकता १.५ टन एवढी आहे. काजुची लागवड केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, गोवा, ओरिसा आणि महाराष्ट्रात केली जाते. त्यामुळे काजु बियांवर प्रक्रिया करणारे कारखाने या राज्यात विखुरलेले आहेत. हा फार मोठा कृषि उद्योग आहे. २०१२ मध्ये भारतात ३७९७ काजु कारखाने होते. यावर प्रक्रिया करण्याची क्षमता १६.२३ लाख टन होती. या कारखान्यात १.५ दशलक्षपेक्षा अधिक कामगारांना रोजगार मिळाला. या कामगारांपैकी ९५ टक्के स्त्रीया आहेत. हा उद्योग ग्रामीण विभागात असल्याने गरीब आणि मागासलेल्या लोकांचे राहणीमान सुधारण्यास मदत होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यात सर्वात जास्त ७५ कारखाने आहेत. तर सावंतवाडी तालुक्यात ३६ कारखाने आहेत. कोकणात काजु प्रक्रिया उद्योगामुळे स्त्रीयांना रोजगाराची मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झालेली आहे. मात्र स्त्रीयांना दिले जाणारे वेतन कमी आहे. तसेच आरोग्य, प्रशिक्षण, गृहयोजना इ. कोणत्याही सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही.

**कृषी पर्यटन उद्योग:** कृषि पर्यटनाचा उगम व्यावसायिक पातळीवर जगात प्रथम ऑस्ट्रेलियात झाला. महाराष्ट्रात सर्व प्रथम कै. आप्पासाहेब

पवार, यांच्याकडून बारामतीत आपल्या शेतावर नावीन्यपूर्ण कृषि संशोधन प्रयोग दाखविण्यासाठी इतर शेतकऱ्यांना बोलविले जात असे. त्याठिकाणी त्यांची निशु:ल्क राहण्याची, जेवणाची सोय करीत. कालांतराने शुल्क आकारून पुढे ॲग्री अँड इको टुरिझम नावाने शेतकरी चंद्रशेखर भडसावळे यांनी हा व्यवसाय आर्थिकदृष्ट्या फायदेशीर व शेतकऱ्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा आहे हे सिध्द करून दाखविले. सध्या महाराष्ट्रात जवळपास ३५० कृषिपर्यटन केंद्रे विकसित झालेली आहेत. सध्या महाराष्ट्रात कृषिपर्यटन हा व्यवसाय कृषिपुरक उद्योगाचा प्रमुख भाग बनला आहे. ग्रामीण जनजीवनाचा अनुभव घेण्यासाठी कृषिपर्यटन हे एक सेवा क्षेत्र आहे. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील जय मल्हार कृषि पर्यटन केंद्र हे राज्यात नावारूपाला आले आहे. हे पर्यटन केंद्र २५ एकरावर उभारले आहे. या केंद्रात ज्ञान-विज्ञान, मनोरंजन, ऐतिहासिक, भौगोलिक, आयुर्वेदिक, अध्यात्मिक इत्यादीचा संगम साधण्यात आलेला आहे. हे पर्यटन केंद्र देशपातळीवर एक मॉडेल म्हणून आपल्याला पाहता येईल. या केंद्रात १) खगोल विश्व - ग्रह, तारे, यांची सखोल माहिती दिलेली असून शास्त्रज्ञांचे फोटोसह माहिती दिलेली आहे. २) किल्ले पर्यटन - भारतातील ३५० किल्ल्यांची सचित्र माहिती दिलेली आहे. ३) धन्वतंरी उद्यान - यामध्ये पर्यटकास विविध आजारावरील औषधी वनस्पतींची माहिती मिळते. ४) अध्यात्मिक पर्यटन - जैन बांधवांचे २४ तीर्थकरांचे २४ वृक्षांचे संकलन करून बाग विकसित केली आहे. ५) तसेच गणेशपूजनासाठी २१ पत्री पुजेसाठी लागणाऱ्या साहित्याची झाडे लावली आहेत. तसेच सर्व राशी व नक्षत्र वृक्षांचे संकलन करून या बागेत लागवड केलेलीआहे. तर माता लक्ष्मी व सरस्वती यांच्या पूजेत आवश्यक असणाऱ्या कमलपुष्पांचे उद्यान साकारलेले आहे. ६) पॉली हाऊस यामध्ये विविध प्रकारच्या गुलाब फुलांची लागवड केलेली आहे. ७) ग्रामीण जनजीवन- पुर्वीच्या काळातील राहणीमान कसे होते. त्याची रचना साकारलेली आहे. ८) पारंपरिक सिंचन व्यवस्था - कातडी मोट, लोखंडी मोट, त्यानंतर आलेले ऑईल इंजिन, आजच्या काळातील इलेक्ट्रिक मोटार व ठिबक सिंचन इ. चे संकलन केलेले आहे. ९) तसेच कृषिवेधशाळा १०) मॅजीक शो ११) पपेट शो इ. या कृषि पर्यटन केंद्रांचे आकर्षण आहे. देवराम गोरडे यांनी अतिशय सुंदर रीतीने मांडणी करून कृषि पर्यटन उद्योगाला एक दिशा दिलेली आहे आणि याच कृषि पर्यटन केंद्रात २० व २१ फेब्रुवारी २०१६ मध्ये महाराष्ट्र सिंचन परिषद भरून अवर्षणप्रवण क्षेत्राचा विकास करण्याकरीता काय करता येईल, यासाठी राज्यातून शेतकरी, कृषितज्ज्ञ, जलतज्ज्ञ, प्राध्यापक इ. मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. हेच ते कृषि पर्यटन उद्योगांचे मोठे यश मानता येईल. भविष्यात राज्यात कृषि पर्यटन उद्योगाला महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे.

**समारोप:**

शेतातील उत्पादित मालावर प्रक्रिया करणे या अर्थाने कृषिउद्योग मोठ्या प्रमाणात विकसित होण्याला वाव आहे. भारतात फळांवर दीड ते दोन टक्के प्रक्रिया केली जाते. इतर देशात ७० ते ८० टक्के फळांवर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे फळ प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात विस्तारावा लागेल. महाराष्ट्रात कृषि प्रक्रिया सहकारी उद्योग मोठ्या

प्रमाणात विकसित झालेला आहे. त्यामध्ये सुतगिरण्या १४९ एवढ्या आहेत. परंतु उत्पादन चालू असलेल्या ६५ सूतगिरण्या आहेत. म्हणजेच सुत गिरण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात समस्या असल्याचे दिसून येते. तर सहकारी साखर कारखाने राज्यात मोठ्या प्रमाणात उभारण्यात आले (२०२) परंतु साखर कारखान्यातील समस्या मात्र कमी झाल्याचे दिसून येत नाही. त्याबरोबरच दुग्ध उद्योग मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात पोहोचलेला आहे. परंतु सदोष व्यवस्थापनामुळे ४५ टक्के दुग्ध संस्था तोट्यात आहेत. फलोद्योग हा राज्यात १९९०-९१ नंतर विकसित झाला आहे. अद्यापही प्रक्रिया करणारे कारखाने विकसित झाल्याचे दिसून येत नाही. काही थोडे प्रक्रिया उद्योग सोडल्यास या फलोद्योगात मोठ्या प्रमाणात विकास करण्यास वाव आहे. तर महाराष्ट्रात काजू उद्योग विशेष करून कोकणात आहे. त्याचे महत्त्व वाढलेले दिसून येते. विशेषतः स्त्रियांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवून देणारा हा उद्योग आहे. तसेच कृषी पर्यटन उद्योग हा नव्यानेच विकसित होणारा उद्योग आहे. त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची:


१) ढमढेरे एस.व्ही., *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रथम आवृत्ती, २००८, डायमंड पब्लि. पुणे.
२) संतोष दास्ताने, *महाराष्ट्र वार्षिक २०१३*, नितीन प्रकाशन, पुणे, पृ. ७९, ७६.
३) *अर्थनाद*, स्मरणिका, मराठी अर्थशास्त्र परिषद, नोव्हेंबर २०१३, ना.अ. देशमुख महाविद्यालय, अमरावती पृ. १४०, १४१.
४) दत्ता वानखेडे, *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५*, पीबीडी पब्लिकेशन्स, पुणे.
५) *स्मरणिका*, १७ वी महाराष्ट्र सिंचन परिषद,२०१६, जय मल्हार कृषि पर्यटन केंद्र, चिंचोली, ता. शिरूर, जि. पुणे.


## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन, चांदवड

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी खरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतिलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथे सामान्यपणे नोव्हेंबर २०१६ मध्ये आयोजित केले जाईल. या अधिवेशनातील चर्चासत्राचे विषय पुढीलप्रमाणे राहतील.

१) प्रा.नी.वि.सोवनी यांचे आर्थिक विचार.
२) आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती.
३) महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भात शासनाची भूमिका.

- कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

# भारतातील कृषी प्रक्रिया उद्योगातील संधी

**जितेंद्र दगडू तलवारे, देवपूर,**
एस.एस.व्ही.पी.एस. कला व
वाणिज्य महाविद्यालय, धुळे.
भ्रमणध्वनी: ९४२२३२९९९५
ई-मेल: talwarejitendra@gmail.com

भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषी प्रक्रिया उद्योगाला मोठ्या संधी आहेत. भारतात अजूनही २०११ च्या जनगणनेनुसार ६८ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात व त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. याच शेती उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग स्थापन केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगारी व दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील लोक तेथे रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे शहराकडे स्थलांतरीत होतात. जर त्यांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध झाला तर त्यांचे नागरी भागात होणारे स्थलांतर थांबेल आणि वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना आळा बसेल. शेती आधारित उद्योग कमी भांडवलामध्ये स्थापन करणे शक्य असल्यामुळे त्यांची उभारणी सहज करता येणे शक्य आहे. शिवाय शेतीमधून उत्पादीत होणारा कच्च्या मालाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. कृषी उद्योगावर आधारित उद्योगांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. फॅमिन इन्क्वायरी कमिशन च्या मते, जे उद्योग शेतमालावर प्रक्रिया करतात आणि राज्यात औद्योगिकरणास मदत करतात आणि शेतीला शेतीविषयक अवजारांचा पुरवठा करतात असे उद्योग म्हणजे शेती आधारित उद्योग होय.

२. दि नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च- शेतमालावर प्रक्रिया करणारे व शेतीसाठी लागणारी अवजारे, खते, बी-बियाणे, किटकनाशके इत्यादी निर्माण करणाऱ्या उद्योगांना कृषी उद्योग असे म्हणतात.

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, कृषी मालावर प्रक्रिया करणारे व शेतीला इतर आवश्यक साधने निर्माण करणाऱ्या उद्योगांना कृषी आधारित उद्योग असे म्हणतात.

**लिंबू प्रकिया उद्योग :**

भारतामध्ये लिंबाची लागवड व उत्पादन आंध्र प्रदेश, गुजरात, मध्यप्रदेश,

राजस्थान व तामिळनाडू या राज्यात जास्त प्रमाणात असून त्या पाठोपाठ महाराष्ट्र राज्याचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रामध्ये १४,५०० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र लिंबू फळझाडाखाली असून त्यामध्ये सध्या झपाट्याने वाढ होत आहे. लिंबामध्ये बरेच औषधी गुणधर्म असल्यामुळे निसर्ग उपचारामध्ये लिंबूपाणी व मध घ्यावे असे सुचविले आहे. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते व पचनसंस्था सुरळित राहते. लिंबू या फळाची उपलब्धता वर्षभर असते. मात्र जुलै, ऑगस्ट, डिसेंबर व जानेवारी या काळात हे फळ भरपूर प्रमाणात उपलब्ध असते. त्या काळात या पिकाला कमी भाव मिळतो. त्यामुळे लिंबू उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. अशा वेळी लिंबू फळावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित पदार्थ तयार करून विकणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर असते. लिंबापासून त्याचा रस, लोणचे, मिश्र लोणचे, सरबत, सिरप, सुगंधी तेल, कॉर्डील, सायट्रिक आम्ल इ. प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करता येतात.

**डाळिंबापासून शीतपेय निर्मिती:**

राहुरी कृषी विद्यापीठाने डाळिंबापासून शीतपेय तयार करण्याचा प्रयोग यशस्वी केला आहे. या तंत्राचा उपयोग करून नाशिक जिल्ह्यातील एक शेतकरी रविंद्र आहिरे यांनी डाळिंबापासून शीतपेय निर्मितीचा प्रकल्प सुरु केला आहे. डाळिंब हे औषधी वनस्पती आहे. या डाळिंबाचा रस काढून त्यात खडीसाखर घालून घेतल्याने पित्ताचा त्रास नाहीसा होतो. डाळिंबाच्या रसाने अन्नपचन चांगले होते. उत्तम प्रकारे भूक लागते. घसा बसला असता डाळिंबाचा रस घेतल्यास घसा त्वरित साफ होतो. यासारखे अनेक फायदे डाळिंबाच्या शितपेयापासून होतात. भारतात अनेक शेतकरी डाळिंब लागवड करीत असतात. त्यांनी हा कृषिपूरक व्यवसाय सुरू करून आपले उत्पन्न वाढवू शकतात.

**डाळिंबापासून अनारदाना :**

पिकलेल्या डाळिंबाचे दाणे सूर्याच्या उष्णतेने वाळवून त्यापासून अनारदाना बनवतात. आपल्याकडे असलेल्या कमी आंबट जातीच्या उदा. गणेश, मृदुला यापासून चांगला अनारदाना तयार होतो. यासाठी फळे निवडून ती स्वच्छ धुवून त्याचे साल काढून दाणे वेगळे करतात. नंतर त्यामध्ये ५ टक्के सायट्रीक आम्ल मिसळून ते सूर्यप्रकाशात ३ ते ४ दिवस किंवा कॅबिनेट ड्रायरमध्ये ५५-६०° से. तापमानाला १० ते १२ तास सुकवून अनारदाना तयार होतो हा प्लॅस्टिक पिशव्यात भरुन त्याची विक्री करावी.

**आंबा प्रक्रिया उद्योग :**

जगात ९० देशामध्ये आंब्याचे उत्पादन होते. भारताचा आंबा उत्पादनामध्ये प्रथम क्रमांक लागतो. आंबा हा बहुगुणी व आरोग्यवर्धक असल्यामुळे आंबा प्रक्रिया उद्योगाला चांगली संधी आहे. या उद्योगाला लागणारा कच्चा माल म्हणजे आंबा हा हंगामामध्ये खरेदी करून विशिष्ट प्रक्रियेद्वारे साठविता येतो व पाहिजे तेव्हा उपयोगात आणता येतो. आंब्याच्या प्रक्रिया उद्योगामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

आंब्यापासून पल्प (गर) तयार करणे, सरबत तयार करणे, आमरस तयार करणे, जाम तयार करणे, चटणी तयार करणे, लोणचे बनविणे, आमचुर तयार करणे, आंब्याची पोळी तयार करणे, कच्च्या आंब्याचे पन्हे तयार करणे यासारखी पदार्थ तयार करता येतात. ही सर्व पदार्थ तयार करताना लागणारे प्रमाण हे आंब्याच्या गुणवत्तेवर

अवलंबून असते.

**पेरु प्रक्रिया उद्योग:**

भारतातील पेरुचे ७० टक्के उत्पादन उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये होते. महाराष्ट्रात नाशिक, जळगाव आणि पुणे येथे पेरुचे उत्पादन होते. महाराष्ट्र राज्यात पेरुचे उत्पादन भारतातील एकूण उत्पादनाच्या १० टक्के आहे. पेरु हे फळ क जीवनसत्त्वयुक्त आहे. त्यामुळे हिरड्या बळकट होतात. पेरुमधील पोषक घटकांचा स्वाद वर्षभर घेण्यासाठी त्यावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित पदार्थ पुढीलप्रमाणे बनविता येतात. पेरुची जेली, मुरंबा, चीज जॅम, पेरु पल्प रस, पेरु खंड, पेरु पावडर, पेरुची वाईन, पेरु लोणचे, पेरुच्या वड्या-बर्फी, पेरु सरबत, पेरु चटणी, पेरु चॉकलेट इत्यादी वस्तू प्रक्रिया करून बनविता येतात.

**टोमॅटो प्रक्रिया उद्योग :**

टोमॅटो ही दैनंदिन आहारातील महत्त्वाची फळभाजी असून त्याचा वापर सूप, केचप, चटणी तसेच सांबार, वरण व इतर मिश्र भाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. टोमॅटो पासून तयार होणारा केचप, सॉस, सुप, पेस्ट प्युरी या प्रक्रियायुक्त पदार्थांना व्यवसायात मोठी मागणी असते. टोमॅटो फळावर योग्यवेळी प्रक्रिया करून मूल्यवर्धित पदार्थ तयार केले तर आर्थिक फायदा करता येतो. टोमॅटो प्रक्रिया करतेवेळी फक्त झाडावर पिकलेल्या लालसर टोमॅटोचा वापर करावा. प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करतांना लोखंडी भांड्याचा वापर टाळावा कारण त्यामुळे तयार झालेला पदार्थ काळसर पडून त्याची प्रतवारी खराब होण्याची शक्यता असते.

**बटाटा प्रक्रिया उद्योग :**

बटाटा ही आपल्या आहारातील महत्त्वाची भाजी आहे. भाजी उपयोगाबरोबर बटाट्यापासून अनेक उपपदार्थ तयार होतात. अशा बटाटा उत्पादनाबाबत शेतकऱ्यांना उत्पादन ते उप उत्पादने तयार करण्यापर्यंतचे उद्योग करण्याची संधी आहे. बटाट्यात काही औषधी गुणधर्म आहेत. ते शरीराला पोषक ठरतात. स्निग्ध पदार्थ सोडला तर चौरस आहारात आवश्यक असलेली सर्व पोषक द्रव्ये बटाट्यात पुरेशा प्रमाणात असतात.

बटाटा वेफर्स - बटाट्यापासून वेफर्स तयार करून ते घरात उपवासाच्या वेळी तळून खाता येतात तसेच बटाटा वेफर्स तयार करण्याचे अनेक उद्योग सध्या अस्तित्वात आहेत.

पावडर - शिजवलेल्या बटाट्यांचा लगदा ड्रायरमध्ये वाळवून घ्यावा म्हणजे आपणास पावडर मिळते. बेकरी पदार्थात बटाट्याची पावडर २ ते ३ टक्क्यापर्यंत वापरली तर ते जास्त दिवस ताज्या स्थितीत राहू शकतात.

फ्रेंच फ्राइज - फ्रेंच फ्राइज हा बटाटा प्रक्रिया उद्योगातील एक महत्त्वाचा प्रक्रियायुक्त पदार्थ आहे. त्याबरोबर चकली, पापड, किस बटाटा प्रक्रियेतून बनविता येतात.

**केळाच्या खोडापासून धागा निर्मिती:**

केळी आपल्याला खाण्यासाठी व चिप्स बनविण्यासाठी वापरता येतात. तसेच केळांची मोठ्याप्रमाणावर निर्यात देखील होते. केळीच्या खोडापासून तयार केलेल्या धाग्यांचा उपयोग गनीबॅग, पायदानी, सतरंजी, सुतळी, दोरी, कपडे वाहतुकीच्या पिशव्या इ. बनविण्यासाठी केला जातो.

**शेंगदाणा प्रक्रिया उद्योग :**

शेंगदाण्यामध्ये अनेक प्रकारची जीवनसत्त्वे आणि खनिज पदार्थसुद्धा असतात. शेंगदाण्यामध्ये

स्निग्ध आम्लाचे प्रमाण २० टक्क्यापेक्षा कमी असते. भुईमुगाच्या शेंगा खारट करून विकता येतात. शेंगदाणे तेल, शेंगदाणे पोहे तयार करून विक्री करता येतात. शेंगापासून शेंगदाणे तयार करून त्याची चांगल्या प्रकारे पॅकींग करून विदेशात निर्यात करता येतात. जगातील अनेक देशांकडून शेंगदाण्याला मोठी मागणी आहे.

**मिरची प्रक्रिया उद्योग :**

मिरची दळल्यानंतर आपल्याला मिरची पावडर मिळते. त्याचबरोबर वाळलेल्या त्याच मिरच्यांचे चिली सॉस तयार करता येते. मिरची लागवड बरेच शेतकरी करीत असल्यामुळे या प्रक्रिया उद्योगाला चांगली संधी आहे.

**सोयाबीन प्रक्रिया उद्योग :**

भारतात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. मानवी आरोग्यासाठी सोयाबीन अत्यंत पौष्टीक असल्याने त्याचा वापर अनेक वस्तू बनविण्यासाठी होतो. सोयाबीन तेल हे मुख्य उत्पादन असून त्याच बरोबर सोया मिल्क, सोया पनीर, सोया दही, सोया सुंगधी दूध, कोल्ड मिल्क कॉफी, सोया श्रीखंड, सोया आम्रखंड, सोया मठ्ठा, छास, छना, आईस्क्रीम, सोया रसगुल्ला, सोया लस्सी, सोया बासुंदी, सोया बर्फी, सोया कलाकंद, सोया बिस्कीट, पशुखाद्य, सोया लाडू, सोया चकली, इत्यादी पौष्टिक पदार्थ सोयाबीनपासून तयार करता येतात.

**द्राक्षे प्रक्रिया उद्योग :**

नाशिक जिल्हा द्राक्षे पिकांसाठी प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यातून द्राक्षांची मोठ्या प्रमाणावर निर्यातही होत असते. त्याचबरोबर द्राक्षांपासून वाईन, बेदाणा, मनुके तयार करता येतात.

**कांदा प्रक्रिया उद्योग :**

महाराष्ट्रात कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात होते व कांदा हा निर्यातही केला जात असतो. कांदा या पिकाच्या किमती बऱ्याच वेळा कमी जास्त होतात. त्यामुळे शेतकऱ्याला कधी फायदा तर कधी मोठा तोट्याला सामोरे जावे लागते. त्यामुळे कांदा प्रक्रिया उद्योग फायदेशीर ठरू शकतो. कांद्याच्या चकत्या करून त्या उन्हात कडकडीत वाळवतात आणि त्या मसाल्याच्या पदार्थात मिसळून बारीक करतात. यालाच कांद्याचे निर्जलीकरण म्हणतात. गुजरात राज्यात सुमारे २३ निर्जलीकरण कारखाने आहेत. त्यामध्ये वार्षिक १.५ लाख टन कांद्यावर प्रक्रिया करण्यात येते. कांद्यापासून निर्जलीकरण केल्यानंतर सॅलड तयार करतात. कांदा तेल, कांद्याचा रस, कांदा पावडर व कांदा लोणचे प्रक्रिया करून तयार करता येते.

**भाजीपाला प्रक्रिया उद्योग :**

भारतात फक्त १ टक्का भाज्यांवर प्रक्रिया करून त्यांचा वापर अधिक कालावधीसाठी केला जातो. प्रगत देशात ५० टक्क्यापेक्षा जास्त भाज्यांवर प्रक्रिया करून तो वापरला जातो. भाजीपाला प्रक्रिया उद्योगात विविध प्रकारच्या भाज्या वाळवून मग त्या भाज्या सूर्यप्रकाशात अथवा सोलर ड्रायरमध्ये वाळविता येतात. महत्त्वाचे म्हणजे भाजीपाला निर्जलीकरणाची प्रक्रिया केल्यास भाज्या अनेक दिवस टिकवून ठेवू शकतो. युद्धामध्ये अथवा नैसर्गिक आपत्तीच्या ठिकाणी भाजीपाल्याची नियमीत पुरवठा करता यावा म्हणून कांदा, बटाटे, गाजर, वाटाणे, कोबी, भेंडी वगैरे आदी भाज्यांचे निर्जलीकरण केले जाऊ लागले आहे. औरंगाबाद येथे भाजीपाला निर्जलीकरणाचा प्रक्रिया उद्योग आहे.

**साखर उद्योग :**

जागतिक स्तरावर साखर उत्पादनामध्ये भारत अग्रेसर आहे. या उद्योगामुळे भारतात ३.२५ लक्ष लोकांना रोजगार मिळाला आहे. २००७-०८ मध्ये साखरेचे उत्पादन २६३ लाख टन होते. ते २००८-०९ मध्ये १४७ लाख टन झालेले दिसते. साखरेचे उत्पादन, वितरण, निर्यात याबाबत सरकारचे धोरण अस्थिर असल्यामुळे उत्पादनात वाढ घट होताना दिसते. भारतात साखर कारखाने सरकारी, खाजगी, सहकारी तत्त्वावर स्थापन झालेले आहेत. ऊसापासून साखरेबरोबरच ऊसाच्या चिपाड्यापासून कागद व पुठ्ठे तयार केले जातात. ऊसाच्या मळीपासून अल्कोहोल, दारु व इतर रासायनिक पदार्थ तयार केले जातात. तसेच गुरांसाठी खाद्य तयार होते. ऊसापासून गूळ व खांडसरी बनविणारे उद्योगही आहेत.

**कापड उद्योग :**

कापड उद्योग हा भारतातील महत्त्वाचा उद्योग आहे. या उद्योगाच्या माध्यमातून प्रत्यक्षरित्या ११.५ लाख श्रमिकांना रोजगार मिळाला आहे. कारखान्यातील रोजगारापैकी १८ टक्के श्रमिकांना कापड उद्योगाने रोजगार पुरविलेला आहे. एकूण कापड निर्यातीत भारताचा वाटा १६ टक्के असून सुती कापड व तयार कपडे निर्यात करणारा भारत हा प्रमुख देश आहे.

**धान्य प्रक्रिया उद्योग :**

शेतातून आलेल्या धान्यावर प्रक्रिया करता येते. कडधान्यापासून डाळी तयार करणे. धान्याचे पीठ तयार करणे, रवा, मैदा तयार करणे इ. उद्योग ग्रामीण व शहरी भागात सुरू करता येऊ शकतात. गहू पॉलीश करून आटा बनविणारे उद्योग मध्यप्रदेश या राज्यात मोठ्याप्रमाणात सुरू झालेले आहेत.

**सारांश :**

भारत हा कृषीप्रधान देश असून अजूनही भारतात ५५ टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या कृषीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या अवलंबून आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा मात्र १४ टक्के पर्यंत कमी झालेला दिसून येतो. याचे मुख्य कारण शेती उत्पादनाला कमीजास्त मिळणारी किंमत आणि शेती प्रक्रिया उद्योगांची कमतरता हे आहे. देशाच्या एकूण कृषी उत्पादनापैकी केवळ २ टक्के उत्पादनावरच प्रक्रिया होते. शेतमालाचे मूल्यवर्धन करण्यासाठी त्यावर प्रक्रिया हाच एक प्रभावी मार्ग आहे. भारतात कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत. त्याचे मुख्य कारण शेतकरी शेती व्यवसाय करताना कर्जबाजारी होतो व शेती उत्पादन न आल्यामुळे, शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे तो कर्जाची परतफेड करू शकत नाही. त्यामुळे तो आत्महत्येकडे वळत आहे. देशातील ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योग सुरू केल्यास शेतातील कच्च्या मालाला तेथेच बाजारपेठ उपलब्ध होईल. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल व रोजगारात वृद्धी होऊन ग्रामीण भागातील होणारे स्थलांतर थांबेल.

**संदर्भसूची:**

१) कविमंडन विजय, *कृषी अर्थशास्त्र*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) धिरज कंखरे, *प्रगतीच्या पाऊलवाटा*, जलसंवाद प्रकाशन, पुणे.

३) *उद्योजक* (दिपक देशमुख) मार्च २०१३, एप्रिल २०१३.

४) *उद्योजक* (दिपक अहिरे) जानेवारी २००४, मे २०१४, जुलै २०१४.

# शेती आधारित उद्योग: ग्रामीण विकासातील भूमिका

रामलिंग कुंडलिक नाळे, सरूड,
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिव-शाहू महाविद्यालय,
ता. शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर.
भ्रमणध्वनी:९४२११००४२७
ई-मेल: ramlingnale@gmail.com

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती असून शेती मशागत पद्धतीमध्ये पारंपरिक साधनांचा अवलंब केला जात आहे. त्यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. शेती उत्पादकतेप्रमाणे भारतीय श्रमिकांची उत्पादकताही कमी आहे. कारण ते उत्पादनाच्या प्रक्रियेत जुन्या व पारंपरिक घटकांचा अवलंब करीत आहेत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी असल्याचे दिसून येते. शेतीप्रधान राष्ट्रांचा विकास हा त्या देशातील ग्रामीण विकास व शेती आधारित उद्योगांच्या विकासावर अवलंबून असतो. स्थानिक कच्चा माल, कमी भांडवल, अल्प तंत्रज्ञान, रोजगाराची अधिक क्षमता इत्यादी दृष्टिकोनातून शेती आधारित उद्योग हे ग्रामीण भागात स्थापन होतात त्यामुळे त्यांची ग्रामीण भागाच्या विकासातील भूमिका महत्त्वाची ठरते.

भारतीय शेतीचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर नियोजनाच्या साहाय्याने प्रयत्न करण्यात आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५१-५२ ते १९५५-५६) शेती उत्पादन वाढीचे उद्दिष्ट पूर्ण केले. त्यामुळे शेती आधारित उद्योगांना कमी किंमतीस गुणवत्ताधारक कच्चा माल मिळाला. या उद्योगांना पाणीपुरवठा, वीजपुरवठा, वाहतूक-दळणवळण, कर्जपुरवठा, प्रशिक्षण सुविधा इत्यादी सुविधा पुरविल्यास या उद्योगांचा विकास होऊन ग्रामीण भागाचा विकास होऊ शकतो. भारतासारख्या विकसनशील देशात या उद्योगांच्या विकासातून ग्रामीण बेकारी व ग्रामीण दारिद्र्य यांचे निर्मूलन शक्य आहे. महात्मा गांधींनी खेड्याकडे चला असा संदेश खेड्यांच्या विकासासाठी दिला होता. खेड्यांचा विकास हाच ग्रामीण क्षेत्राचा विकास आहे. म्हणूनच शेती आधारित उद्योगांची ग्रामीण विकासातील भूमिका

या शीर्षकाखाली शोध निबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## शेती आधारित उद्योग म्हणजे काय?

भारतात शेती आधारित उद्योगास ढोबळमानाने कृषीउद्योग, शेतीपूरक उद्योग, ग्रामीण उद्योग, शेतीउद्योग असे म्हटले जाते. त्यांच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ज्या उद्योगात शेतमालावर विविध प्रक्रिया केल्या जातात व ते उद्योग बहुतांशी ग्रामीण भागात सुरू केले जातात त्यांना शेती आधारित उद्योग म्हणतात.

२) ज्या उद्योगात शेती साधनांची निर्मिती केली जाते त्या उद्योगांना ही शेती आधारित उद्योग म्हणावयास हरकत नाही. उदा. ट्रॅक्टर, नांगर, कापणी यंत्रे, मळणी यंत्र इत्यादी.

३) जे उद्योग शेतीच्या जवळचे पूरक उद्योग म्हणून ओळखले जातात त्यांचा उल्लेख शेती उद्योग करावा. उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मासेमारी इत्यादी

## शेती आधारित उद्योगांचे प्रकार:

१) खाद्य पदार्थ उद्योग :

शेतमालावर प्रक्रिया करून त्यापासून तयार होणारा शेतमाल सामान्यपणे माणसांच्या उपभोगासाठी वापरला जातो. उसापासून गूळ व साखर तयार केली जाते. या वस्तूंचा जास्तीचा वापर माणसांच्या आहारासाठी केला जातो.

२) तेल उद्योग:

भारतात विविध प्रकारच्या तेलबियांचे उत्पादन घेतले जाते. सध्या आपल्या देशातील शेती व्यवसायात हरित क्रांती, दूध क्रांती, निळी क्रांती घडून आली असून तेलबियांच्या वाढत्या उत्पादनातून पिवळी क्रांती ही घडून आली आहे. करडई, भुईमूग, सरकी, सूर्यफूल, तीळ, जवस, मोहरी, करंजी, एरंडी, अंबाडी, खोबरेल इत्यादी प्रकारच्या तेलबियांचे उत्पादन भारतात घेतले जात असून त्यांच्यापासून विविध प्रकारच्या तेलांचे उत्पादन होते.

३) फळावर आधारित उद्योग :

भारतीय शेतीमध्ये आंबा, सफरचंद, केळी, मोसंबी, संत्री, पेरू, पपई, चिक्कू, रामफळ, सीताफळ, डाळींब इत्यादी प्रकारच्या फळांचे उत्पादन होते. या फळापासून लोणचे, आमरस, मुरंबे, जेली, सॉस, सरबत इत्यादी प्रकारचे उत्पादन या उद्योगांतून होते. भारताचा जागतिक पातळीवर फळ उत्पादनात दुसरा क्रमांक आहे.

४) सौंदर्य प्रसाधने उद्योग :

आपल्या देशात विविध प्रकारची सौंदर्य प्रसाधने निर्माण केली जात असून त्यांची मागणी वाढत आहे. तेलांच्या वापरानेच वनस्पती तूप बनविले जात असून साबण, काजळ, पावडर, क्रीम, सुवासिक तेले, गंध इत्यादी सौंदर्य प्रसाधने या उद्योगात निर्माण केली जातात. अलिकडील काळात या उद्योगांचे महत्त्व वाढत असून त्यांना भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

५) फर्निचर उद्योग :

शेती आधारित उद्योगामध्ये या उद्योगाचे महत्त्व वाढताना दिसत आहे. प्रामुख्याने मऊ लाकडाचा वापर फर्निचर उद्योगात केला जातो. टेबल, खूर्ची, कपाट, स्टूल, सोफा-सेट, पलंग, दिवाण, टी-पॉय, चौकट इत्यादी वस्तूबरोबरच पेट्या, आगकाड्या, लगदा, रेयॉन, लाख या वस्तूंची निर्मिती या उद्योगात केली जाते.

६) शेती आधारित इतर उद्योग :

भारतातील शेती आधारित उद्योगात

शेतमालावर प्रक्रिया करणारे, शेती अवजारे निर्माण करणारे व शेतीचे पूरक उद्योग, यांचा समावेश होतो. या विविध प्रकारच्या उद्योगात प्रवरण उद्योग, दुय्यम वस्तू निर्मिती उद्योग, औषधी वनस्पती, विडी-सिगारेट, ताडपत्री, पोती, चटया, पिशव्या, रेशीम, रबर, डिंक, मध, रेझीन्स, बांबू, कळक, उदबत्ती, घायाळ, दोरखंड, तंबाखूजन्य उत्पादने, दुग्धजन्य उत्पादने, कुक्कुटपालन, मासेमारी, शेती लहान-मोठी अवजारे व यंत्रे इत्यादी उद्योग समाविष्ट केले जातात. भारतात अशा उद्योगांची संख्या खूप मोठी आहे.

**शेती आधारित उद्योगांची विकासातील भूमिका :**

भारत हा विकसनशील देश असून या देशाच्या ग्रामीण विकासात शेती आधारित उद्योगांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. हे उद्योग शेतकऱ्यांना शेती मशागती बरोबर ही करता येतात. पशुपालन, कुक्कुटपालन, मासेमारी हे शेतीचे जवळचे पुरक उद्योग असून ग्रामीण उत्पन्नात या उद्योगांचा हिस्सा जास्त आहे. आपल्या देशात भांडवलाचा तुटवडा असल्याने कमी भांडवलात हे उद्योग करता येतात. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल हा स्थानिक स्वरुपाचा असल्याने तो कमी किंमतीस व गुणवत्ताधारक मिळतो. त्यामुळे या उद्योगातील उत्पादन कमी खर्चात होणेस मदत होते. शेती आधारित उद्योग हे ग्रामीण भागात स्थापन होत असल्याने ग्रामीण बेकारी व ग्रामीण दारिद्र्य कमी होण्यास मदत होते. या उद्योगात विविध प्रकारच्या वस्तू निर्माण केल्या जातात. त्यामुळे अनेक वस्तूंची खरेदी एकाच छताखाली शक्य होते.

ग्रामीण भागाचा समतोल विकास करण्यासाठी या उद्योगांचे योगदान जास्त आहे. हे उद्योग शहरात केंद्रीत न होता ग्रामीण भागात केंद्रीत होत असल्यामुळे शहरीकरणाचे वाढते दुष्परिणाम टाळता येतात व ग्रामीण भागाचे अस्तित्व निर्माण होते. पशुपालन, कुक्कुटपालन, मासेमारी, फळ प्रक्रिया इत्यादी उद्योगासाठी अल्प प्रमाणात तांत्रिक ज्ञान लागते. त्यामुळे उत्पादकास तांत्रिक ज्ञानाची आयात करावी लागत नाही. या उद्योगांचे स्वरूप लहान असल्याने ते अल्पशा जागेत सुरू करता येतात. त्यामुळे उत्पादकास स्थीर घटकावर जास्तीचा खर्च करावा लागत नाही.

आपल्या शेतात नैसर्गिक साधन संपत्ती विपूल प्रमाणात असून तिचा पर्याप्त वापर होण्यासाठी शेती आधारित उद्योग महत्त्वाचे ठरतात. या उद्योगात औषधी वस्तूंचे उत्पादन होत असल्याने डोंगराळ व दुर्गम भागात वास्तव्य असलेल्या आदिवासी समाजाच्या विकासास मदत होते. देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी व ग्रामीण क्षेत्राचे उत्पन्न वाढविण्यासाठी या उद्योगांचे महत्त्व जास्त आहे. या उद्योगांच्या विकासामुळे लोकांना वाढत्या प्रमाणात रोजगार मिळत असून त्यांचे उत्पन्न वाढत आहे. त्यामुळे त्यांची ग्रामीण बचत वाढत जाऊन भांडवल निर्मितीस हातभार लागत आहे.

ग्रामीण भागात शेतीआधारित उद्योगांच्या विकासामुळे सामाजिक व आर्थिक सुविधांचा विकास होतो. तसेच साठागृहे, बाजारपेठा यांच्या विकासासाठी, निर्यात वृद्धी व सहकाराच्या विकास आणि ग्रामीण उपक्रमशीलतेसाठी या उद्योगांचे महत्त्व जास्त आहे. शेती आधारित उद्योग हे अधिक प्रक्रियाक्षम बनण्यासाठी व ग्रामीण

विकासास चालना मिळण्यासाठी सर्व पातळीवरून प्रयत्न झाल्यास हे उद्योग देशाच्या आर्थिक विकासाचे केंद्रबिंदू ठरतील.

**शेती आधारित उद्योगांच्या समस्या:**

१)या उद्योगांना भांडवलाच्या तुटवड्यामुळे अनेक प्रश्नास तोंड द्यावे लागते. २)कच्चामालाची कमतरता असल्याने उद्योगांच्या विकासात अडचणी येतात. ३)भारनियमनामुळे या उद्योगांचा उत्पादन खर्च वाढत आहे. ४)विक्रीव्यवस्थेत अनेक दोष असल्याने या उद्योगांना चांगले उत्पन्न मिळत नाही. ५)वाहतूक दळणवळणाच्या सोयींचा अभाव असल्यामुळे या उद्योगातील वस्तूंचा बाजारपेठेत होणारा पुरवठा वेळेत होत नाही.

६)शिक्षण-प्रशिक्षण सुविधांच्या अभावामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढविण्यात अनेक अडचणी येतात. ७)वाढत्या स्पर्धेमुळे या उद्योगांच्या खर्चात वाढ होत आहे. ८)लोकांच्या आवडी-निवडी नुसार उत्पादन करणे अशक्य होत आहे. ९)या उद्योगातील वस्तूंच्या किंमतीचा प्रश्न जटील झाला आहे. १०)सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे हे उद्योग मेटाकुटीस आले आहेत.

**उपाय योजना:**

१)या उद्योगांच्या विकासाकरिता बँकांनी अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करावा.

२)देशातील सिंचनव्यवस्था सुधारणे व वाढविणे आवश्यक आहे.

३)भारनियमन पद्धत बंद करण्यात यावी.

४)साठागृहे व गुदाम व्यवस्था सुधारणे या उद्योगांच्या विकासासाठी आवश्यक आहे.

५)नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढवावी.

६)वाहतूक-दळणवळण सुविधा गुणवत्ताधारक व आवश्यक इतकी असणे आवश्यक आहे.

७)निर्यातवृद्धीसाठी सरकारने निर्यात कर रद्द करून निर्यातीवरील बंधने दूर करावीत.

८)शेती आधारित उद्योगांच्या विकासाकरिता प्रशिक्षण व संशोधन सुविधा उपलब्ध करावी.

९)या उद्योगांना आधुनिक साधनांची खरेदी करण्यासाठी सरकारने कर्जपुरवठा करावा.

१०)या उद्योगांच्या विकासाकरिता सरकारने अनुदान द्यावे.

सरकारने वरीलप्रमाणे उपाय योजल्यास या उद्योगांच्या विकासास मदत होईल. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडी सुधारली तर ग्रामीण भागात सुधारणा होतील म्हणून ग्रामीण भागात चालणारे शेती आधारित उद्योग हे ग्रामीण विकासाचे आधारस्तंभ आहेत. याचा सर्वपातळीवरून विचार होणे आवश्यक वाटते.

**संदर्भसूची:**

१) अग्रवाल ए. एन., *भारतीय अर्थव्यवस्था,* विश्व पब्लिकेशन, दिल्ली.

२) चव्हाण एन्. एल्., *भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास,* प्रशांत पब्लिकेशन जळगाव.

३) देसाई-भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था,* निराली प्रकाशन, पुणे.

४) कविमंडन विजय, *कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र,* मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) रूदर दत्त-सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था,* एस. चाँद, नवी दिल्ली.

६) शिवार्थ, जानेवारी,२००९

७) अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर २०१५

८) पुढारी, २/१/२०१६

९) विविध संकेतस्थळे.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र पहिले

## नामदार गोपाल कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार

सत्राध्यक्षः रामहरी दातीर, नाशिक
भ्रमणध्वनी: ९४२०६९२१११
सूत्रसंचालकः हरिहर तिवारी, शेंदूरजना
भ्रमणध्वनी: ९५२७९७६७४१
वृत्तसंकलकः विठ्ठल मा. घिनमिने, वडनेर, जिल्हा वर्धा
भ्रमणध्वनी: ९६८९६४२४४९

नामदार गोपालकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार या विषयावरील एकूण १६ संशोधकांनी आपले शोधनिबंधाचे वाचन केले.

१) डॉ. ज. फा. पाटील यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये नामदार गोपालकृष्ण गोखले एक अतुलनीय व्यक्तिमत्त्व, भाषणशैली आणि प्रखर राष्ट्रवादाची भूमिका असणारे देशभक्त होते आणि भारतात एकही अर्थशास्त्रज्ञ त्यांच्या तोडीचा नाही असे शोधनिबंधातून मांडले.

२) डॉ. एन. एन. पवार यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये नामदार गोपालकृष्ण गोखले हे प्रगतीशिल कर प्रणालीचे पुरस्कर्ते होते. लोकांना गरीबीतून मुक्त करण्यासाठी कराचा बोजा कमी करावा असे मत होते असे प्रतिपादन केले.

३) डॉ. हिरालाल वामन चव्हाण यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देणे तसेच लोकशिक्षणाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती निर्माण आवश्यक आहेत असे प्रतिपादन केले.

४) डॉ. ज्योतीराम घाडगे यांनी गोपालकृष्ण गोखले यांनी शेती विकास जलसंसाधने व शेतसारा गोळा करतांना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची विचार करणे आवश्यक असते, असे मत मांडले.

५) डॉ. मनिषा हिंदराव पाटील यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून आरोग्य व शिक्षणावर खर्च वाढविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

६) डॉ. मोहन किसनराव चौधरी यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये महिलांचे सबलीकरण करणे कुटुंबाच्या हितासाठी आवश्यक आहे, देशाच्या विकासात महिलांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे असे प्रतिपादन केले.

७) अर्पणा दत्तात्रय कुलकर्णी यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये नामदार गोपाल कृष्ण गोखले यांनी आयुष्यभर तत्त्वाचा अभ्यास करून पावित्र्य आदर्श, राजकीय व सामाजिक बांधीलकी जपली अशा शब्दात शोधनिबंध प्रस्तुत केला.

८) डॉ. प्रशांत हरमकर यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये ब्रिटीशांची शोषणाची राजस्व नीती, मिठावरील व अबकारी कर कमी करावे, कर्जबाजारीपणाचे खरे कारण वाढता कर होय असे प्रतिपादन केले.

९) डॉ. प्रतिभा काळमेघ यांनी मुक्त व्यापार विनिमय दर, अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबींवर प्रकाश टाकला.

१०) प्रा. नागेश सुर्यवंशी यांनी लष्करावर होणारा खर्च कमी करून त्या ऐवजी तांत्रिक व्यावसायिक शिक्षणावरील खर्च वाढवावा. सार्वजनिक खर्चात वाढ करणे शिल्लकी अंदाजपत्रक हे आर्थिक विकासाला मारक असते इत्यादी बाबी प्रकर्षाने मांडल्या.

११) डॉ. राजन तुंगारे यांनी गोखले हे कामगाराच्या भल्यासाठी झटणारे कामगार नेते होते आर्थिक विकासासाठी शुद्ध पाणी सांडपाण्याची व्यवस्था जलसिंचनाच्या विविध योजनाची आवश्यकता इत्यादी बाबींचा विचार शोधनिबंधामध्ये केला.

१२) प्रा. जयवंत भदाणे यांनी नामदार गोखले यांनी स्वदेशी वस्तूचा वापर देशी बाल उद्योगांना संरक्षण, स्थानिकांचे शोषण इत्यादी मुद्द्यांवर विशेष करून प्रकाश टाकला.

१३) प्रा. मधुकर वेदपाठक यांनी केंद्र राज्य व स्थानिक सरकारमध्ये उत्पन्नाची विभागणी औद्योगिक व तंत्रशिक्षणावर भर इत्यादी विचार प्रकर्षाने मांडले.

१४) डॉ. संजय तुपे यांनी शोधनिबंधामध्ये अतिरिक्त नोकरी भरतीमुळे अतिरिक्त खर्च वाढतो, गरीबी दूर करणे हे सरकारचे कर्तव्य असून शासनाचा सहभाग लोकजीवनात महत्त्वाचा असतो असे प्रतिपादन केले.

१५) डॉ. मंजुषा मुसमाडे यांनी आपल्या संशोधन निबंधामध्ये गोपाल कृष्ण गोखले यांचे प्रबोधनात्मक योगदान यावर अतिशय समर्पक भाष्य केले. शिक्षण हे दारिद्र्य कमी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतील असे प्रतिपादन केले.

१६) डॉ. वाय. डी. पुजारी यांनी वस्तूचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. शिलकी अंदाज पत्रक धोक्याचे असल्याचे नमूद केले.

याशिवाय प्राचार्य जे. एस. पाटील, प्राचार्या डॉ. मृणालिनी फडणविस यांनी गोपाल कृष्ण गोखले यांच्या विचारांची आवश्यकता वर्तमान काळात असल्याचे प्रतिपादन केले.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र तिसरे

## महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रृती

सत्राध्यक्षः डॉ. रूपा शहा, कोल्हापूर

भ्रमणध्वनी: ९४२२०४३३९९

सूत्रसंचालकः डॉ.जयश्री उपाध्ये,

वृत्तसंकलकः डॉ.विद्या राजेंद्र पाटील, धुळे.

भ्रमणध्वनी: ९४२१५३५१२०

आज सर्वच क्षेत्रात महिलांनी पदार्पण केलेले आहे. नव्हे तर त्या त्या क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत मात्र महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. स्त्रीयांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण कायम राहिला, तो मात्र बदलला नाही. या सर्वांचा अंतर्मुख होऊन विचार करताना जाणवते की स्त्रीयांचे सक्षमीकरण करावयाचे असेल तर त्यांचा मूळ पाया असलेली विचारसरणी बदलणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाच्या योजना व त्याची फलश्रृती या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

या चर्चासत्रासाठी एकुण ३४ शोधनिबंध लेखकांनी अधिवेशनात पाठविले. त्यापैकी प्रत्यक्ष १८ शोधनिबंध सादर करण्यात आले.

डॉ. राहुल म्होपरे, डॉ.भाऊसाहेब देशमुख, मोहन शिंदे या लेखकांनी शासकीय योजनांचा महिला सबलीकरणातील सहभाग या विषयी विचार मांडले. डॉ. राहुल म्होपरे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमाचा अभ्यास केला. बचत गट चळवळीतून महिलांचे सबलीकरण होत असल्याचे विचार प्रा.मोहन शिंदे व प्राचार्य आबासाहेब कल्याणकर यांनी मांडले. महिला सबलीकरणावर सामाजिक व आर्थिक घटकांचा प्रभाव पडतो असे मत डॉ. विलास खंदारे, डॉ.डी.बी. खरात, डॉ.संजय कोठारी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाने १९९४,२००१ व मार्च २०१४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या धोरणांची चर्चा डॉ. शशिकांत गाडगीळ, डॉ.सुनिता राठोड व प्रा.मनिषा खुरवड यांनी केली. या धोरणांपुढे विविध आव्हाने आहेत असे या लेखकांना वाटते. महिला सक्षमीकरणात सामाजिक विरोध, मानसिकता, दारिद्र्य, शैक्षणिक

भेदभाव इ. अडचणी असल्याचा विचार प्रा.सुभाष गुर्जर यांनी मांडला. महाराष्ट्रातील अनुसुचित जाती-जमातीतील महिलांचे सक्षमीकरण करणे हे एक मोठे आव्हान असल्याचे मत डॉ.सुरेंद्र डावरे, कु.धनश्री आंबेकर, डॉ.सुभाष पाटील यांनी व्यक्त केले. डॉ.दिपक भुसारे यांनी असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्रात महिला धोरणे असूनही महिलांवरील अत्याचार कमी झालेले नाहीत. यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. प्रा.विजय खडके, व प्रा.संदीप इरोले यांच्या मते स्त्रीभ्रुण हत्या हा महिला सबलीकरणातील मोठा अडथळा आहे. महिला सबलीकरणात सुक्ष्म उपक्रमांची भूमिका महत्वाची असल्याचा विचार कुंडलिक चौगुले यांनी मांडला. शेती क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे सबलीकरणासाठी विविध उपाय ज्योती साठे, डॉ.सुभाष पाटील, प्रा.जी.के. सानप, डॉ.आर.जी.रसाळ या लेखकांनी सुचविले. प्रा.सानप व डॉ.रसाळ यांनी मनरेगाची भूमिका मांडली. डॉ.एम.यु.मुलाणी यांनी भिमथडी जत्रा या विपणन उपक्रमातुन बारामतीतील ४५० बचतगट सक्षम झाल्याचे मत मांडले. डॉ.सुरेश घुमटकर, डॉ. स्नेहा देशपांडे, डॉ. पी. एम. कल्याणकर, डॉ.पुष्पा इंदुरकर, डॉ.कुमुदीनी जोगी यांनी चर्चेत सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.रुपा शहा, सूत्र संचालक म्हणून डॉ.जयश्री उपाध्ये यांनी काम पाहिले.

## उपक्रम थोडक्यात
### मराठी अर्थशास्त्र परिषद
### पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान

भुसावळ येथील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालय व मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान १० मार्च २०१६ रोजी भुसावळ येथील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात संपन्न झाले. प्रमुख वक्ते माजी प्राचार्य प्रा.आर.डी.राणे यांनी या प्रसंगी भारतीय जनतेच्या उत्पन्नातील असमानता या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीराम जोशी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.आर. पी. फालक, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम, डॉ.अशोक खाचणे आदि उपस्थित होते.

आर्थिक विषमतेच्या संकल्पनेशी उत्पन्न, संपत्ती, उपभोग या तीनही गोष्टी जुळलेल्या आहेत. प्रत्येक देशात, समाजात आर्थिक विषमता आहे. जर आर्थिक विषमता नसती तर उत्पादकतेचे धोके कुणीच पत्करले नसते असे विचार प्रा.आर.डी.राणे यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ.श्रीराम जोशी यांनी भारतीय व जागतिक आर्थिक विषमतेबाबत विचार व्यक्त केले. जागतिकीकरणाने गरीब-श्रीमंतातील दरी वाढल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.आर. पी. फालक यांनी केले. डॉ.अविनाश निकम यांनी परिषदेची कार्यक्रमामागील भूमिका विशद केली. प्रास्ताविक कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ.जयश्री सरोदे, सूत्र संचालन प्रा.दयाघन राणे तर आभार प्रदर्शन डॉ. आर. एम.सरोदे यांनी केले. व्याख्यानास परिसरातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन : २०१५-१६
# कार्यवाहांचा अहवाल

**डॉ. आर. बी. भांडवलकर**, यवतमाळ,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन सोमवार दिनांक १६ नोव्हेंबर ते बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०१५ या तीन दिवसांच्या कालावधीत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. प्रा.डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर जि. अहमदनगर हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्‌घाटन सोहळा:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३९ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्‌घाटन सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०१५ रोजी बारामती या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या सर्वात जुन्या व नामांकित अशा अनेकांत एज्युकेशन सोसायटी संचलित तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीच्या जीवराज सभागृहामध्ये प्रतिमा पूजन आणि दिप प्रज्वलनाने झाले. उद्‌घाटक म्हणून मा. जवाहर शहा वाघोलीकर उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, संस्थेचे पदाधिकारी विकास शहा लेंगरेकर, अरहतदास शहा सराफ, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, अर्थसंवादाचे मुख्य संपादक डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर.बी. भांडवलकर, स्थानिक कार्याध्यक्ष व प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. मारोती कोकरे, डॉ. रंजना नेमाडे आणि स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे उपस्थित होते. उद्‌घाटन समारंभानिमित्त स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी व्यक्त केले. त्यानंतर स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे यांनी अधिवेशन आयोजनामागील भूमिका आणि महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागासंबंधी माहिती प्रास्ताविकातून दिली. उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले. तसेच अधिवेशनाचे निमित्ताने काढण्यात आलेल्या अर्थमती या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या

हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. एम. यु. मुलाणी लिखित 'इंडियन अॅन्ड ग्लोबल इकॉनॉमिक्स' डॉ. सुहास आव्हाड लिखित 'वृद्धी आणि विकासाचे अर्थशास्त्र' तसेच प्रा. डॉ. जे. एस. पाटील व प्रा. डॉ. जे.एफ. पाटील लिखित 'महात्मा गांधीचे आर्थिक विचार व सद्यस्थिती' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांचे उपस्थित करण्यात आले.

परिषदेच्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटक जवाहर शहा वाघोलीकर यांनी संस्थेच्या विकासाबाबत माहिती देऊन सदर संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असून ग्रामीण भागातील पहिले महाविद्यालय आदर्श करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. त्यांनी परिषदेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी परिषदेच्याच विविध उपक्रमाची आणि कार्याची माहिती दिली. तसेच परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले यांनी मनोगत व्यक्त केले. ३९व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड संगमनेर यांचे स्वांतत्र्योत्तर भारतातील विदेशी गुंतवणूक या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण झाले. त्यांनी कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत विदेशी भांडवलाची भूमिका विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर महत्वपूर्ण असते. विकसित देशात विकासाचे सातत्य टिकविण्यासाठी आणि टिकावू विकासासाठी विदेशी भांडवल आवश्यक असते. विकसनशील देशात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीची भूमिका विशद करतांना भारतातील थेट परकिय गुंतवणूक, भारतातील विदेशी गुंतवणुकीचे वर्गीकरण, भारतातील विभागनिहाय प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे अंतःप्रवाह, भारतात गुंतवणूक करणारे प्रमुख देश, भारतात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झालेली प्रमुख क्षेत्र व त्याचे प्राधान्यक्रम इत्यादी माहिती देतांना महाराष्ट्रातील विदेशी गुंतवणुकीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला. भारतातील किरकोळ व्यापारातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणि त्या बाबतचे आक्षेप मुद्देसुद आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्रभावीपणे व्यक्त केले. उद्घाटन सोहळ्याचे आभारप्रदर्शन उपप्राचार्या डॉ. रंजना नेमाडे यांनी केले.

**चर्चासत्रे:**

सदर अधिवेशन कालावधीत दरवर्षी प्रमाणे एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. सोमवार दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी भोजनावकाशानंतर दुपारी गोपाळकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार या विषयावरील पहिल्या चर्चा सत्राचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. एच. आर. तिवारी, वृत्तसंकलक प्रा. व्ही. एम. धिनमिने आणि सत्राध्यक्ष म्हणून डॉ. आर. के. दातीर यांनी कामकाज पार पाडले. मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०१५ रोजी दुसरे सत्र जवाहरलाल नेहरू आणि आर्थिक नियोजन या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालन डॉ. आर. जी. कोल्हे, वृत्तसंकलन डॉ. संतोष कुटे आणि सत्राध्यक्ष म्हणून डॉ. आर. जी. रसाळ यांनी जबाबदारी पार पाडली. त्याच दिवशी तिसरे समांतर सत्र महिला सबलिकरणाच्या योजना व त्याची फलश्रृती संपन्न झाले. सदर सत्राचे सूत्रसंचालन डॉ. जयश्री उपाध्ये, वृत्तसंकलक डॉ. विद्या पाटील तर सत्राध्यक्ष म्हणून डॉ. रूपा शहा यांनी जबाबदारी पार पाडली. दि. १८ नोव्हेंबर २०१५ रोजी चवथ्या ऐनवेळीच्या महाराष्ट्रातील नागरीकरणापुढील नवी आव्हाने या

विषयावरील चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. संजय इंगळे, वृत्तसंकलन डॉ. जयवंत भदाणे आणि सभाध्यक्ष डॉ. एस. वाय. पाटील यांनी जबाबदारी पार पाडली.

या तीनही दिवसाच्या चार सत्रांमध्ये परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम आणि कार्यवाह-खजिनदार डॉ. आर.बी. भांडवलकर उपस्थित होते.

**प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यान:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी.वि.सोवनी स्मृती व्याख्यान या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये सहावे पुष्प माजी विधानपरिषद सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी गुंफले. रशियातील संक्रमण! उध्वस्त समाजवादाकडून अज्ञात भांडवलवादाकडे हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. सदर व्याख्यानाचे अध्यक्ष ३९ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड होते. यावेळी कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. संतोष दास्ताने, कार्यवाह डॉ. आर. बी. भांडवलकर, अर्थसंवादचे संपादक डॉ.अविनाश निकम, उपप्राचार्य डॉ.मारोती कोकरे, स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे प्रामुख्याने उपस्थित हाते. प्रमुख वक्त्याचा परिचय डॉ.संतोष दास्ताने यांनी करून दिला. तर व्याख्यानमालेचे संचालन डॉ. आर. बी. भांडवलकर व आभार प्रदर्शन डॉ. अविनाश निकम यांनी केले. व्याख्यानमालेचे प्रास्ताविक करतांना प्रा. चारूदत्त गोखले यांनी सदर व्याख्यान सुरू करण्यामध्ये डॉ. दि. व्यं. जहागिरदार आणि डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार यांच्या योगदानासह आपणा सर्वांच्या सहकार्याने ही व्याख्यानमाला नियमित सुरू असल्याचे सांगितले. प्रमुख वक्ते डॉ.अशोक मोडक यांनी सदर विषय भाषणाकरिता का निवडला हे सांगतांना विषयाचे औचित्य स्पष्ट केले. रशियाच्या संक्रमणाच्या २५ वर्षाच्या कालावधीतील आढावा घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रशियातील संक्रमणातील वैशिष्ट्ये सांगतांना ते ऐतिहासिक व अभूतपूर्व असून संक्रमण शांततेत आणि असामान्य असल्याचे म्हटले. रशियात झालेल्या शांततापूर्व बदल आणि आगळीवेगळी फलनिष्पत्ती विशद करतांना रशियन संक्रमणाचे श्रेय बोरीस येल्तसिन आणि व्लादिमीर पुतीन या दोघांनाच जात असल्याचे सांगितले. येल्तसिन यांचे आर्थिक धोरण : स्वरूप व परिणती आणि पुतीने यांचा उर्जा राष्ट्रवाद यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले. शासन नियंत्रित भांडवलशाही सोबतच अमेरिकेवर कुरघोडी पुतीन शासनाची राजवट आपल्या प्रभावी भाषणातून प्रकट केली.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा):**

३९ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०१५ रोजी सायंकाळी ६:०० वाजता परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरूवातीला महामहिम माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. व्यं. सु. पाटणकर, कॉ. गोविंदराव पानसरे, डॉ. एम. बी. तनपूर, डॉ. कलबुर्गी आणि ज्ञात, अज्ञात दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वसाधारण सभेतील काही महत्वाचे निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

ऑक्टोंबर-नोव्हेंबर २०१६ मध्ये होणाऱ्या ४० वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी १) कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढाव श्रीमान पी.एच.जैन विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय चांदवड जि. नाशिक, २) कन्या महाविद्यालय मीरज जि. सांगली व ३) स्व.कल्पना चावला महिला वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय गंगाखेड जि. परभणी येथील प्रस्ताव असल्याचे कार्यवाह यांनी सभेला सांगितल्यानंतर त्यावर पदाधिकाऱ्यांनी सदर महाविद्यालयास भेट देऊन स्थान निश्चित करावे, परंतु पहिल्यांदा चांदवड येथील ठिकाणाचा विचार करावा असे ठरले. ४० व्या वार्षिक अधिवेशनात चर्चेकरीता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१. प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार

२. आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती

३. महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्या संदर्भात शासनाची भूमिका

**निवडणूक:**

४० व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. शिवाजी भोसले, सातारा यांची बहुमताने निवड झाली. विश्वस्त डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, अमरावती यांची मुदत दि. ३१/३/२०१६ रोजी पूर्ण होत असल्यामुळे आणि कार्यकारी मंडळाने डॉ. बी. के. शिंदे यांच्या नावाची शिफारस सर्वसाधारण सभेस केल्यामुळे चर्चेअंती सन २०१६-२०१९ या तीन वर्षासाठी डॉ.बी.के. शिंदे, परभणी यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. सन २०१६-२०१९ या तीन वर्षाकरीता कार्यकारी मंडळावर डॉ. जीवन सोळंके, नाशिक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. वामन सावंत, रत्नागिरी, मुंबई विद्यापिठ, मुंबई, डॉ. दिनकर मोरे, इस्लामपूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची निवड झाली.

**डॉ.श्री.आ. देशपांडे स्मृती जीवनगौरव पुरस्कार:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ सन २०१२ पासून सुरू जीवराज सभागृहात अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष व परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड होते. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक कार्यवाह-खजिनदार डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी केले. डॉ. श्री. आर. देशपांडे यांच्या जीवनकार्याबाबत डॉ. अंजली कुलकर्णी, नागपूर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.श्री. आ. देशपांडे जीवनगौरव पुरस्काराचे चवथे मानकरी विदर्भातील प्रसिद्ध अर्थशास्त्र लेखक डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांचा परिचय डॉ. के. के. पाटील, परभणी यांनी तर कार्यगौरव डॉ. ज.फा. पाटील, कोल्हापूर यांनी प्रभावीपणे करून दिला. डॉ. मंजूषा मुसमाडे (पुणे) यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांना सपत्नीक शाल, श्रीफळ, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर सत्कारमूर्ती व जीवनगौरव पुरस्कार प्राप्त डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांनी परिषदेतील कार्याच्या जुन्या आठवणी सांगतांना परिषदेच्या या वैभवशाली पालखीचा मी वारकरी आहे परिषदेने आणि अर्थशास्त्र परिवाराने जहागिरदार कुटुंबाला भरभरून प्रेम दिले आहे. यावेळी त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. त्यानंतर पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष डॉ.

सुहास आव्हाड यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी प्रामुख्याने महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मारोती कोकरे व डॉ. रंजना नेमाडे, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे उपस्थित होते. सदर पुरस्कार वितरण सोहळ्याचे संचालन डॉ. वनिता चोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रतिभा काळमेघ (चौधरी) यांनी केले.

**समारोप सोहळा:**

समारोप सोहळ्याच्या सुरूवातीला परिषदेचे आजीव सदस्य डॉ. सर्वोत्तम कुलकर्णी, नाशिक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी ११:३० वाजता समारोप सोहळ्याचे अध्यक्ष मिलिंदकुमार शहा होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मा. राजलक्ष्मी भोसले, माजी महापौर पुणे, परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, नवनियुक्त अध्यक्ष डॉ. शिवाजी भोसले, उपप्राचार्य डॉ. मारोती कोकरे व डॉ. रंजना नेमाडे, कार्यवाह डॉ. आर.बी. भांडवलकर, स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे, कार्यकारिणी सदस्य, नवनियुक्त कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. रामभाऊ खाडे यांनी केले. यावेळी अधिवेशन आयोजनाचा आढावा प्रतिनिधींनी प्रतिनिधीक स्वरूपात घेण्यात आला. प्रमुख अतिथी श्रीमती राजलक्ष्मी भोसले यांनी अर्थशास्त्र हा विषय किती महत्त्वाचा आहे याचा अनुभव महापौर म्हणून काम करतांना अर्थसंकल्पाचे वेळी अनुभवला आहे. त्यांनी बचतगट ही समाजाची चळवळ व्हावी तर महिलांचे सक्षमीकरण घडून येईल. त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेला भविष्यात माझे सहकार्य राहिल असे मत व्यक्त केले. यावेळी परिषदेच्या वतीने विविध उपक्रमांतर्गत बक्षीस व पारितोषिके देण्यात आली. मिलींदकुमार शहा यांनी संस्थेला अधिवेशन घेण्याची संधी ही आमच्या संस्थेच्या वैभवात भर घालणारी ठरली आहे. त्यांनी अर्थशास्त्र अभ्यासकांकडून स्थानिक समस्या आणि शेतीच्या संदर्भातील प्रश्नांचा अभ्यास करून शासनाला अहवाल द्यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड यांनी अध्यक्षीय कारकीर्दीचा आढावा घेऊन सर्व सदस्यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्या बाबत आभार व्यक्त केले. यावेळी नवनियुक्त अध्यक्ष डॉ. शिवाजी भोसले यांचा सत्कार डॉ. सुहास आव्हाड यांचे हस्ते करण्यात आला. तसेच अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाबाबत संस्थेचे उपप्राचार्य डॉ. मारोती कोकरे व डॉ. रंजना नेमाडे तसेच स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे यांचा परिषदेच्या वतीने सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित माजी अध्यक्ष डॉ. अनिल पडोशी, डॉ. श्रीराम जोशी, डॉ. ज.फा. पाटील, डॉ. मधुकर शिंदे, डॉ. जे. एस. पाटील, डॉ. दिलीप कदम, डॉ. दि.व्यं. जहागिरदार आणि डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

**परिषदेच्या वतीने विविध पारितोषिकांचे वितरण:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे हस्ते करण्यात आले.

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र), डॉ. एम.यु. मुलाणी यांच्या 'भारतातील आधुनिक वित्तीय व्यवस्था' या ग्रंथास देण्यात आले.

(२) प्रा.मो.स.भावे पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल प्रा. वाल्मिक दगडू परहर यांच्या 'महाराष्ट्रातील दारिद्र्य : एक अभ्यास' या लेखाला देण्यात आले.

(३) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. रूपा शहा, कोल्हापूर यांच्या 'सहकार' या ग्रंथास देण्यात आले.

(४) प्रा.सौ. अरूणा रारावीकर वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. कृष्णा शहादे यांच्या 'कांदा किंमतीचे दुष्टचक्र एक आव्हान' तर द्वितीय पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) डॉ. संतोष कदम यांच्या 'शिवाजी महाराजांचे कर विषयक धोरण' या लेखाला देण्यात आले.

(५) स्व.प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आलेले अमोल सुधाकरराव चौधरी वरूड जि. अमरावती यांना (रु. ५००/- व सन्मानपत्र) जाहीर करण्यात आले.

अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके-

१) कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु. १०००/-) सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ.मंजुषा मुसमाडे, पुणे यांच्या 'स्वातंत्र्यपूर्व प्रबोधन काळातील गोपाळकृष्ण गोखले यांच्या योगदानाचा अभ्यास' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

२) प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ.अमर्त्य सेन पारितोषिक (रु.५००/-) सर्वोत्कृष्ट शोधनिबंध पारितोषिक प्रा. मनिषा अनिरूद्ध खुटवड यांच्या 'महिला धोरणाची फलश्रृती' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

३) डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/-)सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध (विद्यार्थ्यांकरीता) डॉ.सोनल जनबंधू यांच्या 'भारतीय नियोजनात औद्योगिक विकासाबाबत नेहरूचे योगदान' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

४) पद्मजा गंधे पारितोषिक (रु.१०००/-) सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंध (महिलाकरिता) डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या 'भारतीय आर्थिक नियोजन आणि पंडित नेहरूच्या विचाराचा प्रभाव' या विषयावरील शोध निबंधास देण्यात आले.

**ऋणनिर्देश:**

१) तज्ज्ञ परिक्षक : डॉ. के.बी. शेजुळ, महाड, प्रा. मो.स. भावे, जळगांव, डॉ. भगवान खेडकर, नाशिक, प्रा. निवृत्ती पिस्तुलकर, आर्णी, डॉ. मधू साटम, पुणे, डॉ. निवृत्ती मुंडे, लोहा, डॉ. सुधाकर पगार, नाशिक, डॉ. आर.जी. रसाळ, लोणी, डॉ. गौरव शिखरे, कल्याण, डॉ. एस. डब्ल्यु, मिसाळ, भोर यांनी पुरस्कार व पारितोषिक निवड करीता तज्ज्ञ परिक्षक म्हणून सहकार्य केल्याबद्दल आभार!

२) सूत्रसंचालक व वृत्तसंकलक :

पहिले सत्र : गोपाळकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार, सत्राध्यक्ष डॉ. आर. के. दातीर, नाशिक, सूत्रसंचालक प्राचार्य डॉ. एच. आर. तिवारी, शेंदूरजना (आढाव), वृत्तसंचालक प्रा. विठ्ठल

धिनमिने, वडनेर.

दुसरे सत्र : पं. जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन, सत्राध्यक्ष डॉ. आर. जी.रसाळ, लोणी, सूत्रसंचालक डॉ. संतोष कुटे, मेहकर, वृत्तसंकलक डॉ. आर. जी. कोल्हे.

तिसरे सत्र : महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरणाच्या योजना आणि त्याची फलश्रुती, सत्राध्यक्ष डॉ. रूपा शहा, कोल्हापूर, सूत्रसंचालक डॉ. जयश्री उपाध्ये, पुणे वृत्तसंकलक डॉ. विद्या पाटील, धुळे

चवथे सत्र (ऐनवेळी) : महाराष्ट्रातील नागरीकरणा पुढील नवी आव्हाने, सत्राध्यक्ष प्रा.डॉ. एस. वाय. पाटील, जळगांव सूत्रसंचालक डॉ. संजय इंगळे, दौंड, वृत्तसंकलक डॉ. जयवंत भदाणे, नाशिक यांनी सहकार्य दिल्याबद्दल आभार !

**निवडणूक अधिकारी व सहकारी :**

डॉ. एम. यु. मुलाणी निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्यांना सहकार्य करणारे डॉ. के. के. पाटील, डॉ. भाऊसाहेब देशमुख, डॉ. राहुल म्होपरे, प्रा. सुभाष गुर्जर यांनी मानद सेवा देऊन निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडली त्याबद्दल आभार!

या शिवाय अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सर्व सन्माननीय संचालक व सदस्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. मारोती कोकरे, उपप्राचार्य डॉ. रंजना नेमाडे, स्थानिक कार्यवाह डॉ. रामभाऊ खाडे, डॉ. समाधान पाटील, प्रा. संदिप साबळे, प्रा. चंद्रकांत कांबळे, डॉ. राहूल धुमाळ, प्रा. कृष्णा कुलकर्णी, डॉ. मोहित राऊत, डॉ. ज्योतीराम घाडगे, प्रा. व्यंकट वडगांवे तसेच ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्या सर्वांचे परिषदेच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. हे कार्य करीत असतांना कोणी अनवधानाने दुखावले गेले असल्यास त्यांच्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करून सहकार्याची अपेक्षा करतो. अशा प्रकारे परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन बारामती जि. पुणे येथे सर्वार्थाने डॉ. सुहास आव्हाड यांचे अध्यक्षतेत संपन्न झाले.

---

अर्थसंवाद

अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

***अर्थसंवादचा एप्रिल-जून २०१६*** हा अंक **अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांक** प्रकाशित होणार आहे, याची कृपया सदस्य व वाचकांनी नोंद घ्यावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल

## २०१५-१६ (खंड ३९, अंक १ ते ४)

**अविनाश रामलाल निकम**
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या *अर्थसंवाद* त्रैमासिकाचा २०१५-१६ या वर्षाचा ३९ व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा पाचवा अहवाल. अर्थसंवादचे ३९ खंड अखंडपणे प्रकाशित झाले. सन २०१५-१६ या वर्षात अर्थसंवादचे चार अंक प्रकाशित झाले. अर्थसंवाद ISSN व Registration Number प्राप्त जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीतील प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिक ठरले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळेच परिषदेला हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने अनुदान मंजूर करुन मोलाचे सहकार्य दिले,त्याबद्दल मी या संस्थेचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन २०१५-१६ च्या एकोणचाळीसव्या खंडात स्वतंत्र लेख, ग्रंथ परीक्षण, परिषदेच्या ३९ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा वृत्तांत, प्रत्येक अंकात संपादकीय, पी.एच्.डी. प्रबंधाचा गोषवारा, अर्थ शब्दांची वाट पाहे, अध्यक्षीय भाषण, अर्थसंवाद २०१५-१६ चा अहवाल, ३९ व्या राष्ट्रीय अधिवेनातील सत्रांचा अहवाल अशा विविधांगी मजकुराचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१५-१६ या वर्षात प्रकाशित झालेल्या चारही अंकांची मिळून अनुक्रमणिकेसह एकूण ४५२ पाने झाली. वर्षभरात ज्या ज्या लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले त्या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व माजी संपादकांनी आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही निर्णय घेतले. त्यानंतर बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोणत्याही लेखकाचे एकापेक्षा जास्त लेख गेल्या चार वर्षाप्रमाणेच या वर्षातसुध्दा अर्थसंवादमध्ये समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे अर्थसंवादच्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३६ व्या खंडात होता ३७ व्या खंडात नवीन उच्चांक आपण गाठू शकलो आहोत. ३८ व ३९ व्या खंडात जास्तीत जास्त सभासदांना अर्थसंवादचे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह

शोधनिबंधाच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने समाधानकारक संख्येने लेख देऊन अंकाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न देखील केला आहे. तसेच काही आर्थिक विषयांचे स्पष्टीकरणासाठी जास्त पृष्ठांची आवश्यकता लक्षात घेता या वर्षी त्यांना जास्त पृष्ठे उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे लेख व लेखक संख्येवर या वर्षी नियंत्रण आले आहे.

२) शहरी भागातील लेखकांबरोबरच ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण लिहिणाऱ्या लेखकांना तितकीच संधी अर्थसंवादच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

३) प्रस्थापित लेखकांबरोबरच नवीन लेखकांना अधिक संधी देण्याचा प्रयत्न करताना महाराष्ट्राच्या सर्व भागातील, अगदी काना-कोपऱ्यातील लेखकांना अर्थसंवादच्या लेखकसूचीमध्ये आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

४) अर्थसंवादच्या माध्यमातून अर्थशास्त्रीय लेखन करणाऱ्या नवीन लेखकांची एक पिढी महाराष्ट्रातील इतर दैनिके, मासिके, साप्ताहिके, जर्नल्स यामध्ये लिहिण्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने द्यावी यासाठी प्रयत्न केला.

५) अर्थसंवादचा प्रत्येक अंक उत्तरोत्तर उत्तम यावा, सुबक यावा यासाठी सातत्याने गुणवत्तावाढीचे प्रयत्न केले, प्रयत्न करणे सुरूच आहे.

६) गेल्या ४ वर्षांप्रमाणे या वर्षीसुध्दा प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, मुखपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पृष्ठे असे एकूण चार पृष्ठे रंगीत दिली आहेत.

७) मुखपृष्ठ व आतील पृष्ठांचा किफायतशीर खर्चात अधिकाधिक उत्तम दर्जा उपलब्ध करून देता यावा यासाठी प्रयत्न केले आहेत.

८) ज्या ज्या सन्माननीय आजीव सदस्यांना अर्थसंवादमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्याची इच्छा आहे, ज्यांनी योग्य त्या फॉण्टमध्ये गुणवत्तेचा शोधनिबंध पाठविला त्यांना अर्थसंवादमध्ये संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या ३६ वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक शोधनिबंध ३७ व्या खंडात प्रकाशित झाले आहेत. तर ३८ व्या तसेच ३९ व्या खंडातही समाधानकारक संख्येने लेख प्रकाशित केले आहेत.

९) ३९ व्या खंडात अर्थसंवादचा दोन विशेषांक प्रकाशित झाले. हे विशेषांक ग्रामीण अर्थव्यवस्था व शेतीआधारित उद्योग या विषयांवर आधारित होते. लेखकांनी या विशेषांकांना उत्तम प्रतिसाद दिला.

१०) अंकाचे पाकीट पूर्वी परंपरेने खाकी रंगाच्या कागदाचे होते. सन्माननीय सभासदांपर्यंत पोहोचेपर्यंत बऱ्याच वेळा ते फाटत असे. अंक सर्वांपर्यंत सुरक्षित पोहोचावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकाप्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट गेल्या ३ वर्षांप्रमाणे याही वर्षातील चारही अंकांसाठी आपण वापरले.

११) अंकास आपण मशीनवरील परफेक्ट बाइंडिंग गेल्या पाच वर्षांपासून देत आहोत. या बाइंडिंगमध्ये पीनचा वापर केला जात नाही.

१२) कागदाच्या किंमती गेल्या तीन-चार वर्षात

खूपच वाढल्या आहेत. अशा महागाईच्या काळात देखील जळगाव येथील सातपुडा ऑफसेट लाठी परिवाराच्या सहकार्याने किफायतशीर किमतीत अंक तयार केले आहेत.

१३) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी महाविद्यालय व ग्रंथालयाच्या वर्गणी वाढीचा प्रस्ताव सादर केला होता. *अर्थसंवादची वार्षिक वर्गणी आधीच्या रु.६००/- वरून रु.१०००/- करावी, पंचवार्षिक वर्गणी आधीच्या रु.१०००/- यात वाढ करून रु.१५००/- करावी, तसेच वार्षिक वर्गणी स्वीकारणे बंद करावे* या प्रस्तावाला आजीव सदस्यांनी गेल्या ३ वर्षापूर्वी एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे अर्थसंवादच्या चालू वर्षातील उत्पन्नात गेल्या ३ वर्षाप्रमाणे वाढ झाली आहे.

१४) अर्थसंवादच्या पृष्ठ संख्येचे नियोजन केल्याने सलग पाचव्या वर्षीदेखील सर्व अंकांमध्ये एकही पृष्ठ कोरे सोडलेले नाही.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अर्थसंवाद आपापल्या महाविद्यालयात घेतला जाईल याकडे परिषदेच्या सर्व सदस्यांनी लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सन्माननीय सभासदांनी आपापल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करुन दिल्यास अर्थसंवादची तूट कमी होण्यास निश्चितच मदत होईल. अर्थसंवाद त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाच्या सामान्यपणे १८४० प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वर्गणीदार यांच्या संख्येत सातत्याने वाढ होणे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे. चारही अंकांची अनुक्रमणिकेसह एकूण पृष्ठसंख्या ४५८ इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक सामान्यपणे ११२ पृष्ठांच्या जवळपास ठेवण्याची परंपरा कायम राखली आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अर्थसंवादला जाहिरात मिळण्यासाठी बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील स्थानिक कार्याध्यक्ष व प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ.एम. के. कोकटे, स्थानिक कार्यवाह प्रा. रामभाऊ खाडे यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळात विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींना जाहिरात पाठविण्याविषयी विनंती केली आहे. सन्माननीय सदस्य पुढील वर्षी प्रत्येकी एक जाहिरात देऊन सहकार्य करतील अशी अपेक्षा बाळगू या. ३९ व्या खंडातील चारही अंकांचा एकूण खर्च रु.३२४६२८/- इतका झाला. गेल्या दोन-तीन वर्षात कागदाच्या किमती खूपच वाढल्या आहेत. तरी देखील अर्थसंवादचा खर्च काटकसरीने केला आहे ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो. अर्थसंवादच्या खर्चात या वर्षी थोडी वाढ झाली आहे. त्याची कारणे- १) आजीव सदस्य संख्या वाढली आहे. त्यामुळे अंकांची संख्या वाढली. २)या वर्षी सर्व अंक रंगीत आहेत. ३) सर्व अंकांच्या मुखपृष्ठास लॅमिनेशन केले आहे. ४) ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांक अधिक

## अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती

| तपशिल | खंड ३५ २०११-१२ | खंड ३६ २०१२-१३ | खंड ३७ २०१३-१४ | खंड ३८ २०१४-१५ | खंड ३९ २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| ४ अंकातील एकूण लेख | ३९ | ६३ | ६५ | ५६ | ५८ |
| ४ अंकातील एकूण लेखक | ५० | ७५ | ७७ | ७१ | ७२ |
| ४ अंकाच्या एकूण प्रती | ६८६० | ७१४० | ७२२० | ७२७० | ७३०० |
| ४ अंकाची एकूण पृष्ठे | ४२२ | ४४२ | ४६२ | ४७२ | ४५८ |
| ४ अंकातील रंगीत अंक | ०३ | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| ४ अंकाचा एकूण खर्च रु. (टपालखर्चासह) | २२५७७३ | २५९११८ | २९८५०० | ३१२४६८ | ३२४६२८ |
| दर नगाचा सरासरी खर्च रु. (टपालखर्चासह) | ३२.९१ | ३६.३० | ४१.३४ | ४२.९८ | ४४.४६ |
| दर पानाचा सरासरी खर्च रु. (टपालखर्चासह) | ०.३१ | ०.३२ | ०.३५ | ०.३६ | ०.३८ |
| जाहिराती पासून उत्पन्न रु. | ४३००० | ५५००० | ५५००० | ६३००० | २५००० |

चांगला करण्याचा प्रयत्न केला. ५) अंक संख्या वाढल्याने पाकीट व पोस्टेज खर्चात वाढ झाली. ६) या वर्षीदेखिल चारही अंकांसाठी आंतरराष्ट्रीय नियतकालिकांप्रमाणेच प्लॅस्टीकचे पाकीट वापरले आहे. ७) अंकबिलामध्ये या वर्षातील व्हॅट(VAT)चा एकूण खर्च रु.१४०७८/- समाविष्ट आहे.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान मोलाचे असते. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेकडून २०१५-१६ मध्ये अर्थसंवाद प्रकाशनास अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने २०१५-१६ साठी रु.४५०००/- अनुदान दिले आहे. दरवर्षी या दोन्ही संस्था अनुदान देतात. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी माझ्यासह कार्यवाह डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी प्रयत्न केले. अर्थसंवाद येत्या वर्षात अधिक दर्जेदार व अधिक पृष्ठांसह येण्यासाठी अधिक रकमेची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी चालू घडामोडींवर आधारित लेख देण्याची परंपरा कायम राखली. स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, तसेच शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र, जागतिकीकरण, सेवा क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आदिवासी विकास या विषयावरील लेख अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले.

बऱ्याच वेळी ठरलेल्या फॉण्टमध्ये व पेजमेकरमध्ये टाईप करून लेख न येणे, पाकीटात सीडी तडा पडून प्राप्त होणे किंवा आलेली सीडी ओपन न होणे, लेख/मजकूर उशिरा प्राप्त होणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे विजेचे भारनियमन अशा कारणांनी अर्थसंवादचा अंक पूर्ण करताना समस्या आल्यात. आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात जाहिरात देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्या करिता कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी अर्थसंवादला सहकार्य करण्याची गरज आहे. बारामती येथे संपन्न झालेल्या एकोणचाळीसव्या वार्षिक अधिवेशनात १५ नोव्हेंबर २०१५ रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या प्रसंगी पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना केल्या.

अर्थसंवादच्या ३९ व्या खंडाची जडण घडण करण्यासाठी अनेकांनी मला मोलाची मदत केली. आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. अर्थसंवाद प्रकाशित करताना येणाऱ्या अडचणी दूर करीत असताना माझे गुरूवर्य प्रा.चारुदत्त गोखले यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लेखक, जाहिरातदार, कार्यकारी मंडळ सदस्य, माजी अध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. दि. व्यं. जहागीरदार, डॉ.संतोष दास्ताने, डॉ. श्रीराम जोशी, डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.मधुकर शिंदे, डॉ. के.के. पाटील, अध्यक्ष डॉ.सुहास आव्हाड, कार्यवाह खजिनदार डॉ.आर.बी. भांडवलकर, विश्वस्त डॉ. मुक्ता जहागीरदार, विश्वस्त डॉ.अर्जुन महाडिक, विश्वस्त डॉ. विनायक भिसे यांचे मार्गदर्शन मिळाले. डॉ.राहुल म्होपरे(कोल्हापूर), डॉ.तुकाराम मुंडे (मानवत), डॉ. बालाजी सुरवसे (फोंडा), डॉ. अशोक खाचणे, डॉ.संजय तुपे(नाशिक), डॉ.राजेंद्र शिंदे(धुळे), महादेव पाटील(मीरज), हनुमंत नन्नवरे(अकलूज), सुभाष गुर्जर(वरवट बकाल), संजय धनवटे(कारंजा), पांडुरंज कल्याणकर (फुलंब्री), डॉ. दिलीप पाटील(नंदुरबार), डॉ.आर.के.दातीर(नाशिक), रामभाऊ खाडे (बारामती) या कार्यकारी मंडळ सदस्यांचे सहकार्य लाभले. प्रा.मो.स.भावे, जळगाव, डॉ. हरिहर तिवारी (शेंदूरजना), डॉ.रावसाहेब जाधव, डॉ.मोहन चौधरी(पुणे) डॉ.तानाजी गिते(पुणे), डॉ. प्रशांत काटोले (अमरावती), डॉ.बालाजी शिंदे (परभणी), डॉ.रामकृष्ण टाले (नागपूर), विद्या पाटील(धुळे), डॉ. कुटे(मेहकर) डॉ. संतोष कदम(सोलापूर), डॉ. सुरेश जगताप(अमरावती), प्रा. एस. एल. भालेराव (शहादा) यांचे सहकार्य लाभले. सर्व अंकांची कॉम्प्युटरमध्ये जडण घडण व प्रूफ रीडींग करणारे सुनील भांडारकर व सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या मित्रांच्या सहकार्याशिवाय मी अंक आणू शकलो नसतो. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. अर्थसंवादचे सहाय्यक संपादक शंकर पवार, सल्लागार मंडळ सदस्य डॉ.तेजस्विनी मुडेकर, प्रा.अरुण पिसे, डॉ.राजेंद्र गव्हाळे, डॉ.विजय भोपाळे यांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. अर्थसंवाद पाकीटात टाकणे, पोस्टाची तिकिटे चिकटवणे या संदर्भात कु.ईशा लाठी व कु.नेहा लाठी यांनी उत्स्फूर्त सहकार्य दिल्याबद्दल मी त्यांचा देखील आभारी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्रैमासिक अर्थसंवाद अधिक दर्जेदार बनविण्यासाठी आपण सर्व जण यथाशक्ती योगदान देऊ या !

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### सन २०१५-१६ या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | सभासदाचे नाव | आजीव सदस्य क्र. |
|---|---|---|
| १ | धनश्री धनंजय आंबेकर, नाशिक | १६५७ |
| २ | श्रीकांत शालिग्राम कळमकर,आनंद,गुजरात | १६५८ |
| ३ | रसुल गफुर कोरबु, कोल्हापूर | १६५९ |
| ४ | लक्ष्मण शामराव बैसाणे, पुणे | १६६० |
| ५ | महेंद्र रामचंद्र आगळे, पुणे | १६६१ |
| ६ | विजय दिनकर पाटील, सांगली | १६६२ |
| ७ | उमेश भाऊराव घोडेस्वार, अकोट | १६६३ |
| ८ | नागोराव कोंडबाजी सोरे, पांढरकवडा | १६६४ |
| ९ | शिवशंकर सिताराम लेकूरवाडे, औरंगाबाद | १६६५ |
| १० | विजय शंकर शिंदे, जव्हार | १६६६ |
| ११ | पंढरीनाथ हरिभाऊ कदम, फलटण | १६६७ |
| १२ | सुरेखा भागूजी भिंगारदिवे, कोपरगांव | १६६८ |
| १३ | सुरेश एकनाथ घुमटकर, गेवराई | १६६९ |
| १४ | सुभाष संभाजी आगळे, खामगाव | १६७० |
| १५ | ज्ञानदेव एकनाथ झिने, हिंगोणी | १६७१ |
| १६ | पाजी सहदेवन, जालना | १६७२ |
| १७ | धैर्यशील बाबुराव सोळुंके, औरंगाबाद | १६७३ |
| १८ | लक्ष्मण सटवाजी सिताफुले, दापोली | १६७४ |
| १९ | गणेश बाजीराव मांडगे, दापोली | १६७५ |
| २० | प्रकाश कृष्णा टोणे, दहिवडी | १६७६ |
| २१ | सुरेश सिताराम नाळे, खेड | १६७७ |
| २२ | भीराव पांडूरंग उगले, गाजीपूर | १६७८ |
| २३ | हितेश माणिक दडमल, नागपूर | १६७९ |

प्रा. नी. वि. सोवनी व्याख्यानमाला : २०१५-१६

| अ.क्र. | देणगीदाराचे नांव | पावती क्र. | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | डॉ. मंजुषा मुसमाडे, पुणे | २५१ | १००० |
| २. | डॉ. रूपा शहा, कोल्हापूर | २५२ व २५५ | १५००० |

# अर्थसंवाद (खंड ३९, २०१५-१६)

(अ) लेख सूची:



| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | शेतीआधारित उद्योगातील रोजगार व मूल्यवृध्दीचा अभ्यास | ३ - ८ |
| २ | खासदार आदर्श ग्रामविकास योजना | ९ - १३ |
| ३ | ग्रामीण विकासात स्त्री कृषि श्रमिकांची भूमिका | १४ - १८ |
| ४ | भारताच्या ग्रामीण विकासातील शेतीक्षेत्राची वाटचाल | १९ - २३ |
| ५ | महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान | २४ - २९ |
| ६ | नवीन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम | ३० - ३५ |
| ७ | सामुदायिक विकास योजनेची भूमिका | ३६ - ४३ |
| ८ | महाराष्ट्रातील आंतर-प्रादेशिक विषमता | ४४ - ५२ |
| ९ | महाराष्ट्रातील ग्रामीण पायाभूत सुविधा | ५३ - ६० |
| १० | संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे योगदान | ६१ - ६५ |
| ११ | बँकींग क्षेत्र आणि ग्रामीण विकास | ६६ - ७० |
| १२ | महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकास योजना | ७१ - ७८ |
| १३ | ग्रामीण विकासात पायाभूत सुविधांची भूमिका | ७९ - ८४ |
| १४ | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाची भूमिका | ८५ - ९० |
| १५ | ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना | ९१ - ९६ |
| १६ | ग्रामविकास | ९७ - १०२ |
| १७ | समतावादी समाजनिर्मितीत कामगार चळवळीचे योगदान | ११७-१२४ |
| १८ | ग्रीक शोकांतिका | १२५-१३६ |
| १९ | आर्थिक सुधारणा आणि कृषि क्षेत्राची कामगिरी | १३७-१४२ |
| २० | महाराष्ट्रातील महिला विकास: एक दृष्टिक्षेप | १४३-१५२ |
| २१ | कृषि पर्यटन: ग्रामीण विकासाचा नवा मार्ग | १५३-१५७ |
| २२ | भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल | १५८-१६१ |
| २३ | महाराष्ट्रातील साखर उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य | १६२-१६८ |
| २४ | महाराष्ट्रातील गिरणी कामगारांचे आंदोलन | १६९-१७५ |
| २५ | अमरावती जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या: अध्ययन | १७६-१८३ |
| २६ | विश्वासाचे विज्ञान आणि विकास | १८४-१८९ |
| २७ | सामाजिक सुरक्षा योजना:केंद्राचा धोरणात्मक निर्णय | १९०-१९३ |
| २८ | भारतीय शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास | १९४-१९८ |

| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | जलनियोजन, जलसाक्षरता ही काळाची गरज | १९९-२०३ |
| ३० | महाराष्ट्रातील रो.ह.योजना आणि फळझाड लागवड | २०४-२०८ |
| ३१ | मागास, दुर्बल समाज आणि शासनाची भूमिका | २०९-२१७ |
| ३२ | रशियातले संक्रमण: उध्वस्त समाजवादाकडून अज्ञात भांडवलशाहीकडे | २२७-२४० |
| ३३ | विदेशी गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम | २४१-२४८ |
| ३४ | महाराष्ट्राचे जलव्यवस्थापन: धोरण आणि उपाय | २४९-२५३ |
| ३५ | सहस्त्रक विकासाचे ध्येय व भारताची प्रगती | २५४-२६२ |
| ३६ | महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्र विकास | २६३-२६९ |
| ३७ | कांदाबीज निर्यातीतून आर्थिक विकास | २७०-२७४ |
| ३८ | विशेष आर्थिक क्षेत्र आणि निर्यात वृध्दी | २७५-२८० |
| ३९ | कृषी विज्ञान केंद्र: शाश्वत शेतीविकासासाठी वरदान | २८१-२८५ |
| ४० | नियोजन आयोगाची अर्थव्यवस्थेतील भूमिका | २८६-२९१ |
| ४१ | महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा विकास | २९२-२९८ |
| ४२ | आधुनिक किटकनाशके: आर्थिक-सामाजिक परिणाम | २९९-३०२ |
| ४३ | भारतातील भूमिहीन शेतमजुरांचे अध्ययन | ३०३-३१० |
| ४४ | आदिवासींच्या विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका | ३११-३१६ |
| ४५ | सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना-एक वरदान | ३१७-३२३ |
| ४६ | स्वातंत्र्योत्तर भारतातील विदेशी गुंतवणूक | ३३७-३५२ |
| ४७ | अहमदनगर जिल्ह्यातील साखर उद्योगाची स्थिती | ३५३-३५८ |
| ४८ | शेती आधारित उद्योग-सद्यस्थिती व भवितव्य | ३५९-३६३ |
| ४९ | महाराष्ट्र भूषण डॉ.माधवराव चितळे | ३६४-३६६ |
| ५० | नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष वाईन उद्योगाच्या समस्या | ३६७-३७२ |
| ५१ | गुऱ्हाळघरे-शेतीमाल आधारित उद्योग | ३७३-३८० |
| ५२ | महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांच्या समस्या | ३८१-३९० |
| ५३ | शेती आधारित उद्योग व ग्रामीण विकास | ३९१-३९५ |
| ५४ | फळे व भाजीपाला सहकारी संस्था | ३९६-४०१ |
| ५५ | भारतातील शेतीमाल प्रक्रिया उद्योग | ४०२-४०६ |
| ५६ | महाराष्ट्रातील शेती आधारित उद्योग: सद्यस्थिती | ४०७-४१३ |
| ५७ | भारतातील कृषी प्रक्रिया उद्योगातील संधी | ४१४-४१८ |
| ५८ | शेती आधारित उद्योग: ग्रामीण विकासातील भूमिका | ४१९-४२२ |

# अर्थसंवाद



| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे** | |
| १ | ओढ | २२२-२२२ |
| २ | प्रदेश प्रवेश | ३२७-३२७ |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| १ | नागरी औद्योगिक क्षेत्राच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक - विकास महामंडळाचे योगदान | १०७-१११ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | माझी अर्थविश्वातील भ्रमंती | १०३-१०६ |
| २ | मानवी अर्थशास्त्र | २१८-२२० |
| ३ | थकित कर्ज वसुलीचे धोरण व पध्दत | ३२४-३२६ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आधारस्तंभ ढासळला | ३३५ - ३३६ |
| | **३९ वे राष्ट्रीय अधिवेशन** | |
| | **सूत्रसंचालकाचा अहवाल** | |
| १ | नामदार गोपाल कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार | ४२३-४२४ |
| २ | पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन | ४२५-४२६ |




हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# अर्थसंवाद (खंड ३९, २०१५-१६)

## (ब) लेखक सूची:



| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | साधना पाटील, नाशिक | ३ - ८ |
| २ | रामचंद्र रसाळ, प्रवरानगर, सतीष गोंडे, प्रवरानगर | ९ - १३ |
| ३ | ज्योती साठे, पुणे | १४ - १८ |
| ४ | मंजुश्री बोबडे, पुणे | १९ - २३ |
| ५ | दिलीप पाटील, देऊर, मोहन सदामते, कुंडल | २४ - २९ |
| ६ | शिवाजी यादव, औरंगाबाद | ३० - ३५ |
| ७ | नीता वाणी, ऐनपूर | ३६ - ४३ |
| ८ | रामदास भांडवलकर, यवतमाळ | ४४ - ५२ |
| ९ | दीपक भुसारे, पैठण | ५३ - ६० |
| १० | नामदेव बोरसे, जळगाव, श्रीराम जोशी, जळगाव | ६१ - ६५ |
| ११ | मंगला धोरण, अमरावती | ६६ - ७० |
| १२ | देविदास गवळी,किल्लेधारूर, शिवाजी अंभोरे,शिवाजीनगर | ७१ - ७८ |
| १३ | सिमा चव्हाण, श्रीरामपूर | ७९ - ८४ |
| १४ | भालचंद्र खुरद, राहुरी, संदिप अभंग, खंडाळा | ८५ - ९० |
| १५ | मदन शिंदे, पाटोदा | ९१ - ९६ |
| १६ | मनिषा चौधरी, शिरपूर | ९७ - १०२ |
| १७ | पांडुरंग महादेव कडुकर, मुंबई | ११७-१२४ |
| १८ | विश्वजित कदम, नाशिक | १२५-१३६ |
| १९ | सुभाष पाटील, पुणे | १३७-१४२ |
| २० | तेजस्विनी बी. मुडेकर, कोल्हापूर | १४३-१५२ |
| २१ | संतोष कदम, मंद्रुप | १५३-१५७ |
| २२ | हरिभाऊ नरसिंग गिलबिले, भूम | १५८-१६१ |
| २३ | शंकर सुदामराव पवार, शहादा | १६२-१६८ |
| २४ | अविनाश कुलकर्णी, नवी दिल्ली | १६९-१७५ |
| २५ | सुरेश रा. जगताप, अमरावती | १७६-१८३ |
| २६ | रसुल गफुर कोरबू, कोल्हापूर | १८४-१८९ |
| २७ | उदय श्रीकृष्ण काळे, मेहकर | १९०-१९३ |
| २८ | धर्मा रानबा धेडे, वारणानगर | १९४-१९८ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | दादाजी रघुनाथ बच्छाव, नाशिक | १९९-२०३ |
| ३० | बाजीराव ज्ञानू इंगवले, वैभववाडी | २०४-२०८ |
| ३१ | नारायण चिंतामण पाटील, लासूर | २०९-२१७ |
| ३२ | अशोक मोडक, मुंबई | २२७-२४० |
| ३३ | भिमा सापनर, नाशिक | २४१-२४८ |
| ३४ | रामहरी किसन दातीर, नाशिक | २४९-२५३ |
| ३५ | नंदकुमार मेटे, यवतमाळ | २५४-२६२ |
| ३६ | अनिलकुमार वावरे, सातारा | २६३-२६९ |
| ३७ | कृष्णा शहाणे, नाशिक | २७०-२७४ |
| ३८ | सुनिल मेढे, जाफ्राबाद | २७५-२८० |
| ३९ | नागेश सूर्यवंशी, मुंबई | २८१-२८५ |
| ४० | अरुण तवार, परभणी | २८६-२९१ |
| ४१ | हिरालाल चव्हाण, जळगाव | २९२-२९८ |
| ४२ | दिलीप जगताप, नंदुरबार | २९९-३०२ |
| ४३ | चंद्रकांत कोकाटे,शिवशंकर लेकुरवाळे,औरंगाबाद | ३०३-३१० |
| ४४ | कु.धनश्री अंबेकर, पुणे | ३११-३१६ |
| ४५ | बापुसाहेब शिंगाडे, संगमनेर | ३१७-३२३ |
| ४६ | सुहास आव्हाड, संगमनेर | ३३७-३५२ |
| ४७ | सादिक सय्यद, कर्जत | ३५३-३५८ |
| ४८ | रूपा शहा, कोल्हापूर | ३५९-३६३ |
| ४९ | विनायक देशपांडे, नागपूर | ३६४-३६६ |
| ५० | दिपा होळकर, नाशिक | ३६७-३७२ |
| ५१ | प्रमिला पाटील, कोल्हापूर | ३७३-३८० |
| ५२ | शिवाजी ढगे, पुणे | ३८१-३९० |
| ५३ | कुमुदिनी जोगी, अचलपूर | ३९१-३९५ |
| ५४ | निकिता भोरे, सांगली | ३९६-४०१ |
| ५५ | लाजवंती टेंभुर्णे, मोर्शी | ४०२-४०६ |
| ५६ | सुरेश ढमढेरे, पूणे | ४०७-४१३ |
| ५७ | जितेंद्र तलवारे, देवपूर | ४१४-४१८ |
| ५८ | रामलिंग नाळे, सरूड | ४१९-४२२ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे** | |
| १ | ज. फा. पाटील, कोल्हापूर | २२२-२२२ |
| २ | ज. फा. पाटील, कोल्हापूर | ३२७-३२७ |
| | **पीएच.डी.प्रबंधाचा सारांश** | |
| १ | देवेंद्र शिवदास रंगाचार्य, अमरावती | १०७-१११ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | मंजुषा मुसमाडे, पुणे | १०३-१०६ |
| २ | उत्तम दे. वाकोडकर, अंबाजोगाई | २१८-२२० |
| ३ | मंजुषा मुसमाडे, पुणे | ३२४-३२६ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | चारुदत्त गोखले (लेखक) | ३३५-३३६ |
| | **३९ वे राष्ट्रीय अधिवेशन सूत्रसंचालकाचा अहवाल** | |
| १ | रामहरी दातीर, हरिहर तिवारी, विठ्ठल घिनमिने | ४२३-४२४ |
| २ | रूपा शहा, जयश्री उपाध्ये, विद्या पाटील | ४२५-४२६ |
| | **अंकाचा तपशील: खंड ३९** | पृष्ठ संख्या |
| १ | एप्रिल-जून २०१५ | ११४ |
| २ | जुलै-सप्टेंबर २०१५ | ११० |
| ३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१५ | १०८ |
| ४ | जानेवारी-मार्च २०१६ | ११८ |

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ईमारत निधी : २०१५-१६

| अ.क्र. | नाव | आजीव सदस्य क्र. | पावती क्र. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | धनश्री धनंजय आंबेकर, नाशिक | १६५७ | ३२४ | २००० |
| २. | श्रीकांत शालिग्राम कळमकर,आनंद,गुजरात | १६५८ | ३२५ | २००० |
| ३. | रसुल गफुर कोरबु, कोल्हापूर | १६५९ | ३२६ | २००० |
| ४. | लक्ष्मण शामराव बैसाणे, पुणे | १६६० | ३२७ | २००० |
| ५. | महेंद्र रामचंद्र आगळे, पुणे | १६६१ | ३२८ | २००० |
| ६. | विजय दिनकर पाटील, सांगली | १६६२ | ३२९ | २००० |
| ७. | उमेश भाऊराव घोडेस्वार, अकोट | १६६३ | ३३० | २००० |
| ८. | नागोराव कोंडबाजी सोरे, पांढरकवडा | १६६४ | ३३१ | २००० |
| ९. | शिवशंकर सिताराम लेकूरवाडे, औरंगाबाद | १६६५ | ३३२ | २००० |
| १०. | विजय शंकर शिंदे, जव्हार | १६६६ | ३३३ | २००० |
| ११. | पंढरीनाथ हरिभाऊ कदम, फलटण | १६६७ | ३३४ | २००० |
| १२. | सुरेखा भागूजी भिंगारदिवे, कोपरगांव | १६६८ | ३३५ | २००० |
| १३. | सुरेश एकनाथ घुमटकर, गेवराई | १६६९ | ३३६ | २००० |
| १४. | सुभाष संभाजी आगळे, खामगाव | १६७० | ३३७ | २००० |
| १५. | ज्ञानदेव एकनाथ झिने, हिंगोणी | १६७१ | ३३८ | २००० |
| १६. | पाजी सहदेवन, जालना | १६७२ | ३३९ | २००० |
| १७. | धैर्यशील बाबुराव सोळुंके, औरंगाबाद | १६७३ | ३४० | २००० |
| १८. | लक्ष्मण सटवाजी सिताफुले, दापोली | १६७४ | ३४१ | २००० |
| १९. | गणेश बाजीराव मांडगे, दापोली | १६७५ | ३४२ | २००० |
| २०. | प्रकाश कृष्णा टोणे, दहिवडी | १६७६ | ३४३ | २००० |
| २१. | सुरेश सिताराम नाळे, खेड | १६७७ | ३४४ | २००० |
| २२. | भीराव पांडूरंग उगले, गाजीपूर | १६७८ | ३४५ | २००० |
| २३. | हितेश माणिक दडमल, नागपूर | १६७९ | ३४६ | २००० |
| २४. | सौ. नलिनी विठ्ठलराव पाचर्णे, पुणे | | २३० | १००० |
| २५. | मधुकर रामचंद्र वेदपाठक, मुरूड जंजिरा | ८८४ | २४७ | १००० |
| २६. | एम. यु. मुलाणी, बारामती | ११२० | २५३ | १००० |
| २७. | मनिषा खुटवड, बारामती | १०६२ | २४५ | ५०० |
| | एकूण रु. | | | ४९५०० |

## ‘अर्थसंवाद’ चे लेखक व्हा

### जुलै - सप्टेंबर २०१६ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... ‘अर्थसंवाद’ च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

फक्त एवढंच् करा....

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी. पृष्ठसंख्या सामान्यपणे ५ ते ८ पृष्ठे असावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन


(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

ादन




हेती


Registration No.31918/77 अर्थसंवाद, मार्च २०१६/खंड ३९, अंक ४, मूल्य रु.२०